रस्ते मनातले

साहित्य सेवा पुरस्कार प्राप्त

डॉ. पी. जी. कुलकर्णी



लेखक
डॉ. पी. जी. कुलकर्णी
धन्वंतरी हॉस्पिटल, राजारामपुरी ७ वी गल्ली,
कोल्हापूर - ४१६ ००७.
फोन : निवास - २६७२५८०
हॉस्पिटल - ५२१९५६

तृतीय आवृत्ती
डिसेंबर २०१४

मुखपृष्ट
रमण कुलकर्णी, कोल्हापूर

प्रकाशक
अभिनंदन प्रकाशन
१४९५, बी वॉर्ड मंगळवार पेठ,
कोळेकर तिकटी कोल्हापूर. ४१६०१२
✆ ०२३१-२३९६९०९
मोबा : ९४२३०४१९६५

मुद्रक व अक्षरजुळणी
श्री महालक्ष्मी ऑफसेट प्रिंटर्स,
१२०९, डी, उत्तरेश्वर पेठ, कोल्हापूर
मो. ९९२१४५८३७३

मूल्य
रू. १८०/-

....एकदा जन्माला आल्यावर
व पुन्हा ती गेल्यावर
दोनदा माझी नाळ तुटली.
....आईस

—प्रकाश



पूर्वप्रसिद्धी

रस्ते मनातले – रविवार सकाळ

शेंगा – बहार, पुढारी

वसंत – बहार, पुढारी

मन माझे मोरपीस – रविवार सकाळ

मोर – रविवार सकाळ

दहा दिवस – अक्षरगंध, दिवाळी

यादव सरकार – 'ज्ञानप्रबोधिनी' दिवाळी

माहेर – रविवार सकाळ

अनुक्रम

ऋणनिर्देश

डॉ. द. भि. कुलकर्णी

डॉ. वसंत जोशी

डॉ. अ. रा. तोरो

प्रा. भ. रा. नाईक

उषा कुलकर्णी

डॉ. एन. बी. जाधव

डॉ. देशपांडे

धनंजय गोवर्धने

विजय चोरमारे

मेघश्याम लाटकर

मीनल कुलकर्णी

रीना रानडे

आणि

लेखांस पूर्वप्रसिद्धी देणारे सर्व संपादक

प्रस्तावना

डॉ. पी. जी. कुलकर्णी हे कोल्हापुरातील एक ख्यातनाम आणि कुशल अस्थिरोगतज्ज्ञ आहेत. महाविद्यालयीन जीवनात एक हुशार आणि बुद्धिमान विद्यार्थी म्हणून ते चमकले होते. त्याच काळात वक्तृत्व कलेत त्यांनी प्रावीण्य मिळविले होते. अनेक वक्तृत्व स्पर्धात त्यांनी भाग घेतला होता आणि पारितोषिके पटकाविली होती. कविता करण्याचा त्यांचा छंदही त्याच काळातला. उपजीविकेसाठी वैद्यकीय व्यवसाय ते करीत असले तरी साहित्य-संगीतादी कलांची आवडही मनापासूनची. त्यात रंगणे त्यांना आवडते. बाह्य जीवनात वावरत असतांना त्यांच्यातील लेखक त्यातील व्यक्ती, प्रसंग यांचे बारकावे टिपत असतो. त्याचे बारकावे जाणून घेण्याचा प्रयत्न असतो. एखाद्याशी स्नेह जुळला तर व्यावसायिक यशाची झूल बाजूला करून त्याच्या भावजीवनाचा ते एक भाग बनतात. केव्हा तरी साऱ्या स्मृती मनात दाटून येतात आणि शब्दरूप पावतात. वैद्यकीय व्यवसायातील अनुभव टिपणाऱ्या कथा त्यांच्या प्रारंभीच्या 'लेपर' या कथासंग्रहात आलेल्या आहेत. तर 'माझा स्वर्गवास' या त्यांच्या दुसऱ्या कथासंग्रहात जीवनातील विसंगतीचे दर्शन घडविणाऱ्या विनोदी कथा संग्रहित झाल्या आहेत. प्रारंभीच्या कथातील मनुष्याच्या विकलांग अवस्थेतील कारुण्य वाचकाला अस्वस्थ करते, तर दुसऱ्या संग्रहातील कथा त्याच्या मुखावर स्मितहास्य फुलवितात. या संग्रहास महाराष्ट्र शासनाचा पुरस्कारही मिळालेला आहे. 'रस्ते मनातले' हे त्यांचे तिसरे पुस्तक म्हणजे त्यांच्या चिंतनशील प्रवृत्तीला ललित लेखरूप पावलेला आविष्कार आहे.

कोल्हापुरातील संस्कृतचे सुप्रसिद्ध प्राध्यापक, तत्त्वचिंतक आणि कवी कै. डॉ. गं. वि. कुलकर्णी 'रसगाधार' हे डॉ. पी. जी. कुलकर्णी यांचे चुलते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि चिंतनपरतेचा प्रभाव डॉक्टरांवर पडलेला आहे. कै. डॉ. गं. वि. कुलकर्णी हे महर्षी रमण यांचे भक्त आणि अनुयायी होते. त्यांच्या जयंती, पुण्यतिथीचे कार्यक्रम आणि त्या अनुषंगाने ऐकावयास मिळणारे तात्त्विक विचार डॉ. पी.जी.

कुलकर्णी यांच्यावर संस्कार करीत होते. काही वेळा तेही आपले विचार मांडत. त्यामुळे तत्त्वचिंतनाचा, आत्मशोधाचा त्यांचा पिंड जोपासला गेला. अध्यात्म मार्गाने त्यांची वाटचाल झालेली नसली तरी व्यावहारिक जीवनात त्यांचा प्रभाव कायम राहिला. वृत्ती आणि व्यवहार त्या संदर्भात होत राहिले. प्रस्तुत संग्रहातील लेखांतून याचे प्रत्यंतर येत राहते. सुदैवाने या संग्रहातील लेखाच्या प्रारंभीच्या श्रोत्यांपैकी मी एक होतो. या लेखनाशी माझे नाते या रीतीचे असल्यामुळे प्रस्तुत प्रस्तावना ही केवळ पारिचयकर्त्याची आहे. समीक्षकाची भूमिका या अवस्थेत शक्य नसते हे सांगावयास नकोच.

मराठीतील ललित गद्य लेखनाचे स्वरूप आता खूपच बदललेले आणि विस्तारलेले आहे. विशिष्ट साच्यातून लिहिल्या जाणाऱ्या लघु निबंधापेक्षा किंवा ललित निबंधापेक्षा त्याला वेगळे मुक्त चिंतनाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्याच्या कक्षा आता कथा, व्यक्तिचित्रे, आत्मसंवाद अशा वाङ्मय प्रकारांच्या स्वरूपाशी भिडू लागल्या आहेत. काव्यसदृश आत्मविष्काराचे गद्यरूप या प्रवृत्तीच्या लेखकांना अधिक जवळचे वाटते. दुर्गा भागवत, इरावती कर्वे यांनी ललित लेखनाचे व्यापक दर्शन घडविले आहे. हा एक वाङ्मय प्रकार असा आहे, की काव्याप्रमाणेच तो त्या त्या लेखकांच्या व्यक्तिमत्त्वाशी निकटचा असतो. त्यामुळे या प्रकारात एकाचे अनुकरण दुसऱ्याला जमेलच असे नसते. त्या त्या लेखकाची जीवनानुभूती, त्याची आकलनशक्ती या त्याची क्षमता किंवा मर्यादा निश्चित करतात.

बालपणीची माणसे, घरे, परिसर यांच्याशी निगडित स्मृतीत रमून जाण्याची लेखकाची स्वप्नरंजनात्मक वृत्ती 'रस्ते मनातले' या लेखात प्रकट झाली आहे. कथाकार, कवी आणि आता ललित गद्य लेखक म्हणून आज डॉ. कुलकर्णी आपल्यासमोर येत असले तरी त्यांची मनोवृत्ती कवीची आहे. त्यामुळे लेखनाच्या ओघात आपल्या भावना किंवा विचार पद्य स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न नकळत होत राहतो. त्याचे प्रत्यंतर या लेखात येते.

व्यावसायिक जबरदस्त ताणातून विसावण्यासाठी काही दिवस लेखकाने महाबळेश्वरात घालविले. तेथे आलेले अनुभव त्यांनी शब्दबद्ध केले. सामान्य माणसालाही ओढ वाटावी असे प्रसंग आणि भावस्थिती त्यात प्रकट होते. मनाचे हेलकावे टिपत जात होते. काल्पनिकापेक्षा वास्तव दर्शनाची प्रेरणा त्यात अधिक होती. मनाच्या द्विधा अवस्थेचे, संघर्षाचे चित्रण होऊ लागले. ही मानसिक अवस्था अस्थिर, अस्वस्थ जीवनाला एक वेगळे वळण देणारी ठरली. हा संघर्ष आंतरिक शोध घेणारा

ठरला. एकटेपणाची ही ओढ कशासाठी? जीवनात व्यावहारिकदृष्ट्या यशस्वी झाल्यानंतर चिंतनप्रवण व्यक्तीला आत्मशोध घ्यावासा वाटावयास लावणारी ती प्रक्रिया आहे. 'गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा' असे वाटणारी ती एक सात्त्विक आणि उदात्त भावना आहे. व्यवहारी जीवनापासून दूर जाऊन नवे जीवनदर्शन घेण्याची इच्छा प्रबळ होते आणि महाबळेश्वराच्या निसर्गसंपन्न, सौंदर्यपूर्ण वातावरणात त्याला जाणीवरहित अस्तित्वाचा प्रत्यय येतो. थोडे दूर जाऊन अत्मिक बळ मिळविण्याचा प्रयत्न या साऱ्या धडपडीमागे असतो. भग्न मंदिराच्या दर्शनाने व्यथित झालेल्या मनाला आजचा मनुष्यही असाच दुभंगलेला असल्याचे जाणवते. रात्रीचे आकाश त्यास जसे पाण्याने डोळे डबडबलेले असावेत, तसे चांदण्यांनी डबडबल्यासारखे वाटते. जंगलातील भयाण शांतता पाहून आपल्या माणसांच्या सहवासातील सुखाची त्यांना आठवण होते. मुलाबाळांची आठवण हा जीवनासक्तीचाच एक भाग नव्हता काय? माणसं भेटल्यानंतर त्या नीरव एकांतातही होणारा लेखकाचा आनंद लपून राहात नाही. एकटेपणाची जाणीव झाल्यामुळे पुन्हा नित्याच्या प्रापंचिक जीवनाची ओढ त्याला लागून राहते, ही एक मानव सुलभ वृत्तीच म्हणावी लागेल. हळूहळू पूर्व जीवनात जावेसे वाटू लागते आणि मानसिक, शारीरिक आणि आत्मिक सामर्थ्य वाढल्याचा प्रत्यय शेवटच्या काळात येऊ लागतो.

'मन झाले मोरपीस' म्हणजे लेखकाच्या व्यक्ती, वस्तू आणि वास्तूंच्या दर्शनाने झालेल्या पूर्वस्मरणात रमण्याच्या वृत्तीचा पुनःप्रत्यय होय. शाळेतील दिवस, शिक्षण, विद्यार्थी मित्र या सर्वांच्या स्मरणानं मन मोरपिसासारखं सुंदर व हलकं होतं. वसंत ऋतूमध्ये अंतर्मनात होत जाणाऱ्या बदलांची जाणीव लेखकाला होत राहते. व्यावहारिक जीवनात गुरफटल्यामुळे निसर्गसौंदर्याचा आस्वाद घेता येत नाही, याची रुखरुख त्याच्या मनास लागून राहते. कोकिळकूजन, आम्रमोहोर, कच्चे आंबे आकर्षित करतात. अशा तऱ्हेचे अंतर्द्वंद्व लेखकाच्या मनात सदैव सुरू असते.

पत्नी आणि मुले यांच्या संवादातून आपले लेखन सजवीत नेण्याची शैली लेखकाच्या सर्वच लेखनातून दिसून येते. त्यामुळे एक प्रकारचा जिवंतपणा लेखनाला प्राप्त होतो. अकस्मात् अंगणात येणाऱ्या मोरांचे कुतूहल आणि आकर्षण मुलांप्रमाणेच लेखकालाही वाटते. त्याच्याबरोबर लेखकही मोरांच्या सुखदुःखांशी समरस होऊन जोडला जातो. मानवी अमानुषतेच्या दर्शनाने त्याचे मन व्यथित होते. पिसारा फुलवून मोर नाचू लागतात हा एक वेगळा अनुभव असतो. मोर पाहून लेखकास त्याच्याशी निगडित आईची स्मृती त्याच्या मनात साकार होते.

नकळत आपले जीवन समृद्ध करणारी माणसं आपल्या जीवनात येतात. यादव सरकार हेही असेच एक लेखकास भेटलेले व्यक्तिमत्त्व होते. यादव हे एक छोटीशी बंगली बांधून जणू वानप्रस्थाश्रम स्वीकारून राहणारे गृहस्थ होते. फुले, फळझाडे, भाजीपाला यांची शेती त्यांनी फुलविली होती. स्वतःची सरकारगिरी संपवून फकिरी पत्करणारा हा मनुष्य होता. त्यांच्या सहवासात आणि परिसरात मनाला लाभणारी शांती आणि मिळणारा दिलासा लेखकास जाणवतो. मनाच्या अस्वस्थ स्थितीत यादव सरकारांच्या सहवासात त्यांना समाधान लाभते. सरकारांनी गावच्या लोकांचं प्रेम संपादन केलेलं असतं. गावातील गृहिणी त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था पाहतात. मठाचे स्वामी त्यांची काळजी घेतात. पावसाची शक्यता वाटली तर शेतातील खळ्यावरील धान्याची पोती एखादा शेतकरी घरी आणून टाकतो. सर्वांना आकर्षित करणारा सरकारांमधील स्नेहाचा धागा लेखकास मोहित करतो.

कण्हेरी मठ, तेथील नव्वदीला पोचलेले मठाचे स्वामी हेही लेखकाच्या मनाला ओढ लावणारे आणखी एक स्थान. मठाचे व स्वामींचे दर्शन त्यांना प्रसन्न करतं. यात भावुकता ही भाविकतेहून अधिक तीव्र असते. लेखकास वडीलधाऱ्यांच्या सहवासाची असणारी आवड अशा अनेक ठिकाणी प्रकट होते. लेखक सदैव अशा मानसिक आधाराच्या शोधात असतो. ही अतृप्तता, ही अस्वस्थता त्यांच्या मनातील अंतर्द्वंद्वातून येत असावी. या वयातही कार्यरत राहणारे स्वामी लेखकास प्रभावित करतात. त्यांचं दर्शन घेऊन परत जातांना लेखकाच्या गाडीच्या डिकीत अकल्पितपणे शेंगाचं छोटसं पोतं टाकलं जातं. स्वामींचा तो कृपाप्रसाद असतो. लेखकास जाणवतं, की आपलं जग हे स्वार्थाचं आहे, तर इथं त्यागाचं साम्राज्य आहे.

या धबडग्याच्या जगात आणि व्यावसायिक जंजाळात अस्वस्थ मनाला सुख देणारी ठिकाणं फार थोडी असतात. सासरी गांजलेल्या, दमलेल्या, थकलेल्या स्त्रियांना विसावा देणारं, हक्काचं माहेर असतं. पुरुषांना तशी माहेरं असतात का? या प्रश्नाचं उत्तर लेखकास त्यांच्या जिव्हाळ्याच्या मित्राच्या सहवासात मिळालं. वेंगरूळच्या आप्पांच्या शेतात मुक्तपणे राहिल्यानंतर ! तेथील खारी, उडणारे पक्षी, नाचणाऱ्या चिमण्या, विहिरीतून बाहेर पडणारा पाण्याचा प्रवाह, तृप्त होणारे पथिक या वातावरणात ते रमतात. त्याच शेतातील मंदिरात ते मुक्काम करतात आणि तेथील निगूढ शांत वातावरणाचा अनुभव घेतात. पांढरपेशा जीवनाचा काही वेळा लेखकास उबग येतो. उपनिषदातील 'एक झाड आणि दोन पक्षी' ही कथा आठवते.' एक फळे खाऊन खालीच बसलेला आणि दुसरा फळे न खाता झाडाच्या शेंड्यावर बसून सारे विश्व न्याहाळणारा! शहरी जीवनात सदैव धावावं लागतं, तर इथं शांत बसूनही जगता येतं, म्हणून या जीवनाची ओढ लेखकास लागनू राहते. सासुरवाशी स्त्रीला ही वाटणारी माहेरची ओढ यासाठी असते ना?

डॉ. पी. जी. कुलकर्णी यांचे हे 'रस्ते मनातले' वाचकांनाही आपल्या समवेत घेऊन जातात. या साऱ्यात एक समान धागा आढळतो, तो लेखकाच्या मानसिक अस्वस्थतेचा. सारी लौकिक सुखे उपलब्ध असतांना मनास वाटणारी हुरहुर आध्यात्मिक संस्कारांची बोच तर नसेल ना? 'समुद्री चहुकडे पाणी पिण्याला थेंबही नाही' असे का वाटत राहावे? या पुढील काळात ही अस्वस्थता कमी होईल, द्वंद्व संपेल आणि एका नव्या अनुभूतीने याहून विशाल जगाचे दर्शन डॉ. कुलकर्णी यांच्या लेखनात घडत राहील, अशा आपण अपेक्षा करू या.

१ जानेवारी, २००१
१२४, महात्मा हाऊसिंग सोसायटी,
कोथरूड, पुणे - ४११ ०२९

डॉ. वसंत स. जोशी

●●●

रस्ते मनातले

तासगावहून वसगडे गावी जाणारा एक रस्ता आहे. पूर्वी पक्का होता आता डांबरी झाला. वेरळेच्या पुलावरून निमणीमार्गे पाचवा मैल व डाव्या बाजूला दोन तीन मैलावर वसगडे गाव. रेल्वेरूळ क्रॉस करून जावं लागायचं. कधी कधी रेल्वे जाताना दिसायची. लहानपणीचे ते दिवस. रेल्वे, विमान बघितलं तरी ऊर थरारून जायचा. तिथून रेल्वे मुंबईला जाते हे तेव्हा पटायचंच नाही. मुंबई-कल्पनेतली. मग मुंबई कशी दिसेल याचा विचार मी त्या वेळी करत असे. आता मुंबई मी खूप वेळा पाहिली. पण त्या वेळची कल्पनेतली मुंबई वेगळी, जशीच्या तशी मनात स्थिर आहे. तसं पाहिलं तर या रस्त्यावर दुतर्फा झाडी होती, वाटेत तळी होती असंही काही नाही. वेरळेला तर पाणी पूर्वी असायचं आता नसतचं कधी. ह्या रस्त्याबद्दल कुणाला आकर्षण वाटणार? साहजिक आहे. पण मला आकर्षण वाटायचं या रस्त्याचं, कारण हा रस्ता मला माझ्या मामाच्या गावाला घेऊन जायचा. मामाचं भाच्यांच्यावरचं प्रेम वेगळंच. कधी कधी पोटच्या पोरापेक्षा जास्त. मामा गोष्टी सांगायचा. विनोद करायचा. पोट धरून

हसायला लावायचा आणि मामाचा लळा लागला. सारखं सारखं आईकडं हट्ट करून यायचं. कधी आईबरोबर कधी मामाबरोबर त्याच्या मागं लागून जायचं. मामाबरोबर सायकलवरून त्या रस्त्यानं जाताना खूप मजा यायची.

तासगाव आणि वसगड्याला जोडणारा तो रस्ता. एकीकडं आई, एकीकडं मामा. त्यांच्यामधला तो रस्ता. हळूहळू तो रस्ताही जवळचा वाटू लागला. मामाच्या गावाला नेणारा रस्ता. कुणीही 'पाचव्या मैलावरून आलो' असं म्हटलं की तो रस्ता आठवायचा आणि रस्त्याबरोबरच मामाच्या गावाच्या गोड आठवणी. त्या आठवणींकडं जाणारा मनाच्या पातळीवरही तो एक रस्ता तयार झाला होता!

मामाच्या गावात घरापासून वेरळा नदीकडे जाणारा छोटा वळणावळणाचा कच्चापक्का असा एक रस्ता आहे. त्या रस्त्यावरून मामाच्या म्हशी मी आणि मामेभाऊ नदीत धुवायला घेऊन जात असू. सहा ते दहा वय असेल माझं. म्हशी खूपच माणसाळलेल्या. आम्ही त्यांना आंघोळीला घालतो म्हणून येताना आम्हाला पाठीवर बसवून घ्यायच्या. दगडानी म्हशी घासायचो आम्ही. नंतर पाण्यात स्वच्छंदी आंघोळ. वेरळेला ओढ फार. आमच्या कमरेइतकं पाणी असलं तर ओढत ओढत पुढं यायला मजा यायची. या रस्त्यावरून जाताना वाटेत उजव्या हाताला पाटील नावाचे शेजारी राहात असत. मी दिसलो की विचारपूस करायचे. आई आली का? मी कितवीत गेलो? माझी आस्थेवाईकपणे चौकशी करणारी मंडळी या रस्त्यावर राहात होती. पुढं गेलं की शंकर आण्णांचं घर. तिथं आत गेलं की खिसा भरून शेंगा, चहा पिऊनच पुढं जायचं, म्हशीबरोबर एकानं पुढं जायचं, नाही गेलं तरी चालायचं. आमच्या म्हशी नदीत जायच्या. आम्ही त्यांना हुडकून काढायचो. म्हशींनासुद्धा वेगवेगळा तोंडावळा असतो.

शंकर आण्णा मोठ्या माणसाशी बोलतात तसं माझ्याशी बोलायचा. मामाचा वाटेकरी होता शंकर आण्णा. दम्यानं छाती हालायची. माझ्या आईवर व माझ्यावर फार जीव त्याचा. त्याच रस्त्यावर उजव्या बाजूला आमचे अनेक नातेवाईक राहायचे. वय एवढे लहान की कुणाच्याही घरी जाऊन काहीही केलं, काहीही खाल्लं, मागितलं की मिळत असे. माहेरवाशिणीचा मुलगा ना मी. हा रस्ता छोटा पण मोठी मोठी माणसं राहायची या रस्त्यावर. सारा रस्ता आणि सारी घरं स्वतःचीच असल्यासारखं वाटायचं. पुढं एक शाळा आणि नंतर अंबाबाईच देऊळ. नदीला डाव्या बाजूला वळताना अंबाबाईला लांबूनच नमस्कार करायचो. तशी सवयच लागलेली. देऊळ दिसलं की नमस्कार करायचा. हा रस्ता नदीच्या अगदी जवळ आला की दोन मोठी वडाची झाडं लागायची. वाळूत पारंब्यावर लोंबकाळून खूप व्यायाम करायचा आणि नंतर पाय

पोळतात म्हणून पळत पळत वाळूतून नदीत जाऊन उड्या टाकायच्या. म्हशी हुडकायच्या आणि त्यांची, आपली आंघोळ झाली की त्याच रस्त्यानं पुन्हा परत येऊन मामाकडं चुलीवर खरपूस भाजलेल्या भाकरी खायच्या. आज तेहतीस वर्षे झाली या गोष्टींना. तो रस्ता मी वयानं मोठा होत असतांना पुन्हा अनेकदा तुडवला असेन. पण ज्या ज्या वेळी त्या रस्त्यावरून आजही मी जातो क्वचित् कधीतरी, तेव्हा त्या साऱ्या आठवणी गोळा होऊन येतात. मन भरून येतं. या जुन्या आठवणींना जोडणारा रस्ता अजूनही आहे. हा रस्ता कारण बनतो आठवणीचं, हा रस्ता साक्षी असतो त्या आठवणींचा, एक दुवा माझ्यातला आणि त्या आठवणींचा. माझ्यातला आणि माझ्या बालपणीचा!

आताही मामाकडं म्हशी पाळतात. पण मी गेलो की बुजतात त्या. तेव्हाच्या आणि आत्ताच्या म्हशी बदलल्या की मी बदललो हे कळत नाही मला. पण ह्या साऱ्या बदलाला तो रस्ता साक्षीभूत असतो. बालपणातील सुट्टीचे दिवस किती मजेचे असतात. दिवाळी आणि मेची परीक्षेनंतरची सुट्टी या छोट्या गावातील ज्या छोट्या छोट्या रस्त्यावरून भुरभुरत घालवली ते हे रस्ते मनामध्ये त्या घरांसह अजून उभे आहेत. खरा शंकर आण्णा देवाघरी गेला पण माझ्या मनातील ह्या रस्त्यावरचा शंकर आण्णा अजूनही माझे खिसे शेंगांनी भरतो आहे.

कधी कधी रस्त्यांचा संबंधच संपतो. आपण गाव सोडून दूर जातो आणि त्या गावातील रस्त्यावर फिरण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. नाळ तुटल्यासारखे संबंध संपतात रस्त्यांचे आणि आपले. तसंच झालं या मामाच्या गावातल्या रस्त्यांचं. अगोदरच ओबडधोबड खड्ड्याखड्ड्यांचे रस्ते, फार काही विशेष न वाटणारे रस्ते आणि मी दुरावला गेलो कारण मामाच वारला. मामाला कॅन्सर झाला आणि बघता बघता मामा निघून गेला आणि त्याबरोबर त्या मामाच्या गावातले रस्तेही संपले. मामा मला काय काय देत होता हे तेव्हा मला कळालं. तो नुसताच व्यक्तिगत प्रेम देत नव्हता तर तो रस्त्यांवर प्रेम पेरत होता. मामा होता तोपर्यंत रस्ते जिवंत वाटत होते. मामा गेल्यावर खिन्न होऊन मी बरीच वर्षे तिकडं फिरकलो नाही. परवा तासगावच्या रथोत्सवाच्या निमित्तानं कोल्हापूरहून वसगड्याला गेलो. वेगळ्या रस्त्यानं, भिलवडीवरून. मामी थकलेली, सुना आलेल्या. मी आत जाताना म्हैस बुजली. मला आतच जाऊ देईना. तेच घर.

''मामी गरम भाकरी देशील ?''

''हो, राहणार ना आज ?''

''कुठला राहतो मामी, व्याप फार वाढलाय. मामाची खूप आठवण होते गं इथे आल्यावर;'' माझे डोळे भरून आलेले. ''होय, पण काय करणार बाबा'' म्हणत मामीनं जेवू घातलं. मामीनं फार पचवलं होतं. लहानपणी आमच्यावर पोटच्या पोरासारखं प्रेम केलेलं – मी तिला नमस्कार करून पुन्हा एकदा त्या वसगडे तासगाव या रस्त्यावरून तासगावला येतांना – मामाबद्दलचे, लहानपणीच्या त्या दिवसाबद्दलचे सारे विचार मनात उचंबळून येत होते. वाटत होतं, काय राहिलंय आता, कशाला यायचं पुन्हा पुन्हा इकडे? पण माझ्या मनातले रस्ते अचानक जिवंत झाले. मामाच्या गावाकडं नेणाऱ्या रस्त्यावर माझी नजर गेली. जणू काय तो मला म्हणत होता, ''अरे मामा गेला असला तरी मी जिवंत आहे की; काय काळजी करतोस? मला भेटायला येत जा, नाहीतरी मामाच्या आठवणी मीच तुला सांगणार. दुसरं कोण सांगणार?''

मामाच्या गावातल्या मनातल्या छोट्या रस्त्यावरच्या शंकर अण्णानं पुन्हा एकदा मूठभर शेंगा खिशात घातल्या आणि मला अश्रू अनिवार झाले.

माझ्या लक्षात आलं हे रस्ते निर्जीव नाहीतच मुळी. हे रस्ते सजीवपणानं आपल्या मनात कार्यरत आहेत. त्यांचं ऋण आहे माझ्यावर. कारण ते रस्ते म्हणजे त्याच्या आजूबाजूची घरं, त्यात राहणारी माणसं यांना जोडणारे दुवे असतात. रस्ते शरीरातल्या रक्तवाहिन्यांसारखे वाटतात मला. रस्त्यांना त्या दृष्टीनं महत्त्व द्यावं असं मला वाटायला लागलं.

आपण ज्या रस्त्यानं नेहमी कामाला जात असतो वर्षानुवर्षे, तो रस्ता किती महत्त्वाचा असतो आपल्या जीवनात, याचा कधी विचारच करत नाही आपण. पण एखादे वेळी मंत्री येणार म्हणून पोलीस सुरक्षेसाठी बंद करतात तो रस्ता. आपणाला दुसरा मार्ग दाखवतात. मग आपण हिरमुसले होतो. लांबच्या वाटेनं आपण कार्यस्थळी पोहोचतो आणि आपल्याला चुकल्या चुकल्यासारखं वाटतं दिवसभर. आपला हक्क कुणीतरी हिरावून घेतलाय अशी भावना होते. का होतं असं? कारण त्या रस्त्याचं आणि आपलं एक जिवंत नातं असतं. अस्पष्ट. जाणिवेपलीकडचं. आपण येताना आपल्या फुलवाल्याला हात करणार असतो. वाटेत आपल्या ओळखीच्या दुकानात खरेदी करणार असतो. डब्याबरोबर जाताना हिनं थोडी केळी विकत घ्यायला सांगितलेली असतात. परवा केळीवाल्याचे राहिलेले दहा रुपये त्याला परत द्यायचे असतात. शनिवार असल्यानं कोपऱ्यावरच्या मारुतीला बाहेरूनच का होईना नमस्कार करायचा असतो. मित्राला वाचायला दिलेलं पुस्तक परत घेऊन त्याचं त्या पुस्तकाबद्दल मत विचारायचं असतं. सगळंच राहून जातं आणि मग तो रस्ता आपल्या जीवनात महत्त्वाचा कसा हे हळूहळू

पटायला लागतं.

मी पाच वर्षाचा असेन. खरसुंडी नावाच्या खेडेगावात वडिलांची बदली झाली होती. मला सारं पुसटच आठवतंय. एकच रस्ता होता तेव्हा गावात. आता गाव वाढलं असेल. अनेक रस्ते झाले असतील, पण तेव्हाचा तो एकच रस्ता मला अजून आठवतोय. एका टोकाला शाळा आणि दुसऱ्या टोकाला नाथाचं देऊळ.

मोठं प्रसिद्ध जुनं देऊळ. मध्ये उजव्या बाजूला आमचं जुनाट कौलारू भाड्याचं घर. पुढ चालत गेलं की गावच्या पोलीस पाटलाचा वाडा डाव्या हाताला आणि समोर नाथाचं मंदिर. पोलीस पाटलाकडे पुरणपोळ्या केल्या की मला बोलवावं लागायचं नाही. मी तिथंच असायचो. त्यांच्याकड जाऊन बसलं की आई बाबा रागवायचे मला. शाळेत मला घेत नसत. तेव्हा पाच वर्षाच्या मुलांना शाळेतून हाकलून काढीत. मी चिडायचो. मला वर्गात घेत नाहीत म्हणून. एकदा एका मुलाला चावलो म्हणून एका सरानी लहान मुलांना मारू नये एवढं मला मारलं. ते मात्र मला आठवतंय. त्या रस्त्यावरून मी पळत सुटलेला. जोरजोराने रडत. मला अजून आठवतं. असं मारणं चालायचं तेव्हा शाळेत. मी आईला बिलगलो. घाबरलेला भेदरलेला मी. मग मी त्या शाळेत जायचाच बंद झालो. एका बालवाडीत जाऊ लागलो. बालवाडीत कलेक्टर येणार म्हणून दोन दिवस मोठा उत्सव चालू होता. वर्गात पताका लावलेल्या. आमच्याकडून कापून घेतल्या होत्या पताका, रांगोळी काढलेली. आठला येणारे कलेक्टर अकरापर्यंत आलेच नाहीत. हे ऐकल्यावर मी वर्गातून त्या रस्त्यावरून पळतच सुटलो आणि मंदिर गाठलं. मंदिरात कलेक्टर आणि इतर अमलदार उभे होते. माझे वडील गावचे सर्कल होते. तेही उभे होते. कलेक्टर कोण ते मी विचारलं आणि चक्क जाऊन त्यांचा हात धरला. त्यांना जाब विचारला.

''का आला नाही बालवाडीत?''

''कुणाचा मुलगा?'' कलेक्टरनी विचारलं.

माझे वडील पुढं आले. कलेक्टरनी पाठीवर थाप मारली. पुन्हा येतो म्हणाले. मग मी त्यांच्याबरोबर बराच फिरलो. पोलीस पाटलांकडे पुरणपोळी व गुळवणी खाल्ली. आणि त्याच रस्त्यानं घर गाठलं. घरी आल्यावर थोडी भीती वाटली. चुकलो काय आपण? रात्री वडील आले. मी त्यांना चुकवीत होतो. त्यांनी बोलावलं. म्हणाले, ''कलेक्टर खूप खुश आहेत तुमच्यावर.'' मी वडिलांच्या दंडावर डोकं ठेवून झोपी गेलो.

हे सगळं आठवतांना तो रस्ताही मला आज प्रकर्षानं आठवतोय. त्या रस्त्यावर

ह्या साऱ्या आठवणी सांडल्या असाव्यात असं मला वाटतंय.

नाथाची यात्रा मोठी. गुलाल, खोबरं उधळणं, चांगभलंचा गजर, हजारो लोक त्या छोट्या गावात येत असत. तो रस्ता लोकांनी दुथडी वाहायचा. त्या दिवशी मी चुळबुळ करीत असायचो. आई घाबरायची. मी चुकेन गर्दीत असं वाटायचं तिला. मला गूळ खोबरं देऊन खिडकीत बसवायची. खिडकीतून नीट दिसायची नाही पालखी. मी बाहेर जायला बघू लागलो की माझे दोन्ही हात धरून ती मला कॉटला बांधून घालायची. पण त्या पाठीमागं जपणं असायचं. यात्रेची गर्दी कमी झाल्यावर आई मला सोडायची आणि मी त्या रस्त्यावरून पळत सुटायचा. रात्री पाटलांकडं गुळवणी व पोळी असायचीच.

या साऱ्या मला विशेष काही कळत नसतांनाच्या आठवणी. त्या रस्त्याशीच निगडित आहेत. प्रत्येक वेळेला मी आणि तो रस्ता एवढेचं होतो असं वाटतंय. तेव्हा पुरणपोळी खायचो ते पाटील कुठं आठवतायत मला? तेव्हाचे घरमालकही आठवत नाहीत. विशेष म्हणजे तेव्हा खरसुंडीत माझा एक वर्षांचा छोटा भाऊ झटके येऊन वारला त्याचा तोंडावळाही मला नाही आठवत. पण मला आठवतो तो रस्ता. माझ्या मनात तो रस्ता मला स्पष्ट दिसतो. आता मी तिथं गेलो तर काय असेल? पस्तीस वर्षांचा काळ लोटलाय. आमचं घर पाडून कदाचित् नवीन बांधलं गेलं असेल. पाटील नसतीलही किंवा असतीलही पण मी त्यांना किंवा ते मला ओळखणारही नाहीत. फक्त रस्ता तो असेल. त्यावर कदाचित् डांबरी आवरण असेल. त्यांच्यावरून अनवाणी पायानं मी चाललो तर त्या डांबरी आवरणामुळे पूर्वीच्या 'त्या' रस्त्याचा स्पर्श मला कळणारही नाही कदाचित्! म्हणून माझं धाडसच होत नाही त्या रस्त्याला जाऊन स्पर्श करण्याचं. कोण जाणे माझ्या मनातील 'तो' रस्ता या नव्या आवरणाच्या रस्त्यानं पुसून टाकला तर मी कुणाकडे मागू माझा रस्ता परत? त्यासाठी मी तिकडे जात नाही.

तासगावचे दोन तीन रस्ते असेच माझ्या मनातील कप्पा व्यापून टाकतात. वडील राजवाड्यात दिवाणजी असताना राजवाड्यातून गणपती मंदिरात जाणारा तो रस्ता. बाहेर पडल्यापडल्या समोर डाव्या हाताला सिद्धेश्वर मंदिर. उजव्या हाताला वळलं की रामविलास हॉटेल. तेव्हा नवं असलेलं पण आता जुनं झालेलं. हॉटेलमध्ये जाणं वाईट असं समजला जाणारा काळ तो. आता बारमध्ये जाणंही तितकं वाईट न समजणारा काळ आला. तेव्हा दहावीत होतो मी. चोरूनसुद्धा आम्ही मित्रमंडळी हॉटेलमध्ये जात नसू. उजव्या हाताला पानाचंद थिएटर. सिनेमा मात्र आम्ही खूप पाहायचो. आठ बारा आणे तिकीट. दहा पंधरा दिवसातून बदललेला सिनेमा दाखवणं वडिलांनाही फारसं

अशक्य नव्हतं. बरोबर थिएटर समोर शनीचं मंदिर. शनीच्या घंटेचा नाद वेगळाच वाटायचा त्या वेळी. आवाजाने मनातले वाईट विचार नाहीसे व्हायचे. आता घंटानादानं मनातले विचार जात नाहीत. जरा पुढं गेलं की उजव्या हाताला चावडी. आणि त्याच्या समोर जोगांचा जुना वाडा. पडका वाडा. त्या वाड्यात आतल्या बाजूला डागडुजी केलेलं चहावाल्या जोश्यांचं घर. त्यांची दोन्ही मुलं माझी मित्र झाली. अजूनही आम्ही भेटलो की मनानं त्या वाड्याच्या गच्चीत बसून तिथल्या आठवणींची गाणी गातो. त्या बालपणीच्या निरागस आणि भरभरल्या काळाच्या आठवणी आताच्या बिथरलेल्या जनजीवनाच्या पार्श्वभूमीवर मनाला गार वाऱ्याच्या झुळकेसारख्या वाटतात. आमच्या डोळ्याच्या कडा पाणावतात. 'गेले ते दिन गेले' या गाण्याची धुन मनात पिंगा घालू लागते. त्या रस्त्याशी नाळ अजूनही न तोडलेले ते 'जोशी बंधू' मला अजून त्या रस्त्याला जिवंतपणा जाणवून देतात.

पुढं गेलं की समोर हटकेश्वराचं मंदिर. त्या मंदिरात एक भयाणपणा साठवलाय असं मला तेव्हाही आणि आताही का वाटतं ते सांगता येत नाही. मी कधी तिकडं वर आठवणीनं गेल्याचं फारसं स्मरतही नाही. समोर चालत गेलं की पोस्ट. जुनं पोस्ट पाडून नवीन बांधलेलं. त्याच्या समोर आमचं आजोळ. वडिलांचे वडील राहत असत तो वाडा. फारच जुन्या आठवणींचा वाडा. पण त्या आठवणी काळाच्या ओघात विरून गेलेल्या. रस्ता रुंदीसाठी आजोबा राहात होते तेवढाच भाग भुईसपाट झाला आणि आजोबांच्या घराबरोबरच त्या काळातील आठवणी मनातून आणि प्रत्यक्षातूनही निघून गेल्या. डाव्या बाजूला मुलींची शाळा आणि इथून मंदिराचा गोपूर दिसायला सुरुवात व्हायची. मग मंदिर एके मंदिर. मंदिराचा डावा भाग. सरळ जाऊन उजव्या बाजूला वळलं की तीन मजली रथ आणि पुढ गेलं की समोर गणेशमूर्ती, उजव्या सोंडेची; आणि अतिशय सुरेख असं मंदिर. असा ह्या रस्त्याचा प्रवास. आठवणींच्या वाटेवरून! त्याची सुरुवात घरून, राजवाड्यातून व्हायची आणि त्याचा शेवट गणेशमूर्तींच्या पायाशी व्हायचा. रोज एक दोनदा तुडवला जायचा हा रस्ता. या रस्त्याचा स्पर्श अजून ताजा ताजा. परवाच सहा महिन्यांपूर्वी रथोत्सवानिमित्त जाऊन आलो त्या रस्त्यावरून. फारसा न बदलेला रस्ता. ह्या रस्त्याचं ऋण मी कसा विसरू? माझ्या बालपणातून तारुण्यात मी पदार्पण केलं ते या रस्त्यावरून. मी अमुक वडिलांचा मुलगा ही ओळख पुसून स्वतःच्या नावाची ओळख लोकांना करून दिली तो हा रस्ता. माझ्या जीवनाच्या दिशा बदलल्या गेल्या त्या ह्याच रस्त्यावर. ह्याच रस्त्यावरून चालत चालत मी अकरावी पास झालो आणि माझा रस्ता बदलला तो कायमचाच. मग माझ्या बालपणीच्या या रस्त्यांशी वास्तवातला संबंध

संपला आणि ते आठवणींचे सोबती बनले.

या रस्त्याच्या मानानं तासगावातील इतर रस्ते मला तेवढे नाही रुचले. गणपती मंदिरापासून समोर गुरुवार पेठेकडे काशीविश्वेश्वर मंदिराकडे जाणारा मोठा श्रीमंत लोकांचा रस्ता. या रस्त्यावरून गेली दोनेकशे वर्षे रथाचा प्रवास होतो. गणेशमूर्ती रथामधून आपल्या पित्याला भेटायला काशीविश्वेश्वर मंदिराकडे जाते. रथ लोक ओढतात. मोठा उत्सव असतो. मीही रथ ओढतो. पुण्य मिळते म्हणे त्यामुळे. खूप गर्दीचा हा रस्ता. या रस्त्यावर एकदा एक दुर्घटना घडली. मी धड मोठा नव्हतो धड लहानही नव्हतो. रथ उलटला आणि लोक चेंगरले गेले. एक दोन गेले. माझ्या वडिलांना जबर मार बसला. खुब्यातून हाड निसटलं. फार वाईट दिवस गेले. नंतर पुन्हा सर्व व्यवस्थित झालं. रथ नवा केला. वडिलांनी अहोरात्र प्रयत्न केला. पण त्या रस्त्याबद्दल त्या दिवसानंतर एक घृणास्पद भाव निर्माण झाला. तो रस्ता आठवला की एका जुन्या जखमेवरची खपली निघते. मग वाटतं नकोतच त्या रस्त्याच्या आठवणी.

बालपणीच्या आणखी एका रस्त्याची आठवण मला प्रकर्षाने यायची. तो रस्ता जत गावातील. जत गाव सोडून सत्तावीस वर्षे झालेली. चौथीचा काही काळ, पाचवी, सहावी, सातवीचा काही काळ अशी जेमतेम तीनेक वर्षे जतला घालवलेली. जतच्या पंगुबाईच्या वाड्यात आम्ही राहात असू. सकाळी सातला रामराव विद्यामंदिरला यायचं असायचं. घराकडून मुख्य रस्त्यानं जायचं म्हटलं तर शाळा खूप लांब पडायची म्हणून 'शॉर्टकट' मारून घराच्या मागच्या बाजूनं एका पडलेल्या जुन्या बुरुजावरून खाली उतरत, नंतर एका शेतातून पायवाटेवरून सरळ शाळेच्या जवळच्या रस्त्याला येऊन मिळायचो. तरीही शाळा लांबच वाटायची मला. छोटी पावले असणार आणि छोटेच पाय. त्यांनी इतकं चालायचं म्हणजे लांबच अंतर.

तर हा रस्ता. खरं तर हा रस्ताच नव्हता. निम्मी वाट तर बुरुजाच्या विखुरलेल्या दगडावरून चढत उतरत, नंतर शेतातली पाऊलवाट आणि मग निम्मी वाट पक्का रस्ता. पण त्या पडलेल्या बुरुजावर रस्ता नसला तरी तोच रस्ता म्हणून माझ्या मनात घर करून बसलाय. सकाळी सातला शाळेत पोहोचायचं म्हणजे साडेपाचपासून आईची गडबड सुरू व्हायची. आंघोळी करून, चहा पिऊन निघायचं आणि तो रस्ता तुडवत शाळेला यायचं. शाळेत लाल माती, त्यावर भरपूर खेळायचं आणि दुपारी बारा वाजता अंगावर तांबड्या मातीचे कण घेऊन चालत सुटायचं. दप्तराचं ओझं वाटायचं. उन्हाचे चटके बसायचे. पोटात कावळे ओरडायचे. घरी कधी एकदा पोहोचतो असं वाटायचं. असह्य व्हायचं. मग ते शेत लागायचं. शेतात रताळीचे वेल लावलेले असायचे. रताळी मुळांना लागतात

हे तेव्हापासून माहीत झालेलं. कुणीतरी कुदळ मारून वेल उपडावा आणि खालची चार रताळ मला खायला द्यावी असं रोज वाटायचं मला. कारण तिथवर येईपर्यंत मी पार पेकाळलेला असायचो आणि मला तो बुरूज चढायचा असायचा. घरी गेल्यावर आईबरोबर भरपेट जेवायचं या विचारानं तो बुरूज चढायचो. घरी आल्यावर आई मोठ्यांदा ''आलाऽऽ गं ऽऽ बाई'' म्हणायची व मला वाढू लागायची. तिला कळायची माझी तगमग. तशी तगमग कळणारी माणसं आयुष्यात पुन्हा भेटत नाहीत. ती माणसं फक्त या असल्या रस्त्यावर भेटतात. पुन्हा आपण मोठे होतो, रस्ते मोठे होतात, घरं मोठी होतात. पण त्या रस्त्यांवर एकाचं दुःख दुसऱ्याला समजणारी माणसं कुठं असतात?

या रस्त्यानं खरं तर मला सहनशीलता शिकवली. मनातले रस्ते हे मोठाले रस्ते असावे लागत नाहीत. त्या पाऊलवाटाच असतात याची जाणीव करून देणारा हा रस्ता. ह्या रस्त्याची काय ओढ होती मला कोण जाणे पण सत्तावीस वर्षानंतर मला अगदी तीव्रपणे वाटू लागलं की मी या रस्त्याला पुन्हा भेट द्यावी. जी जी माणसं ओळखतील ती ती पुन्हा भेटून घ्यावीत. नाहीतर सारेचं काळाच्या ओघात नाहीसं होईल.

सत्तावीस वर्षानंतर मी निघालो जतला. सर्वांनी मला वेड्यात काढलं. हिनं तर बंडच केलं. पण माझ्या मनातलं हे रस्त्याचं वेड इतकं ताकतीचं होतं की हिचंही काही चाललं नाही. थेट जत गाठलं. गेस्ट हाऊसमध्ये राहिलो, जुना मित्र गाठला आणि शाळा, शाळेतील लाल माती, तेव्हाचे पोतनीस सर, बाई सारी माणसं डोळे भरून पाहून घेतली. सत्तावीस वर्षानंतर. सरांना मी विचारलं, ''सर, तेव्हा मी तुम्हाला त्रास देत होतो का हो?'' आणि सर जे हसले, ते हास्य त्या रस्त्यावरून सांडत गेलं. मग मी आणि मित्र तो रस्ता वेड्यासारखा फिरलो, एकदा, दोनदा...काहीच बदल नव्हता त्या 'शॉर्टकट' रस्त्यात जसाच्या तसा रस्ता. तितकाच प्रेमळ, तितकाच जिवंत. माझ्या मनात एक कविता तरळून गेली तेव्हा...

'या रस्त्यावरूनी जेव्हा मन होते विखरुनी गेले.
त्या रस्त्यावरुनी आता कण कण मी वेचित आहे.
या रस्त्यावरुनी जेव्हा दुडदुड मी पळलो होतो
मातीतून सोन्याचे ते कण कण मी वेचित आहे.
या रस्त्यावरुनी जेव्हा धुमसत मी रडलो होतो
डोळ्यातील अश्रू आता तेव्हाही साक्षी होते.
अंगावर तेव्हा माझ्या शाळेतिल माती होती.

स्वप्नात आता मी हल्ली कण कण तो वेचित आहे.
अंगावर जिरल्या वस्त्रांची गरीबी आठवत आहे.
बाहूत स्फुरावी असली श्रीमंती भोगित होतो.
चंद्राला माहित आहे सूर्याची साक्ष मी देतो
दुःखी कधीच नव्हतो गरीबीची साक्ष मी देतो.
कुणि म्हणोत मजला वेडा, ते रस्ते मी चुंबित होतो.
ओठावरूनी माझ्या कण कण ते उचलित होतो.
ओठावरूनी माझ्या कण कण ते उचलित होतो!

●●●

दहा दिवस

एकदमच अतितीव्र इच्छा मनात निर्माण झाली. फुटलेल्या धरणातील पाण्याच्या लोंढ्यासारखी... थांबायचं. इथं थांबायचं. आहे तसं थांबायचं. किमान दहा दिवस. या दहा दिवसात पूर्ण अलिप्त व्हायचं. जगातील सर्व मोहापासून, सर्व भौतिक साधनांपासून दूर जायचं. त्या वेळी बाप राहायचं नाही, नवरा, डॉक्टर, कुणाचा मुलगा राहायचं नाही. माणूस – एक आदर्श माणूस म्हणून जगायचं – निसर्गाचाच एक भाग बनून. गत आयुष्याकडं परीक्षकाच्या भूमिकेतून पाहायचं. पुढच्या आयुष्याच्या दृष्टीनं गांभीर्यानं विचार करायचा. मानसिक, शारीरिक आणि आत्मिक बळ वाढवायचं.

ठरलं. क्षेत्र महाबळेश्वराच्या काडसिद्धेश्वर महाराजांच्या मठात राहायचं. त्यांच्याकडे जाऊन चिठ्ठी आणली. त्यांना हेतू सांगितला. त्यांनी आशीर्वाद दिला. येथूनच आत्मिक बल वाढायला सुरुवात झाली.

काकांना भेटलो;

''काका, हे भौतिक जीवन दहा दिवस थांबविण्याचा प्रयत्न करणार आहे.''

''कसा?''

''आहे शक्य.''

''कशाकरिता.''

''तटस्थेनं त्याकडं पाहण्याकरता, त्यातच राहून त्याकडं पाहता येत नाही.''

''ठीक आहे.'' काकांच्या चमकणाऱ्या डोळ्यांनी मला परवानगी दिली.

पण एकूणच हे जाणं इतरांना रुचत नव्हतं. शंका घेतल्या जात होत्या. हे जाणवलं. एकटं जाणं, एकटं राहणं, एकटं विचार करणं ही समाजाच्या दृष्टीनं चुकीची गोष्ट आहे हे जाणवलं. कारण सर्वच तसे वागायला लागलो तर समाजाचं अस्तित्व धोक्यात येईल.

माझ्या एक प्रिय मित्राला माझं मनोगत सांगितलं.

''मी जातोय, एकटा, दहा दिवस – आश्रमात.''

मित्र दोन मिनिट शांतच. शून्यात नजर लावून बसला.

''बोलत का नाहीस?'' – मी

''नाही – थोडं विचित्र वाटतंय.''

''काय विचित्र वाटतंय?''

''असं सहसा कोण करत नाही.''

''म्हणून ते चुकीचं आहे?''

''तसं नाही''

''मग काय''

''काय करणार आहेस?''

''आत्मपरीक्षण, सिंहावलोकन, पुढचं प्लॅनिंग.''

''इथं राहून नाही करता येत?''

''नाही येत, खवळलेल्या समुद्रात राहून त्याचं परीक्षण नाही करता येत.''

''उदाहरणं देऊ नकोस, पुढं...''

''पुढं काय... चाललो – मंगळवारी''

''येणार कधी?''

''दहा दिवस. जसं राहायचं आहे तसं जमलं नाही तर एक-दोन

दिवसातच परत येईन.''

''निदान तीन दिवस तरी राहा. नाहीतर विचित्र दिसेल.''

त्याची मदार कसं दिसेल यावरच होती.

''एका दूरच्या भावाकडं गेलो.''

''बांधकामाचं सर्व तू बघ.''

''का?''

''मी चाललोय मंगळवारी.''

''कुठं?''

''आश्रमात.''

''किती दिवस?''

''दहा दिवस.''

''ठीक आहे जा. काय करणार ते आता सांगू नको. परत आल्यावर भेट.''

त्यानं फारच सडेतोड चर्चा केली.

आता बायको.

''असा-असा विचार आहे.'' मी

''जायचं नाही,'' नेहमीचाच आडणा.

हा विरोध मला अपेक्षितच होता.

''मी ठरवलंय.''

''तुम्ही कोण ठरविणारे?''

''माझ्या स्वतःच्या जीवनातल्या दहा दिवसांचा उपयोग कसा करावा हे मी ठरवू शकतो.''

''माझा काहीच हक्क नाही तुमच्यावर?''

''हक्क गाजविण्यात तुझा जन्म गेला. हे बघ ह्या दिवसांवर तुझा मुळीच हक्क नाही.''

''कुठं चाललाय?''

''क्षेत्र महाबळेश्वर. आश्रमात.''

''कधी परतणार?''

''नक्की सांगता येत नाही दिवस, पण दहा दिवसानंतरचा धर ''

'' मी येणार तुमच्याबरोबर.''

'' मला सर्वांपासून दूर जायचं आहे. अगदी स्वतःपासून सुद्धा.''

'' ही धमकी तर नव्हे!''

'' मुळीच नाही. पूर्ण सामर्थ्यानिशी परतायचं आहे.'' माझे डोळे ओलसर. मी पूर्ण व्यापलेला, मनाच्या पिंजऱ्यात अडकलेल्या पक्ष्याप्रमाणे. इतर सर्व उत्तरांपेक्षा माझ्या डोळ्यात तिला उत्तर मिळालं असेल.

'' जा, पण माझं काही चुकलं का?''

'' नाही, मुळीच नाही.''

आणि काय आश्चर्य. सकाळी ७.१५ च्या कोल्हापूर - महाबळेश्वर गाडीत बसलो. जाताजाता दोन्ही पोरांचे मुके घेतले. हिचा हात हातात घेतला आणि मी निघालो. धरण फुटल्यावर पाण्याचा लोट जसा निघतो तसा निघालो. माझं भौतिक-व्यावहारिक जीवन आहे तिथं थांबविण्यासाठी निघालो. एका वेगळ्या कल्पनेनं आणि भावनेनं निघालो. इथं प्रतिज्ञा नव्हत्या पण जोर होता. आशीर्वाद होते.

0 एक 0

गाडी चालली आणि मी दगडासारखं मन केलं. एक अव्यक्त भिंत उभी केली व भूतकाळ विसरण्यासाठी सर्व ताकत एकवटली. गाडीत देशपांडे नावाचे मित्र भेटले. साताऱ्यापर्यंत वेळ मजेत गेला. सहा तासात मन मुळीच विचलित झालं नाही. निर्णयाबद्दल खेद नव्हता. महाबळेश्वरच्या स्टॅण्डवर एक सिगारेट ओढली व ठरवलं आता बंद. स्वामींची चिठ्ठी घेऊन पार्टेंच्याकडं गेलो. पार्टेंचं मोठ हॉटेल. त्यांनी चिठ्ठी वाचून स्वामींच्या फोटोजवळ ठेवली. डोळे मिटून फोटोला नमस्कार केला आणि मला जेवण दिलं. पैसे घेईनात. मी वीस रुपयाची नोट पुढं केली. ''पैसे घ्या''

''कसले.?''

''जेवणाचे.''

''स्वामींच्याकडून आलाय.'' पार्टे.

''म्हणून काय झालं?'' व्यवहार अजून जिवंत होता.

''गप्प बसता काय?'' पार्टेंनी विषय संपविला.

आणि मी एका वेगळ्याच जगात प्रवेश करतोय असं वाटू लागलं. अव्यावहारिक जग– जिथं श्रद्धा आणि भावना याचं राज्य चालतं. त्या जगात शिरल्यासारखं वाटू लागलं. टॅक्सीवाल्यानं निम्म्या पैशात आश्रमात आणून सोडलं.

मी कल्पना केली होती त्यापेक्षा फारच सुंदर असा आश्रम होता. दोन्ही बाजूला दहादहा अ‍ॅटॅचड् खोल्या होत्या. मध्ये समोर श्री सिद्धरामेश्वर महाराजांच्या पादुका व फोटो. त्यापुढं फुलझाडांचा चौक व पुढे हौद. वातावरण थंड होतं आणि समोरच श्री महाबळेश्वराचं पवित्र मंदिर आणि सात नद्यांचं उगमस्थान. भोवताली सर्वत्र घनदाट जंगल. आकाश निरभ्र होतं.

माझं सामान एका चांगल्या रूममध्ये ठेवून टॅक्सीवाला निघून गेला.

आश्रमातल्या बाईनी मला तांब्यातून प्यायला पाणी दिलं.

‘‘फार गोड पाणी आहे हो.’’

मी त्या आश्रमातल्या बाईंना म्हणालो.

‘‘गायतोंडातलं पाणी आहे.’’ बाई म्हणाल्या.

गायतोंडातलं म्हणजे सात नद्यांच्या उगमातून येणारं पाणी एका गायीच्या तोंडातून बाहेर सोडले आहे. ते पाणी नंतर एका हौदात सोडलं आहे.

या वातावरणात आल्यावर माणसातलं देवत्व जागं व्हायला कशाला वेळ लागेल? माझं भौतिक मन इथेच पहिल्यांदा खचलं आणि आत्मिक आनंदानं स्वैरपणे इकडे तिकडे फिरू लागलं. विसरलो. खऱ्या अर्थानं मी कोल्हापूर विसरलो.

संध्याकाळी प्रथम श्री महाबळेश्वर मदिरात शंकराचे दर्शन घेतले. एक शबनम बॅग गळ्यात अडकवली. त्यात एक वही, पेन, वाचायला एखादं पुस्तक, एक बिस्कीटचा पुडा आणि एक नॅपकिन घेतला व चाललो फिरायला. एकाला विचारलं, ‘‘जवळ फिरायला काय आहे?’’

‘‘साहेब सरळ जावा. त्या जंगलातल्या वाटेनं. एक दोन बंगले लागतील, त्याच्या पुढं जावा. चांगली जागा आहे.’’ मी त्या जंगलातून एकटा निघालो. संध्याकाळी साडेपाचलासुद्धा एकाकी वाटावं. भयानक वाटावं असा एकांत. चिमण्यांचे आणि त्याहीपेक्षा इतर अनेक पक्ष्यांचे आवाज. पण भ्यायचं कुणाला?

स्वतःलाच भिऊन मी इथं आलेलो. निसर्गाशी एकरूप व्हायला. हळूहळू ते पक्ष्यांचं ओरडणं मला ओळखीचं वाटायला लागलं आणि मी धाडसानं पुढं चालत राहिलो. थोडं पुढं गेलो– एका टेकडीवर एक बाक टाकलेला. किती वर्षे त्या बाकावर

कोणी बसलं होतं की नाही कोण जाणे! मी गेलो त्या बाकावर धूळ झटकून बसलो. थंडी अंगाला झोंबत होती. समोर कृष्णेचं खोरं दिसत होतं. धोमचं धरण आणि त्याच्या दोन्ही बाजूला उंच पर्वतांमुळे तयार झालेली दरी. अवर्णनीय असं सौंदर्य दिसल्यावर माझे हात अनाहूतपणे शबनममधल्या डायरीकडं गेले आणि मी लिहू लागलो.

वृक्षांच्या हिरव्या रांगा

त्या काळ्या टेकडीवर भरभरून पसरलेल्या.

धोमच्या पाण्याची निळाई काळसर झालेली.

माझ्याजवळची बारीक सारीक खुरटी रोपटी स्तब्ध झालेली.

चिमण्या मात्र हळूहळू चिवचिवत होत्या.

मी बसलेला बाक किती दिवस बोडका होता?

थंड वारं झोंबत होतं.

या साऱ्यात मी कुठंतरी हरवलो होतो.

त्या हिरव्यागार झाडात?

का त्या काळ्या निळ्या पाण्यात?

का ती झाडं ते पाणी म्हणजे मीच झालो होतो?

मी उठलो तेव्हा सूर्य मला पाठमोरा दिसला.

अंधार पडू लागला. परत फिरणं भाग होतं. भारावल्यासारखं झालं होतं. शेजारी एकाकडं घरगुती जेवण, चहा, खाणं, सर्व लावलं होतं. त्याच्या घराच्या बाहेर पडवीत बाहेर जेवायला बसत असे. शेणानं सारवून रांगोळी काढलेलं घर मी गेल्या कित्येक वर्षात पाहिलं नव्हतं. रात्री त्याच्या घरी जेवायला गेल्यावर मला एकदम भारावल्यासारखं झालं. किती साधं पण किती पवित्र वाटत होतं तिथं. घर तसं जीर्ण झालेलं. तुळ्यांमधील फळ्या जुनाटपणा दाखवीत होत्या. गरीब दिसतोय बिचारा म्हणत मी जेवू लागलो. व्यायाम, सिगारेट न ओढणं, यामुळं भूक वाढलेली होती. बोलता बोलता विषय निझाला.

‘‘काय करता?’’ मी.

‘‘हॉटेल चालवतो.’’

‘‘तेवढ्यावर भागतं?’’ मी.

‘‘भागवायचं.’’ तो.

‘‘आपण काय करता?’’ तो.

''डॉक्टर आहे.''

''इथं विशेष?'' तो.

''चेंज.''

समोर एक ग्राउंडसारखी बऱ्यापैकी मोठी जागा होती. त्यात एक आड होतं.

''समोर तुम्हाला छान ग्राउंड मिळालंय हो खेळायला.'' मी.

''डॉक्टर ती माझीच जागा''

''काय सांगताय काय?''

''होय, त्यातली निम्मी जागा लाखो रुपयांना मागतायत, डॉक्टर. हॉटेलचा जमाना आलाय ना महाबळेश्वरात.''

मी जेवलो होता म्हणून बरं झालं; नाहीतर जेवण मध्येच थांबवायची पाळी आली असती. ज्याच्या निम्म्या प्रॉपर्टीची किंमत लाखो रुपये आहे तो गृहस्थ मला जेवायला घालतोय, शेणानं घर सारवून वर रांगोळी घालतोय, एक छोटंसं हॉटेल चालवतोय. काय लीनता! किती प्रेम! माझ्यासाठी काहीतरी करण्याची किती तळमळ आहे.

दोन पैसे मिळवून मी हॉस्पिटल बांधलं म्हणून जे काय वाटत होतं ते या माणसानं जिथल्या तिथं थांबवलं. भौतिक आयुष्याचा प्रवाह जिथल्या तिथं थांबवायला या माणसाची मोठी मदत झाली.

रात्री मुळीच झोप लागली नाही. खोकला थंडीमुळं वाढलेला. कुठलंही औषध आणायचं नाही असं ठरविल्यानं तसाचं आलेलो. या कुशीवरून त्या कुशीवर होत एक दोन पुस्तके डोळ्याशी धरून रात्र काढली. रात्रभर मनात येणाऱ्या अनेक विचारांना थोपवण्याचं काम चालू होत.

० दोन ०

सकाळी सहाला उठलो. पादुकांचं दर्शन घेतलं. चहा प्यायला आमच्या नव्या मित्राकडं गेलो. अजून बाहेर अंधारच होता. त्याला सांगितलं मला दोन कप चहा लागतो. थंडी मरणाची होती. शाल व स्वेटर आणि स्कार्फ अशा अवस्थेत मी फिरत असल्यानं कुत्री भुंकायची. माझ्यातला विचित्रपणा आणि हा माणूस इथला नाही हे त्यांच्याही

लक्षात आलं असावं.

मी कालच्याच पॉईंटवर सूर्योदयापूर्वी चालू लागलो. तिथून सूर्योदय चांगला दिसेल ही कल्पना होती. अंधार होता रस्त्यावर. चित्रविचित्र आवाज येत होते झाडाझाडातून. फक्त इथे कोकिळा नव्हत्या. तेवढी एक उणीव. आंब्याचं झाड शोधूनही सापडणार नाही. मी काल गेलेल्या टेकडीच्या थोडा पुढं गेलो आणि दोन मोठी कुत्री एकदम अंगावर आली. माझा अवतार किती विचित्र आहे हे त्यावेळी माझ्या ध्यानात आलं. मी स्कार्फ व शाल गुंडाळून पिशवीत टाकली. एक दगड कुत्र्यावर उगारला तरीही ती लांब उभी राहून भुंकतच होती. सूर्य वर आला. लाल लाल मोठाच्या मोठा गोळा आकाश फाडून वर आल्यासारखा भासला आणि एकदमच सर्व वातावरण बदललं. भीती गेली आणि अभय मिळाल्यासारखं झालं. माझी खरी भीती कमी झाली ती त्यानंतरच. त्या गोळ्यानं माझ्या अंतर्मनाला कुठंतरी चुचकारलं आणि बेभान झालो. अदृश्यच झालो. मन इतकं हलकं झालं की जाणीवरहित वाटलं. क्षणभर कुत्री भुंकायची थांबली. चिमण्या चिवचिवायच्या थांबल्या. नदी वहायची थांबली. आणि वारा उभा राहिला. जणू काय निसर्गात पूर्णार्थानं क्षणभर का होईना एकरूप झाल्याचा भास मला झाला आणि पुन्हा मी त्या बाकावर बसलो. शबनम मधल्या त्या वहीत शब्दानं क्षण बांधायचा अयशस्वी प्रयत्न मी करू लागलो.

मी बसलो जेव्हा तेथे आकाश पहाटले होते.
सडकेवर काळ्या तेव्हा अंधार सांडला होता.
झाडावर चिमणे पक्षी अतिधुंद पहुडले होते.
मी पहात होतो वाट त्यावेळी मुक्त मनाने.
बघण्यास तेज ते गोल मी आसुसलेला होतो.
चिमण्यांची चिवचिव झाली
कोकिळा गात निघाली
ती गुलाब लाली आली अन्
पृथ्वीही प्रेक्षक बनली.
तो आला जेव्हा वरती
मी होतो हरवून गेलो
गर्दीतून सर्व जणांच्या
परतुनि मी येत निघालो

चिमण्या मला म्हणाल्या, कोठे रे गेला होता?

सांगायचे खरे तर मी मलाच शोधीत होतो.

सांगायचे खरे तर मी मलाच शोधीत होतो.

मी स्वतः त्या उघड्या, बोडक्या, निसर्गाचाच एक भाग आहे हे प्रकर्षानं जाणवू लाभलं. एक डॉक्टर, एक व्यक्ती म्हणून उभे केलेले किल्ले ढासळू लागले. त्या चिमण्यांसारखाच मी आहे. या झाडांच्या सळसळणाऱ्या पानांसारखाच मी एक आहे. ह्या पानांसारखाच पिकून एक दिवस ह्याच निसर्गात मी एकरूप होऊन जाणार आहे. पायवाट तुडवीत पावलं पुढं येऊ लागली. आता कुठं जायचं? आश्रमात? तिथं काय करायचं? वाचायचं....

आत्तापासून काय वाचणार? काय करायचं तर फिरायचं, कंटाळा येईपर्यंत फिरायचं. पण इथं फिरायचा कंटाळाच येत नाही.

●●●

० तीन ०

त्या दिवशी एस.टी. नं महाबळेश्वर गावात गेलो. दहा दिवसासाठी एक जुनी सायकल भाड्याने घेतली. इतर किरकोळ खरेदी केली. खोकल्यासाठी औषधं घेतली. थोडी स्ट्रॉबेरी एका परडीत घेतली. द्राक्षं घेतली.

पांढरी ऊलची पर्स बघितल्यावर मुलीची आठवण झाली. तिनं पर्स आणायला सांगितली होती. ती पर्स विकत घेतली. दुपारचे बारा वाजलेले. सायकलने क्षेत्रमहाबळेश्वरला यायला निघालो. तब्बल बारा वर्षांनी मी प्रथमच सायकलवर बसत होतो. थोडा खोकलाही होता. त्यामानानं पहिली टांग मारल्यावर तोल गेला नाही हे विशेष!

थांबत थांबत, चालत, थोडं सायकलवर बसत सुंदर दृश्य पाहत कसाबसा मी परतत होतो. वाटेत भेटणाऱ्या स्थानिक लोकांशी मी गप्पा टप्पा करीत होतो. भात्यासारखी छाती हालत होती. पण ठरवलं होतं. जायचंच. इच्छाशक्ती मोठी होती. आठ किलोमीटर्स अंतर अर्ध्या तासात पार करून इथल्या नव्या मित्राकडं आलो.

''दमला काय?''

''नाही. विशेष नाही.''

''उगाच त्रास घेताय.''

''त्रास घेण्यासाठीच तर इथं आलोय.''

''पण सवय नाही तुम्हाला.''

''चांगल्या सवयी हव्यात की, माझा स्टॅमिना वाढवायचा आहे मला.''

''चांगली गोष्ट आहे.''

जेवणात रोज नवनवीन पण सात्त्विक पदार्थ तो नेमानं देत होता.

''दही ठेवा उद्यापासून.''

''डॉक्टर दुधाची पंचाईत आहे.''

''पोटात जळजळतं माझ्या.''

''प्रयत्न करतो.''

त्यानं रोज आठ कि. मी. लांबून गावातून दूध आणायला सुरुवात केली.

दुपारीही झोप अशी नाहीच. थोडसं डोळा लागल्यासारखं वाटायचं. पुन्हा खडखडीत जाग. पण दुपारी झोपलंच पाहिजे असं नव्हतंच. पेपर गावातून आणला होता. पेपर वाचल्याशिवाय कुठला डुलका लागतोय. आणलेली चार द्राक्षं खाल्ली. राहिलेली आश्रमातल्या छोट्या पोरीला दिली. खाण्यावरचं लक्ष कमी झालेलं होतं. त्या स्ट्रॉबेरी तशाच चार दिवस पडून कुजल्या. फेकून दिल्या.

जेवल्यानंतर बायकोनं खास भाजलेली बडिशेप आधाराला चांगली होती. सिगारेट ओढावी वाटली की बडीशेप खायचो. चघळत बसायचो.

बडिशेप, चहा सुटत नव्हता. चहा कसा सुटणार? आईनं कदाचित् चवथ्या–पाचव्या महिन्यातच दुधाऐवजी चेंज म्हणून दुधात थोडा चहा टाकून बाटलीतून पाजला असणार. चहा सुटायचं अवघड होतं. तशी पूर्ण विरक्ती तर कुठं हवी होती मला? मला काही संन्यास घ्यायचा नव्हता. किंवा वानप्रस्थाश्रमात जायचं नव्हतं. मला माझी आत्मिक ताकद वाढवून पुन्हा माझ्या नव्या कामाला जोमानं लागायचं होतं. त्यामुळे चहा, बडिशेप वगैरे सोडाव असंही वाटत नव्हतं. संध्याकाळी नव्या मित्राच्या मुलाबरोबर इथं जवळच एका जुन्या कृष्णा मंदिरात गेलो. मंदिर अतिशय जुनं वाटत होतं सुमारे १५०० वर्षांपूर्वीचं. भग्नावस्थेतील मंदिर. भयाण शांतता त्या मंदिराकडं दुर्लक्ष झालंय असं वाटावं. स्वच्छता नव्हती. पायऱ्या मोडलेल्या, उखडलेल्या. धनदाट जंगल, त्यात हे ओबडधोबड दिसणार मंदिर, संध्याकाळची वेळ. ते लहान पोरगं बरोबर होतं म्हणून बरं झालं. नाहीतर मी घाबरूनच गेलो असतो. समोर कृष्णेच्या खोऱ्याचं विहंगम दृश्य. खरं तर इतके चांगले लोक इथले पण हे मंदिर असं का? मला प्रश्न पडला. नंतर समजलं तिथं

जवळच स्मशान आहे. कदाचित् जंगलात वणवा पेटू नये म्हणून अशी बाजूची जागा निवडली असावी. स्वतःच्या सुंदर जीवनाचं असंच स्मशान करून टाकू लागलाय माणूस असं वाटलं. जीवनाचा उपयोग मंदिरासारखा करायचा सोडून स्मशानासारखा करणारी कमी का माणसं पाहतो आपण? त्या मंदिराचीच मला कीव आली.

हे जीर्ण मंदिरा,
तुझं हे दुभंगलेलं रूप
तुझ्या उखडलेल्या भिंती
तुझ्यातील तुटलेल्या, तोडलेल्या भग्न मूर्ती
तुझा भीषण एकाकीपणा
आम्ही किती रे दिवस पाहत बसणार?
चारी बाजूंनी तुझे फोटो घेत
तुझ्या आणखी पायऱ्या उखडत
किती दिवस आम्ही अशीच तुझी स्तुती करणार?
पुराणवस्तु, पुराणवस्तु म्हणत किती दिवस
तुझ्या जखमेवर मीठ चोळत राहणार?
तुझ्यातील भग्नमूर्ती आम्ही चोरून विकतो
माहीत आहे तुला?
कारण भग्न मूर्तीला चांगल्यापेक्षा किंमत चौपट येते.
अरे, आम्ही माणसं ही अशीच
आम्हीच तुला उखडून टाकणार
आणि आम्हीच तुझे फोटो काढत बसणार.
लोक म्हणतील तू निर्जीव आहेस, पण तू जिवंत प्रतीकाचं प्रतीक आहेस.
मनात आणलसं तर एका क्षणात आम्हाला उद्ध्वस्त करू शकशील.
खरं सांगू उद्ध्वस्त मंदिरा,
आजचा माणूस हा सुद्धा तुझ्यासारखाच
दुभंगलेला आहे, उखडलेला आहे.
तुझ्यापेक्षा जास्त एकाकी आहे.
वास्तवावर आपटून आपटून तो

तुझ्यापेक्षा जास्त रक्ताळलेला आहे.
खरं तर स्वतःच तो एक पुराणवस्तु झालाय.
तुझ्यापेक्षा पुराणवस्तु!
मंदिरा, परवा तुझ्यासमोर वेड्यासारखं वाढलेलं गवत
तो अबोल वेडा माणूस दिवसभर काढत होता.
जाताना तिथं त्यानं एक छानसं झाड लावलं
आठवतंय तुला?
तेव्हा मी तुझ्या पायथ्याची एक पायरी
चोरून नेत होतो.
तुझी सारी ताकत तू त्याला दे मंदिरा
तुझी सारी ताकत तू त्याला दे.

● ● ●

0 चार 0

आज गुरुवार. आजचा दिवस विसरणं तर अशक्यच. पुढच्या कितीही वर्षाच्या आयुष्यात कितीही बरेवाईट प्रसंग येतील आणि येवोत, पण आजचा दिवस मृत्यूला आणि जीवनाला दोन्हीलाही कुठंतरी चाटून गेल्यासारखा वाटला.

मधमाश्यांचं मधानं भरलेलं पोळं मधमाश्यांसहित हातात घ्यावं. मधमाश्यांनी आपल्यावर तुटून पडावं आणि तरीही हातानं पोळ पिळून त्यातील मध प्यावा असा पिला तो दिवस! तो मध तरी मधमाश्यांचा कुठं होता? त्यांनीही तो फुलातून उचलून आणला होता की.

पहाटे पाचला जाग आली. आज खूप लांब, आर्थर सीटकडे जवळजवळ १०/१२ कि.मी. सायकलनं जायचं होतं. लवकर निघायला हवं होतं. पण इतकं लवकर? मी अंगणात आलो. मठाच्या बाहेर रातकिडे किरकिरत होते. भयाण शांतता पसरली होती. खरं तर भयाण हा शब्द आणला कुणी इथं? मला भीती वाटते म्हणून भयाण? शांतता होती हे ठीक आहे. त्यातला भयाण शब्द हा मीच निर्माण केला. आणि त्या शांततेला भयाण म्हणालो.

जसे पाण्याने डोळे डबडबावेत, तसं चांदण्यानं आकाश डबडबलं होतं. एखादा अश्रू टपकन् पडावा तसा उल्कापात झाला आणि मी भानावर आलो.

चांदण्यांनो तुम्ही इतकी वर्षं चमकत आहात
पण त्याचं महत्त्व मला कळलंच नाही.
चिमण्यांनो, तुमच्या चिवचिवण्यातली जवळीक
मी कधी जाणूनच घेतली नाही.
अरे वाऱ्या, तुझ्याकडं तर मी तिरस्कारानंच पाहिलं.
सूर्याकडं मी तो तप्त असतांनाच
पाहण्याचा प्रयत्न केला.
चंद्राचा मी कैफ म्हणून उपयोग करून घेतला.
पण त्याचं दिव्यत्व कधी लक्षातच आलं नाही.
झाडांनो, तुमची सावली, फळ आणि
शरीर मी लुटलं
पण तुमच्या मिठीतला आनंद मी कधी
अनुभवलाच नाही.
डोंगरांनो मी 'दुरून डोंगर साजरे' म्हणत बसलो,
पण तुमच्या कुशीत कधीच विसावलो नाही.
आज एक गोष्ट समजली मित्रांनो
माणूस सगळं सोडून जर तुमच्याकडं आला
तर तो नक्की जगू शकेल, आनंदानं जगू शकेल.
कारण त्याला जगणं म्हणजे काय ते
समजलेलं असतं.
त्याला जगणं म्हणजे काय ते समजलेलं असतं.

आमच्या मित्राकडं आलं घातलेला चहा सकाळी ६ वाजता पिला. मला खोकला झालाय म्हणून तो आलं घालत असे. रोजच्या १५-२० कि.मी. सायकलींगनं खोकला कुठच्याकुठं पळून चालला होता.

''आर्थर सीटकडे जाऊ का एकटा?''

''जा पण, थोडं उशिरा जा.''

एवढंच बोलणं झालं. सहा वाजले होते.

उशिरा म्हणजे साडेसहा, पावणे सात एवढा अर्थ घेऊन मी उठलो. आंघोळ

केली. सहा पंचेचाळीसला टांग मारली. रोजच्या सायकलींगनं थोडा स्टॅमिना वाढला होता. दोन-तीन कि.मी. आलो आणि लक्षात आलं,

कुणीच नाही.
सूर्यही नाही आणि सूर्यकिरणंही नाहीत.
कोकिळा नाही आणि आंब्याची झाडं नाहीत.
वसंत नाही आणि माणूसही नाही.
फुलपाखरंही नाहीत आणि फुलंही नाहीत.

माणूस- मग तो कसलाही असला तरी अशावेळी हवा वाटतो. द्वेष करणारा, राक्षसी वृत्तीचा, लाच घेणारा अथवा देणारा, फसवणारा; कसाही पण एक दुसरा माणूस बरोबर हवा असं वाटू लागलं. ते भयानक जंगल मला माणसाची महती पटवून देऊ लागलं.

मी माणसापासून दूर आलो, आपल्या माणसापासून ते पुन्हा त्यांच्याकडं जाण्यासाठी. ह्या डोंगरात हरविण्यासाठी नाही. हे माझ्या लक्षात आलं. माझे पाय पुढं टाकवेनात. छाती फुटेल की काय असं वाटू लागलं.

नेहमी मी फक्त चिमण्यांची चिवचिव ऐकायचो. चिमण्या आमच्या स्वयंपाकघरात येत आणि माझा छोटू त्याला दाणे टाकी. चिमणी उडून गेली की सोनू मला रागवीत असे, ''बघा पप्पा. तुम्ही बोललात म्हणून चिमणी उडून गेली.'' आमच्या घराजवळील मोहोरलेल्या आंब्यावर कोकीळ नेहमी कुहू कुहू करायचा. किती गोड वाटायचं. पण आजचं हे भीषण स्वरूप एकट्यानं पाहतांना, अनुभवतांना सर्वांग थरथरत व थरारत होतं.

इथल्या पक्ष्यांचे आवाजही विचित्रच. एक पक्षी टाक्-टाक्-टाक्-टाक् असा आवाज करत होता. जणू माझ्या आयुष्याचं घड्याळच आता बंद पडणार होतं.

एक पक्षी घुटरु - हु - घुटरु - हु - घुटरु - हु असं करत होता. आणि बारीक सारीक चिमण्यांसारखे पक्षी चित्रविचित्र आवाज काढीत होते. माझ्या नेहमीच्या चिमण्या अजून झोपल्या असाव्यात.

वरती आभाळाला तांबडसर रंग फुटू लागला होता. माझ्या उजव्या बाजूला एकदम जोराची सळसळ झाली आणि मी इतका घाबरलो की यापेक्षा जास्त घाबरणं शक्य नव्हतं. मी तिथल्या एका दगडावर सायकल आडवी केली आणि तिच्या आडोशाला धापा टाकीत बसलो. जर काही आलं तर सायकल त्या प्राण्यामध्ये

अडकवायची या बेतानं. पुन्हा भीषण शांतता.धाड् –धाड् – धाड् – धाड् – हृदयाचा आवाज आणि भाता फुंकल्याप्रमाणे छातीचा आवाज.

इथं वाघ होते, गवा रेडे होते, कोल्हे होते, रानडुकरं होती, साप होते सर्व प्रकारचे प्राणी होते म्हणे. पण मला कोणीच काही सांगितलं नाही. आमचा मित्र म्हणाला होता ''फक्त उशिरा जा.''

शेवटी भ्यायचाही कंटाळा आला. मी एका सणकेसरशी उठलो. सायकल हाताशी धरली आणि चढ चढू लागलो. साडेचार कि.मी. आलो असेन. उतार लागला. सायकलवर बसलो व विजेच्या वेगानं जंगल कापीत चाललो. एका पठारासारख्या पर्वत टेकडीवर येऊन उभा राहिलो.

झाडावरून खार उतरावी तसा पायऱ्यावरून सर सर उतरून एका पॉईंटवर येऊन उभा राहिलो. तो होता एलफिन्स्टन पॉईंट. मला वाटतं त्या पॉईंटवर आतापर्यंत एवढ्या लवकर कोणी आलं नसेल.

इकडं सूर्य उगवायला लागला होता. सूर्य एका डोंगराआड असल्यानं दिसत नव्हता. पण त्याची किरणं हळूहळू त्या समोरच्या असंख्य टेकड्यांवर पडून त्या टेकड्या सोनेरी बनू लागल्या. पहिला प्रकाश किरण आज माझ्या साक्षीने समोरच्या टेकडीवर पडला.

मी जेव्हा तिथे पोहोचलो तेव्हा चिमण्या झोपल्या होत्या.
टेकड्यांना वाऱ्यांनी उठवलेलं मी पाहिलं.
सूर्यानं जेव्हा टेकड्यांवर प्रथम प्रकाशकिरणे टाकली.
तेव्हा टेकड्यांना मी डोळ्यात सामावून घेत होतो.
टेकड्यांनो, आज प्रथम मी तुमच्या पूर्वी उठलो.
तुमच्यापाशी असाच बसून राहिलो तर
कधीही मला कंटाळा येणार नाही.
पण मी असं बसणं योग्य नाही म्हणून
मी जातो.
पण पुन्हा तुम्हाला भेटायला नक्की येईन.
येताना पहाटवार आणि सूर्याची थोडी किरणं घेऊन येईन.

माझी भीती आता मात्र कमी होऊ लागली होती. वाटू लागलं कुणाला भ्यायचं? वाघाला? रानडुकराला? येऊ दे, होऊन जाऊ दे काय व्हायचे ते. नेहमीच्या भौतिक जगात आपण कुणाला भीतो? माणूस तरी कुणाला भीतो? दुधात पाणी टाकायला कोणी भीत नाही. लूटमार करायला कोणी भीत नाही. मग आपणच इथं जंगलात का भ्यायचं?

आठ साडे आठ वाजून गेलेले. उन्हांनी उबदारपणा अंगात आलेला. उठलो पण पुन्हा चढ चढू लागलो. आता चिमण्यांचा ओळखीचा आवाज ऐकू येऊ लागला.

कडेनं दिसणाऱ्या खोलवर दऱ्या व टेकड्या पाहात पाहात चालतच मी चढ चढीत होतो. आता न भिता मी कुठेही थांबत होतो. एवढ्यात फड्र्र् आवाज करीत दोन माणसं स्कुटरवरून माझ्याजवळून गेली. आणि माझ्यातली उरलीसुरली भीती नाहीशी झाली. माणूस भेटला. माणसं भेटली. त्या नेहमी येणाऱ्या लोकांना त्यावेळी मला किती बरं वाटलं याची काय कल्पना येणार? चालत चालत कसातरी मी ऑर्थर सीटवर पोहोचलो.

''पाणी देणार?''

मी जवळजवळ संपलेला.

''घ्या साहेब'' पाणी प्यालो.

''खायला काय देणार?''

''आता काही नाही साहेब, दहानंतर चहा देतो.''

''ठीक आहे करून ठेव.''

मी एकटा शीळ मारीत पहिलाच माणूस ऑर्थर सीट उतरू लागलो. टायगर स्प्रिंगवरची खडकातून ठिबकणारी पाण्याची धार ओंजळीत घेऊन मनसोक्त प्यालो. इथं खडकातूनही पाणी येतं आणि आमच्याकडं पाण्याच्या नळातूनही पाणी येत नाही. हा विरोधाभास तिथंही जाणवला. आता मी पुन्हा थोडा थोडा माणसात येऊ लागलो होतो. कारण त्या ठिकाणीसुद्धा एका चहावाल्याने आत्ताच रेडिओ लावला होता. खरं तर मला रेडिओच्याही आवाजापासून दूर जायचं असल्यानं मी टायगर स्प्रिंगपासून खाली उतरत ऑर्थर सीटकडे निघालो.

रेडिओचा आवाज आता थांबला होता. मी ऑर्थर सीटवर एकटा उभा होतो. समोर चकाकणाऱ्या हिरव्या, तांबड्या हजारो टेकड्या. दृष्टी संपते तिथपर्यंत टेकड्या आणि त्यापुढंही टेकड्या. वर उघडं निळं आकाश. आवाज – आवाज कुठला इथं?

कसलाच आवाज नाही. असं काहीतरी सौंदर्य दिसलं की आवाज बंद होतो. पक्षीसुद्धा शांत होतात. वारा हळुवारपणे वाहतो. कारण इथं निसर्गाशी एकरूप व्हायचं असतं. टेकड्यांनी, त्या दृश्यामुळं, माझ्यातलं मी पण हरवून टाकलं होत. अहंकार गिळून टाकला होता. मला वाटत होतं की हे सारं कुणाचं आहे? हे पैशात मोजता येणार नाही इतकं मोठं सौंदर्य कुणाच्या मालकीचं आहे? रेलिंगवरची मूठ अधिक घट्ट पकडीत मी मनात म्हणालो, 'हे माझ्या मालकीचं आहे'. मी एकटा आहे आत्ता इथं. एवढं धाडस करून मी इथं आलोय. हे माझ्याच मालकीचं आहे. आता या क्षणी तरी. हे सर्व माझचं आहे. त्याला दुसरा भागीदार नाही.

हो - पण मी? स्वतः कुणाच्या मालकीचा आहे? तो 'मी' तर माझ्या मालकीचा आहे काय? तो मीच माझ्या मालकीचा राहात नाही म्हणून तर घर सोडून इथं आलो. स्वतःवर स्वतःचा, माझा हक्क प्रस्थापित करण्यासाठीच मी इकडे आलो. मी स्वतःच माझ्या मालकीचा मला ठेवता येत नसेल तर या पर्वतराजींवर मालकी सांगण्याचा काय अधिकार?

पण मी या निसर्गापासून वेगळा कुठाय? तो आणि मी यात फरकच कुठाय? जशा चिमण्या जगतात तसाच मी ही जगतो. त्या चिमण्यांनाही माझा सोनू कशावरून स्वतःचा वाटत नसेल? तो त्यांना दाणे घालतो. सगळेच एकमेकांचे असावेत. इथं प्रश्न फक्त प्रेम करण्याचा आहे. मीही त्या पर्वतांचा आहे आणि ते पर्वतही माझे आहेत. हे मोठं तत्त्वज्ञान माझ्या रक्तामधून वाहू लागलं आणि वाटलं, आज ही बरोबर असती तर तिलाही असंच वाटलं असतं. तिच्यापासून आणि सर्वांपासून आपण दूर आलो ते चांगल्यासाठीच. तिला न आणण्यामागे वाईट हेतू मुळीच नव्हता. हे मी पुनःपुन्हा मलाच पटवून देत होतो.

तुला बरोबर न घेता
काहीतरी शोधण्यासाठी मी भरकटत राहिलो.
झाडाझुडपातून
पायवाट तुडवीत राहिलो.
घामानं न्हाऊन निघालो.
काट्यांनी खरवडून निघालो.
पण काहीतरी मिळेल या आशेन पुढं पुढं चालत राहिलो.
वारा आणि चिमण्या माझ्याबरोबर होत्या.

गत आयुष्यातील आठवणी
मी रस्त्यावरून सांडत सांडत चाललो होतो.
तुझ्या सोबतीला कोकिळा सोडून आलो ते बरं झालं.
नाहीतर तुला एकाकी वाटलं असतं.
एका क्षणी मी अवाक् होऊन पहात होतो.
रस्ता संपला होता आणि
हिरव्या तांबड्या टेकड्या डोळे दिपवीत होत्या.
काहीतरी मिळाल्याची जाणीव होऊन
जेव्हा मी तृप्त मनानं परतू लागतो
तेव्हा त्यातली एक टेकडी हलून मला म्हणाली,
'' तिला आणलं असतंस तर बरं झालं असतं.''

० पाच ०

शुक्रवारी विशेष काही घडेल असं वाटत नव्हतं. पण १५-२० कि.मी. सायकलींग हे अपरिहार्य होतं. मी ठरविल्याप्रमाणे शारीरिक स्टॅमिना वाढविणे हे महत्त्वाचे असल्यानं मी स्कुटरवरून कुणी नेतो म्हटलं तरी जात नसे. खोकला आता बराच कमी झाला होता. काल रात्री पाय मरणाचे दुखले. खोबरेल तेलही जवळ नव्हतं; नाहीतर स्वतःच स्वतःचे पाय दाबीत बसलो असतो. त्यामुळे झोप जवळजवळ नाहीच. इथे झोपेची आवश्यकता कमीच. नुसतं बसणं, वाऱ्याच्या चार झुळका येऊन गेल्या की झालं. पुन्हा परिश्रम करायला रिकामे. आज पूर्वेला केड्स, एको पॉईंट वगैरे ठिकाणी जायचं होतं. नाश्ता वगैरे केला आणि निघालो. आज साडेआठनंतर बाहेर पडलो. रस्त्यावर वर्दळ नव्हतीच. बंगले वगैरे होते. छोटी एक-दोन खेडी होती. हॉटेलं होती. पर डे पर सीटवाली. पर डे पर सीट वाली २००, ६०० असे रेट. म्हणजे एक दोन मुलांच्या कुटुंबाला तिथं राहायचं म्हटलं की रोज १०००/- रु. खर्च. मी एक टोपी घेतली होती. त्यावर पुढ 'FRIEND' असं लिहिलं होतं. ती टोपी मी प्रवासाला निघालो की घालायचो. ह्या निसर्गाचा मित्र म्हणून मी स्वतःला समजायचो. स्वतःच स्वतःला टोपी घालणं असा हा प्रकार.

एका हॉटेलवर उतरलो. सायकलनं आत गेलो. दोन वेटर पुढं आले. इथं चांगले कपडे घातलेला माणूस सायकलवर दिसला की तो नक्कीच फार श्रीमंत आहे असं समजलं जात असावं. एक तर गरीब किंवा फार श्रीमंत लोक इथं सायकलवर हौसेखातर फिरतात. मी तसा फार गरीबही नव्हतो अथवा फार श्रीमंतही.

''तुमचं हॉटेल बघायचं आहे.''

ऑफ सीझन, मी एकटाच गिऱ्हाईक. तेव्हा मला शक्य तेवढा मान त्या वेटरनी दिला. आणि हॉटेल फिरून दाखवलं. मालकांची ओळख करून दिली. गप्पा, चहा झाला. एक तास गेला. पुढं चालू.

केड्स पॉईंट. या पॉईंटचं एक महत्त्व लक्षात आलं. या पॉईंटवर रसाच्या दुकानाच्या बाजूला असलेल्या वेलाखाली चार खुर्च्या मांडल्या होत्या. हनिमूनला इथं आलो असताना एक फोटो काढून घेतला होता. तो फोटो त्या बिचाऱ्या फोटोग्राफरनं रात्री अकरा वाजता आम्हाला उठवून आमच्या रूमवर आणून दिला होता. त्यामुळं ती जागा स्मरणात होती.

ती जागा बघितली आणि खाडकन दहा वर्षे मागे गेलो. दोघांनी दहा वर्षापूर्वी एकमेकांच्या खांद्यावर हात टाकून खळखळून हसत इथंच फोटो काढला होता. त्यावेळच्या त्या उत्कट, उत्सुक भावना होत्या. काळाच्या ओघाप्रमाणं थोडं वाहूनही गेलं होतं. तोच मी, तीच जागा, त्याच खुर्च्या. पण मध्ये दहा वर्षाचा काळ गेला होता.

''एक रस दे बाबा.''

''एकच – एकटेच आलाय?''

सर्वांना वाटत होतं तिथं त्याला आश्चर्य वाटणं मला फारसं
आश्चर्यकारक नव्हतं.

''हो''

एक रस पिला. एक तास बसलो. दुसरा मागविला. रस फारच गोड
होता.

''अरे बाळ!''

''काय?''

''इकडे ये.'' मी त्याच्या हातात कॅमेरा दिला. माझ्याजवळ एक
मोकळी खुर्ची ओढली आणि म्हणालो,

''एक फोटो घे या मोकळ्या खुर्चीबरोबर.''

त्याच खुर्चीवर बसून एक पत्र लिहिलं.

''मंगळवारी ये'' या आशयाचं. पुन्हा दोघं इथं बसायचं असं ठरवूनच.

आणि शबनममधील वहीत न रहावून लिहिलं गेलं.

दहा वर्षापूर्वी याच टेकडीवर या झाडाखाली आपण उभे होतो.
नुकतंच लग्न झालं होतं आणि एकमेकांच्या खांद्यावर ओझं टाकून
आपण फोटोही काढून घेतला होता.
आज दहा वर्षानंतर एकटं इथं बसताना.
हे झाड, इथले भुंगे ही डोलारलेली वेल
माझ्याकडं आश्चर्यानं बघतेय.
इथला रसवाला म्हणतोय ''साहेब एकटेच?''
– हो एकटाच
तुझी आठवण मला खचितच होतेय,
पण तू नाहीस म्हणून दुःख मुळीच वाटत नाही.
कारण माझ्या जीवनातील विरक्तीचा
हा पहिला टप्पा आहे.
आणि दुसरा कोणता सांगू?
तुला विसरणं!
आणि तिसरा,
मला विसरणं!

परतलो तेव्हा घामानं डबडबलेला. गार पाण्यानं आंघोळ केली आणि मित्राकडं जेवायला गेलो. यथेच्छ जेवलो.

संध्याकाळी चालत फिरायला बाहेर पडायचो शबनम घेऊन. मित्राच्या मुलाबरोबर क्रिकेट खेळायचो. तिथली मुलं गाईडचं काम करतात. सिझनमध्ये कष्ट करून कुणालाही न फसविता कमावतात. त्यांच्याबरोबर गप्पा. जरा बाजूला जाऊन फुलपाखरू न्याहाळायची. जंगल लागूनच होतं. थोडं आत जाऊन पाखरांचे आवाज ऐकायचे. मुलं पतंग उडवायची. ते बघत बसायचं. पण सुरुवातीला कुणाला मागायचं धाडसच झालं नाही. आश्रमात आलाय म्हणून लोक माझ्याकड आदरयुक्त पाहायचे. त्यात मी क्रिकेट खेळायचो. गप्पा मारायचो, एखाद्याच्या हातून पतंग घेऊन तो

उडवायला बघायचो. हे पाहिल्यावर तिथल्या लोकांचं कुतूहल जागं व्हायचं. एकदा मी फिरून परतत असताना दोन तीन मोठी मुलं बोलताना मी ऐकलं.

''अरे, रोज पंधरा वीस कि.मी. सायकलींग, चालणं असं चाललंय या माणसाचं.''

''कुठं राहताहेत?''

''मठात''

''नाटक आहे झालं.''

'' अरे एखाद दुसरा दिवस असतं तर नाटक म्हटलं असतं. पण रोज चाललंय यांचं.''

त्यांच्या मनात माझ्याबद्दल अनेक शंका असाव्यात. पण जसजसे दिवस जातील, तसतश्या त्या कमी होऊ लागल्या होत्या हे मला जाणवत होतं. तिथली शेंबडी पोरं मला ''डॉक्टर'' म्हणून हाक मारीत होती व तोंड फुलवून हसत होती. माझ्याबरोबर जंगलात फिरायला येत होती. आपला पतंग उडवायला मला बिनदिक्कत देत होती. आश्रमातली एक वर्षाची चड्डी न घालणारी पोरगी काका काका करत माझ्या अंगावर बसायची. जवळपासची कुत्री मला भुंकायची बंद झाली होती. गाई आता मला बुजत नव्हत्या. जवळपासच्या दुकानदारांची भीड चेपल्यानं ते आता माझ्याशी जरा जरा बोलूही लागले होते. हळूहळू मी त्या वातवरणात एकरूप होऊ लागलो होतो. आणि माझं कोल्हापूरचं वास्तव्य आयुष्य विसरू लागलो होतो. दोन-दोन, चार-चार दिवस घराची तिथल्या दवाखान्याची आठवण होत नव्हती. मी तिथून मुक्त झालोय अशी भावना होती. पण परतण्यासाठी. माझं आयुष्य थांबवून त्याकडं पाहण्याचा हेतू सफल होऊ लागला होता. मागच्या व सध्याच्या जीवनाकडे मी त्रयस्थपणे पाहू शकत होतो. निदान असं मला वाटत होतं. तसं वागायला जमत होतं. म्हणून दहा दिवस पूर्ण होतील अशी आशा वाटत होती.

●●●

० सहा ०

शनिवार. गावात सायकलनं जायचं. कॅमेऱ्याचा रोल डेवलपिंगला टाकायचा होता. महाराजांना (काडसिद्धेश्वर) एक पत्र द्यायचं होतं. त्यासाठी पार्टेना भेटायचं होतं. सायकलवरून निघालो. गावात जाण्यापूर्वी प्रथम वेण्णा लेकवर गेलो. सकाळचे ७-४५ झाले असावेत. गार्डन रेस्टॉरंटमध्ये गरम चहाचे घुटके घेत तळं डोळे भरून पाहू लागलो.

तुझ्या निळ्या त्या डोळ्यात होती आकाशाची छाया
तुझ्या काठच्या पाण्यात होती अमृताची गोडी
तुझ्या धुंद त्या स्पर्शात होती माऊलीची माया
तुझ्या अथांगतेत भरले होते जीवनच सारे
आठवणी नव्या जुन्या आल्या तरंग होऊन
तुझ्या लाटांवर छोट्या मन हेलकावे माझे.

चहा प्यालो. चार दोन अँगलमधून तळ्याचे फोटो घेतले. वाटेत जाताजाता जे जे काय चांगलं दिसलं त्याचे फोटो घेत मी चढ चढत होतो.

पार्टेंच्याकडं गेलो. पत्र दिलं. पैसे घेणार असाल तर नाश्ता करतो म्हणालो. घेतो म्हणाले. मी यथेच्छ खाल्लं. भूक लागलेली होतीच. नेहमीप्रमाणे पैसे घेतले नाहीतच. एक जुना दोस्त भेटला. बायको भांडून माहेरी गेलीय म्हणत होता. माझा विश्वासच बसत नव्हता त्याच्या बोलण्यावर. त्यामुळे तर तो आणखीनच अस्वस्थ होत होता.

गावात आलं की माझ्या आठवणी मला येऊ लागतात. घरच्या आठवणी. मी सौ. ला फोनवर कळवलं होतं की शनिवारी येऊ नको म्हणून. तरीही ती न ऐकतां येईल म्हणून मी स्टँडवर तिची वाट पाहत बसलो. ती आली नाही. शक्यता कमीच होती.

मधमाश्या पाळतात कशा व त्यापासून मध कसा साठवतात याचं बरेच वर्षाचं माझं आकर्षण होतं. 'मधुसागर' मध्ये गेलो. तिथल्या एका खोक्यात मधमाश्यांनी केलेलं पोळं पाहिलं. ते षटकोन किती एकसारखे आणि सुंदर होते. राणी माशीला एकदा आत अडकवली व फक्त माश्या जातील पण राणी माशीला जाता येणार नाही अशी जाळी बसवली की राणी माशी आत अडकते. मग इतर माश्या बाहेर जाऊन मध आणतात. तो त्या पोळ्यामध्ये साठविला जातो.

दुपारचा एक वाजून गेलेला. आठ कि. मी. चढ चढत उतरत जायचं होतं. एक

दोन चढ डोळ्यापुढं दिसत होते. पण जाणं भागच होतं. मी गावात एकदाही जेवलो नव्हतो, जेवणारही नव्हतो. जेवायला येतो असं मित्राला बोललोही होतो. पर्याय नसणं हे काही वेळा बरं असतं. तसं झालं. मी हिम्मतीनं सायकल मारली आणि आश्रम गाठला. गार पाण्यानं आंघोळ व भरपूर जेवण झालं. संध्याकाळी पुन्हा चालणं, पतंग उडवणं वगैरे सुरू झालं.

पण आज एक वेगळी गोष्ट घडली. दुपारी तीनला सौ.चा फोन आला. ''अहो, तुम्ही लवकर या.''

''का? मी गुरुवारी येतोय.''

''नको. पोरं रोज रडतात इथं.''

''मला निदान दहा दिवस तरी राहावं लागेल.''

''का?''

''ते विचारू नकोस.''

''मग मी येऊ तिकडे?''

''गुरुवारी ये.''

''गुरुवार फार लांब होतोय. उद्या येऊ?''

''उद्या नको, मंगळवारी ये. मी तुला स्टँडवर न्यायला येतो.''

''पोरांना आणू का नको?''

'' पोरांना?'' मी थोडा वेळ थांबलो. ''आण.''

म्हणजे माझी मुले आणि ती मंगळवारी दुपारी पाऊण वाजता नक्की महाबळेश्वरला येणार होती. आज शनिवार म्हणजे रविवार व सोमवार हे दोनच दिवस एकट्यानं राहण्याचे होते.

खरं सांगायचं तर मलाही आता एकटेपणा जाणवू लागला होता. जे मला मिळवायचं होतं ते बरंचसं मिळालंय अशी निदान माझी धारणा होती. तहानलेल्या माणसानं पाणी पिल्यानंतर तळ्याजवळ बसण्यात तरी काय अर्थ होता? तसं झालं होतं माझं.

फोन झाल्यानंतर मात्र मी जे जीवन थांबवलं होतं – कोल्हापूरचं – ते भौतिक जीवन पुन्हा अधूनमधून मनात येऊ लागलं होतं. मुलांचे चेहरे पुसटसे डोळ्यासमोर येऊ लागले व मुलं येण्याची वाट मी पाहू लागलो.

मंगळवारी सकाळी उठून सायकल घेऊन गावात जायचं. तिथं वेळ कसाही जाईल. सोमवारी रात्री तर इथं उत्सवाचं नाटक होतं. पहिल्या पाच–सहा दिवसात माझ्यापुढं कशाचीच वाट पाहणं हा भाग नव्हता. कसलीच गडबड नव्हती. समोर वेळ होता आणि माझ्या पद्धतीनं मी तो वापरत होतो. कुणाचे फोन येत नव्हते. कुठली वेळ चुकत नव्हती. कुणाचीच जबाबदारी नव्हती. माझे दहा दिवस मी सर्वांपासून सोडवून घेऊन इथं आलो होतो. स्वच्छंदी पक्ष्यासारखं राहणं मी अनुभवत होतो.

आश्रमातली आरती वगैरे चालू असतानाच सत्तर मुलामुलींची एक सहल आली. ती सत्तर मुलं आश्रमात झोपणार होती. तशी चिठ्ठी महाराजांनी दिली होती. मी सुखावलो. माझा एकटेपणा कमी झाला. आज आश्रमात आणि सत्तर माणसं झोपणार या कल्पनेनं मी सुखावलो. म्हणजे एकटं येऊन काहीतरी करण्याची माझी इच्छा अशी माणसाळायला लागलेली मला जाणवली.

हल्ली दुपारी व रात्री झोप व्यवस्थित येऊ लागली होती. पायसुद्धा रात्री दुखत नव्हते. म्हणजे इथल्या प्रकारच्या जीवनाची मला सवय लागली होती.

●●●

0 सात 0

आता माझ्या मनात घरचे लोक येणार हेच विचार येऊ लागले होते. पण नुसत्या त्यांच्या प्रतीक्षेत दोन दिवस जाऊ नयेत म्हणून मी लिहू लागलो. आल्यापासून जाईपर्यंत काय काय झालं ते उतरवू लागलो. कदाचित् माझ्या पुढच्या आयुष्यात या लेखनाचा काहीतरी उपयोग होईल. मला दिशा मिळेल. या आठवणी पुन्हा डोळ्यासमोर उभ्या राहतील. म्हणून लिहायला सुरुवात केली. लिहिलं तर दिवस वाया जाणार नाहीत ही धारणा आणि ते खरं होतं. लिहिण्यासारखं काहीतरी आहे असं प्रामाणिकपणे वाटतं होतं.

पहाटे सहा वाजण्यापूर्वी उठणं सुरू होतं. मित्राकडं चहा प्यायला ५.४५ ला गेलो. स्कार्फ, स्वेटर, शाल आवश्यकच होतं. आलं घातलेला दोन कप चहा घेतला. बिस्किटं खाल्ली. तिथं मी घरात बसत नसे. बाहेरच शेणानं सारवलेल्या अंगणात एक टेबल व दोन – चार खुर्च्या टाकलेल्या असत. त्यातील एका खुर्चीवर बसून मी समोरचं महाबळेश्वरचं मंदिर, त्या भोवतालचा डोंगर आणि जंगल पाहात बसत असे.

आकाशातील चांदण्या आणि पहाटेचं वातावरण मोहक वाटत असे. स्वतःचा जीव जितका म्हणून या निसर्गामध्ये झिरपवून टाकता येईल तितका मी टाकत होतो. ते सुद्धा परमेश्वराला साक्षी ठेवून. पण ते करण्यानं काय साध्य होणार होतं? कुणास

ठाऊक? पण ती एक अनाहूत ओढ होती आणि आहे. कारणं काहीही असतील पण हे सगळं करण्यामध्ये दुःख मुळीच नव्हतं. यात प्युरिटी होती.

नव्या मित्राचा मुलगा रविवारी सकाळी टी. व्ही. वर 'टिपू सुलतान' बघतो म्हणाला म्हणून सकाळी मी एकटा एक दोन ठिकाणी जाऊन आलो. आता प्रत्येक ठिकाणी 'मी जाणार' याची जाणीव असायची. पहिल्या दिवशी ज्या बाकावर बसलो होतो त्याच बाकावर आज बसलो आणि लिहू लागलो.

टेकड्यांनो आणि झाडांनो
कड्यांनो आणि दऱ्यांनो
पक्ष्यांनो, चंद्र सूर्यानो
मी आता जातो.
गेल्या दहा दिवसात
तुम्ही माझा मी मला परत दिलात.
पुन्हा कधी जीवनात अडखळलो तर
असाच तुमच्याकडं येईन - माहेरवाशिणीसारखा.
पण आता एकटा येणार नाही -
येताना माझा गोतावळा घेऊन येईन.

अभिजित, मित्राचा मुलगा, त्याच्या बरोबर मी पुन्हा फिरायला गेलो.

''चप्पल घालत नाहीस अभिजित?''

''चप्पल मला आवडत नाही.''

''का?''

'' चप्पल घातली की पळता येत नाही.''

दोघं डोंगर उतरून खाली चालू लागलो. अभिजीत पालीसारखा कुठंही उतरत होता. भीती म्हणजे खाली खोल दरी होती म्हणून. आम्ही परत फिरलो. बरंच फिरल्यानंतरही अभिजितला हवं ते ठिकाण सापडलंच नाही. गणपतीचं छोटं मंदिर शेवटी दिसलंच नाही. येतांना पुन्हा थोडा वेळ त्या पहिल्या बाकावर बसलो.चढ चढल्यामुळं तहान लागलेली.

''तहान लागलीय अभिजित, चल लवकर घरी जाऊ या.''

''तहान लागली? मग इथं आहे की पाणी.''

असं म्हणून दोनच पावलावरील एक झरा अभिजितनं दाखविला.

खडकाच्या एका फटीतून स्वच्छ पाण्याचा एक प्रवाह बाहेर येत होता आणि भांड्यांच्या आकाराच्या एका खडकावर पाणी जमा होत होतं. निळंशार पाणी, स्वच्छ, शुद्ध आणि गोड. मी भरपूर पाणी प्यायलो.

आम्ही परत फिरलो तर वाटेत एक घाण पाणी साचलेलं डबकं दिसलं.

''अभिजित, या डबक्यातील घाण पाणी तर त्या झऱ्यातून येत नसेल ना?''

अभिजित म्हणाला 'तुमच्या शहरातल्या लोकांच्या शंकाच जास्ती.'

मी निमूटपणे मान खाली घालून त्याच्या मागून चालू लागलो.

''अभिजित, तुला पतंग करता येतात?''

''हो येतात.''

''मग तीन पतंग करणार?''

''तीन? तीन कुणाला?''

''एक तुला, एक माझ्या मुलीला व एक माझ्या मुलाला.''

''कधी येणार आहेत?''

''मंगळवारी.''

''ठीक आहे करतो, पण दोरा आणायला हवा.''

'' हे घे पैसे, आण सगळं आणि कर पतंग.''

हळूहळू मी कसा माझ्या पूर्वीच्या जीवनात अडकू लागलो त्याचंच हे उदाहरण. मुलं येणार. त्यांना खेळायला पतंग. ही येणार, हिच्या टॅक्सीची सोय, कुठले पॉईंट्स दाखवायचे, बोटिंग करायचं बाकी ठेवलेलं. खरेदीही करायची होती. पुन्हा व्यावहारिक जीवनात प्रवेश करू लागल्याचं स्पष्ट जाणवत होतं. पण त्यात दुःख नव्हतं. तो प्रवेश पुन्हा करायचाच होता. पण फक्त दहा दिवसांनी.

वेळ जाणं हा प्रश्न पहिले ५/६ दिवस नव्हता. आता वेळ हा प्रश्न भेडसावत आहे. त्याचं दुसरं कारण म्हणजे सिगारेट. क्वचित् मित्राबरोबर मद्यपान वगैरे काहीच नव्हतं. वेळ जायचा कसा? त्यामुळं सिगारेट ओढण्याची इच्छा वाढायची. पण आत्मिक ताकद वाढल्यानं मनाच्या या इच्छा मी दाबू शकत होतो.

संध्याकाळी अभिजितनं व मी पतंग केला. अर्थातच तो उडाला नाही. एका वृद्ध गृहस्थांनी आम्हाला पतंग बनवण्यास मदत केली. तरी गणित जमेना. मी पतंग उडवतांना

बघून तिथल्या मोठ्या लोकांनाही पतंग उडवावंसं वाटू लागलं. बघता बघता समोरच्या माळावर मोठे काही लोक जमा झाले. गाव मला पूर्ण सामावून घेऊ लागलं होतं. मठासमोर क्रिकेट खेळताना २०/२५ लहान मोठी मुलं एकत्र येत आणि नंबर पाडून खेळत. त्यात माझाही नंबर असे. क्रिकेट मुळं व्यायाम चांगला झाल्यानं झोप व भूक भरपूर लागायची.

●●●

0 आठ 0

आज सोमवार व उद्या मंगळवार. सोमवार म्हणजे शंकराचाच वार व मंगळवारी तर महाशिवरात्र. मी इथं राहायला येण्याचा योग चांगला होता.

प्रत्यक्ष गोमुखातील पाण्यानं आंघोळ हा इथला एक धार्मिक सोहळा. सात नद्यांच्या उगमाचं एकत्र येणारं हे पाणी बर्फासारखं थंड असायचं. खालच्या हौदातलं पाणी तर त्याहून थंड. मी हौदात जेव्हा उभा राहिलो तेव्हा इतकं गार वाटलं की नैसर्गिक प्रतिकार म्हणून सर्व अंग हळूहळू गरम व्हायला लागलं व मग डोक्यावर गोमुखातील धार पडू लागली. ते पाणी फारसं गार वाटलंच नाही. 'शंऽऽभो' म्हणून जोरात ओरडलो. पण त्या परिस्थितीत ते विचित्र वाटलं नाही.

सायकलनं १५ कि.मी. प्रवास करायचा होता. पण आजचा एकटं राहण्याचा, सगळे पाश सोडून एकटं राहण्याचा शेवटचा दिवस होता हे सकाळपासूनच जाणवत होतं. उद्या घरचे लोक येणार होते. त्यामुळे आजच्या दिवसाला वेगळं महत्त्व होतं. मी गावातील लोकांमध्ये पूर्णपणे सामावून जाऊ लागलो होतो.

महाशिवरात्रीनिमित्त गाईड मंडळी म्हणजे गावातील तरुण मुलं नाटक करणार होती. नाटक म्हटलं की माझा थोडा वीक-पॉईंट. मी विचारलं,

''नाटकाला बक्षिसं आहेत की नाही?''

''कसली बक्षिसं''

''नाही म्हणजे जो चांगलं काम करील तो पहिला.
नंतरच्याला दुसरं बक्षीस असं काही आहे का?''

''कोण लावणार बक्षीसं?''

''कुणाला तरी लावायला सांगायची. त्यामुळे काम करणाऱ्याला उत्साह येतो. उमेदीनं काम करतात मग मुलं.''

''खराय, पण कोण लावणार बक्षीस?''

''मी लावतो.''

''लावा की मग.''

''पण परीक्षक कुठले आणणार?'' मी.

'' कसले परीक्षक, बक्षिसं द्यावीत हे तुम्हाला कळतंय तर ती कुणाला द्यावीत हे पण कळत असेलच की. तुम्हीच आमचे परीक्षक.''

मी सांगून टाकले. पहिलं ५१, दुसरं ३१, तिसरं २१ रु. माझ्यातर्फे. माझं नाव जाहीर करायचं नाही या अटीवर.

माझ्याकडं बघण्याच्या नजरा बदलू लागल्या. आदरयुक्त प्रेम. गावातला प्रत्येक माणूस मला हात करू लागला.

आज पुन्हा केड्स पॉईंटला गेलो. वाटेत एका झाडापाशी थांबलो. अभिजित बरोबर होता.

आज संध्याकाळी पाच वाजल्यापासून बाहेरच बसून होतो. महाशिवरात्रीची पालं ठोकण्याचं काम चालू होतं. जत्रा असते इथे मोठी. नाटकाचं स्टेज बांधणं चालू होतं. लोकांची गर्दी वाढू लागली होती. पण मुख्य काम करणाऱ्या पात्राचा एकाएकी घसा बसला.

''डॉक्टरं घसा बसलाय काहीतरी औषध सांगा की.''

''दुसरे डॉक्टर नाहीत काय नेहमीचे?'' मी.

''गेलो होतो पण ते म्हणतात की तास दोन तासात बरं करता येणार नाही.''

'' ठीक आहे मी करतो बरा तुझा घसा दोन तासात.''

''डॉक्टर माणूस देतो, तेवढ्या गोळ्या आणून देता काय?''

मला गावात जायचंच होतं.

गावात गेलो. दोन तासात घसा बरा करणाऱ्या गोळ्या विकत घेतल्या. बरोबर आलेल्या बच्चूला घेऊन स्कुटरवरून बॉम्बे पॉईंटला गेलो. सूर्यास्ताला अजून बराच वेळ होता म्हणून लगेच परत फिरलो. वाटेत क्षेत्र महाबळेश्वर पासून तीन कि.मी. अंतरावर

सूर्यास्त बघण्यासारखा एक चांगला पॉईंट होता. त्या बच्चूच्या घरी साखरपुडा होता म्हणून त्यानं मला घरी आणून सोडलं (क्षेत्र महाबळेश्वरला.)

सूर्यास्ताला फक्त वीस मिनीटं राहिलेली.मी आल्यापासून इथला सूर्यास्त पाहिला नव्हता. सूर्योदय बऱ्याचदा पाहिले. स्कुटर मिळायला तयार नाही. बरोबर कोणी यायला तयार नाही. पाच दहा मिनिटं यातच गेली. आता काहीतरी निर्णय घ्यायला हवा होता. नाहीतर शेवटच्या दिवशी एक चांगली संधी हुकली असती. निसर्गाशी एकरूप व्हायला आलोय आणि कंटाळा कसला?

सायकल काढली. जीव ओतून सायकल मारली. दहा मिनिटांत ३ कि.मी. गेलो आणि ठरल्या ठिकाणी उभा राहिलो.

इथलं वैशिष्ट्य म्हणजे सूर्य टेकडीमागे न जाता टेकडीपासून बराच वर तिथेच आकाशात अस्ताला जातो. फटाफट तीन चार फोटो घेतले. डोळे भरून सगळं पाहून घेतलं. आजपर्यंत पाहिलेल्या जमिनीवरील सूर्यास्तापेक्षा सर्वात चांगला सूर्यास्त आज पाहिला.

धापा टाकीत परत आलो. अंधार पडू लागला होता. पालं थाटली होती. पेढे, बर्फी, चिरमुरे अशा अनेक पदार्थांनी दुकाने भरली होती. एक दोन मंडळी दारू पिऊन इकडून तिकडे फिरत होती. एकानं मला रस्त्यावर थांबवून एक गाण्याचं कडवं म्हणून दाखवलं. मद्यपानाचा एक भाग सोडल्यास त्यानं गाणं फार छान म्हटलं होतं.

मी जाणार म्हणून मला जेवायला घालणारा मित्र हिरमुसला झाला होता.

''डॉक्टर, तुम्ही गेल्यावर आम्हाला करमणार नाही.'' त्याचा आवाज जरासा कापरा झाला होता.

''का?'' मी विचारलं.

''एवढं कोण मिसळलं नव्हतं आमच्यात.''

''मी मिसळायला तर आलो होतो इथं.''

नव्या मित्राकडं मी रोज एका नव्या माणसाबरोबर जेवायला बसायचो. बाहेरच्या खोलीत आमची पंगत असायची. कधी ड्रायव्हर, कधी क्लार्क, आज देवाचे फोटो विकणाऱ्या एका तमिळी मनुष्याबरोबर जेवलो. असे अनेक लोक माझ्या सहवासात येत होते. माझ्याशी दिलखुलास बोलत होतो. मी स्तब्ध होऊन ऐकायचो. माझ्याबद्दल फार काही बोलायचो नाही.

नऊ वाजून चालले तरी पात्रं इकडून तिकडे फिरत होती.

''अरे, नाटक कधी सुरू करणार?'' मी विचारलं.

''लोक आल्यावर.''

'' लोक कधी येणार?'' मी विचारलं.

''जेवल्यावर'' त्याचा घड्याळाशी संबंधच नव्हता. मग फारसे प्रश्न विचारलेच नाहीत.

मी त्या सर्वांना बक्षिसाचे नियम समजावून सांगितले. बक्षिसं ठेवली म्हणून सगळ्यांचे चेहरे फुललेले दिसत होते.

नाटक १०.४५ ला सुरू होऊन पावणे तीन वाजता संपलं. इतका उशीर जागणं मला शक्य नव्हतं. मी पहिला अंक पाहिला व झोपलो. त्यावर तीन नंबर काढून बक्षिसं माझ्या मित्रापाशी ठेवून दिली. त्याने ती वाटली. कोणी दिली हे सांगितलं नाही पण बक्षिसाचं नाव 'अद्वैत पारितोषिक' असं ठेवलं होतं.

● ● ●

० नऊ ०

सकाळी ५.३० ला जाग आली. काकड आरती वगैरे झाली. नंतर चुलीपाशी पाणी तापवीत बसलो. तिथेच चहा प्यायलो. खूप थंडी बाहेर असली की चुलीजवळ पाणी तापवीत बसण्यासारखा आनंद नाही आणि त्यात तिथेच चहा मिळणं म्हणजे कल्पनाच केलेली बरी.

आंघोळ वगैरे उरकून उगमस्थानावर गेलो. सप्तनद्यांचं पाणी प्यालो. पाय धुतले व प्रथम सूर्यदर्शन घेतलं. मारुती शंकर वगैरे देव झाले.

आज माझं पूर्वीचं आयुष्य पूर्ववत् सुरू होणार होतं. रात्री एक वाजल्यापासूनच तसे थोडे थोडे वेध लागले होतेच. गाडी या स्टेशनवर दहा दिवस थांबली होती. आणि पुन्हा इथून पुढचा प्रवास सुरू होणार होता. इथं जी निसर्गाशी एकरूपता प्रस्थापित झाली होती ती अवर्णनीय आहे. त्यामुळं जातांना नक्कीच वाईट वाटणार. प्रेम करणं आणि जातांना वाईट वाटून घेणं ह्याचा अर्थ प्रेम निर्व्याज नव्हतं असा होतो. जे प्रेम पूर्ण निर्व्याज असतं त्यावेळी जातांनाही दुःख होत नाही. कारण जाणाऱ्याला माहीत असतं की असंच आपल्याला दुसऱ्यावर प्रेम करायचं आहे आणि त्यासाठी आपण निघालो आहोत.

भक्तिमार्गातील अनेक वाटसरू पाहायला मिळतात. त्यांचं एक चांगलं आहे.

तर्कनिष्ठांप्रमाणे ते फार वाहावून जात नाहीत. त्यांची त्यांची अशी एक निष्ठा असते, एक विचारसरणी असते आणि तिला ते चिकटून राहतात. तर्कनिष्ठांची काही वेळा फार पंचाईत होते. त्यातील काही धडे 'ना धड इस घाट का ना उस घाट का' अशा अवस्थेत जातात. या आठवड्यात सूर्याबद्दलचं आकर्षण खूप वाढलं.

फक्त एक आठवडा झाला, पण किती मोठा काळ मागे गेल्यासारखा वाटतोय. वेळेच्या मानानं अनुभव खूप मिळाल्यासारखा वाटतोय. एक आठवडा केवढा मोठा असतो. त्यात काय काय मिळवता येतं, किती अलौकिक नैसर्गिक अनुभव घेता येतात याची जाणीव होते आहे. नाहीतर कोल्हापुरात हे आठवडे सर-सर करीत जायचे आणि हाती फार काही लागायचंच नाही.

इथं निसर्गानं साथ दिली. परमेश्वरानं साथ दिली. माझीही इच्छा तीव्र होतीच. त्यामुळं हे सर्व होऊ शकलं. मानसिक, शारीरिक आणि आत्मिक सामर्थ्य वाढलंय असं मला वाटू लागलं होतं.

●●●

0 दहा 0

परत कोल्हापूरला यायला निघालो. गाडीतून येताना खूप वाईट वाटत होतं. माझं चिमणं पोरगं मांडीवर बसून मला बाहेरचं काय-काय दाखवीत होतं. प्रसन्न मुद्रेनं सौ. शेजारी बसली होती. 'थांबायचं नाही पुढं जायचं' असाच संदेश वेगानं पुढ जाणारी आमची बस देत होती. मोहोरानं आंबा फुलारला होता. ढगांनी आकाश भरून जाऊ लागलं होतं. फुलांचे ताटवे वाटेवर स्वागताला उभे होते आणि मी पुढं चाललो होतो. थांबवायचं? काय आयुष्य थांबवायचं? आहे तिथं आणि तसं! ह्याचा एक प्रयोग पूर्ण झाला होता. थोडा यशस्वी - थोडा अयशस्वी. पण मानसिक, आत्मिक ताकत वाढलीय असं वाटत होतं. मी येता येता वाटेतल्या वनश्रीला पाणावलेल्या डोळ्यांनी सांगत होतो.

वचने दिली कुणाला पाळायला निघालो,
माझ्याच रे निसर्गा, जाण्यास मी निघालो.

●●●

मन झाले मोरपीस

जाता जाता मी एकदम थबकलो. उजव्या बाजूला कौलारू दोन मजली घर. आम्ही पंचवीस वर्षांपूर्वी तिथं राहात होतो ते घर. दोनेक वर्षे राहिलो असू जेमतेम. ते घर पाहिलं अन् मला एकदम तो काळ आठवू लागला. आपोआप मनाने मागे जात राहिलो. हवे हवेसे वाटणारे विचार... हव्याहव्याशा वाटणाऱ्या आठवणी... फुलपाखरासारख्या आठवणी... फुलांसारख्या डोलणाऱ्या आठवणी... मी स्वतःवर ताबा ठेवू शकलो नाही.

मी तुडवीत होतो तो सांगलीतील रस्ता आज पुन्हा पंचवीस वर्षांनी पायालाही थोडा वेगळा जाणवत होता. 'कैवल्यधाम', पाच-सहा मजले चढवलेली समोरची इमारत भुईसपाट झालेली. बोरकर डेअरीवरचे सर्व मजले पाडलेले. माझ्या बालपणीच्या स्मृतीत मात्र त्या इमारती शाबूत होत्या. नांदगावकरांकडे बुद्धिबळ खेळायला जायचो. सातवीत असेन. कसली बुद्धी अन् कसलं बळ. नांदगावकर आजोबा मात्र निरोप पाठवून बोलवायचे. आई हसायची. पासष्ट वर्षांचे आजोबा माझ्या चिमुरड्याला खेळायला बोलावतात! जे आवडेल ते

करायचं. बरं वाटेल तसं वागायचं. देतील ते खायचं आणि पुन्हा फिरायचं – फुलपाखरासारखं!

नांदगावकर जवळ बसून खेळवायचे. चांगली खेळी केली की हसायचे. आपल्या वृद्ध बायकोला कधी चकली कधी चिवडा कधी भजी खायला द्यायला सांगायचे – चहा तर ठरलेलाच. मला कधी कधी जिंकू द्यायचे. मी जिंकल्यानंतर बिस्किटचा पुडा मिळायचा. मी परत फिरतांना आजोबा हिरमुसले व्हायचे. मुलगा नव्हता ना त्यांना. मीच त्यांचा मुलगा – मी त्यांचा नातू असे त्यांनाही वाटायचं आणि मलाही. आईनं मारलं की त्यांच्याकडे, नाना रागावले की त्यांच्याकडं, बापूंनी भांडण काढलं तरी त्यांच्याकडं. ते लगेच डाव टाकायचे. मी जिंकायचो. बिस्किट पुडा घरी घेऊन यायचो. त्यांना मी नंतर एक दोनदा भेटलेला आठवतंय, पण नंतर ते गेले. पुन्हा त्यांची गाठ नाही. ते व मी बसत असलेली खोली जमीनदोस्त झाली. पण माझ्या मनातलं ते बालपण अजून त्यांनी घातलेल्या सतरंजीवर बसून बुद्धिबळ खेळतंय.

बोरकरांनंतर पटवर्धन डॉक्टर. डॉक्टरांची आठवण नको. बालपणी डॉक्टर म्हणजे भीती वाटायची. आईला तर फीट आलेली असायची. बापू तर तापलेला असायचा. मला टॉयफॉईड झालेला असायचा. तेव्हा कडू औषध पिण्याची आठवण... पण एकूण दुःखच डोकावतं त्या आठवणीतून. बरं झाल्यावर आपण कुठं डॉक्टरांकडे जातो? डॉक्टर म्हणजेच बरं नसतांनाचीच आठवण. जरा पुढं वळलं की, सिटी हायस्कूलकडं बोळ जायचा. हाच शाळेला जायचा रस्ता. डाव्या बाजूला लेले राहायचा. जाता जाता लेलेला बरोबर घ्यायचा आणि पुढं चालू लागायचं. भाऊ-बहिणीबरोबर मी कधीच शाळेत जात नसे. माझा मी वेगळा जायचा – लेले बरोबर. माझं त्यांचं जमायचं नाही. ते स्वतःला मोठे समजायचे. बापू मला मारायचा. माझ्याशी भांडायचा. मी एकटाच जात असे.

बोळांत सगळी घरं तीच. एखाद दुसरी नवी इमारत. गावभागात कुठे फारशी पाडापाडी होते! काही मुलं घोळक्यानं घरासमोर उभी. अशीच त्या वेळीही उभ राहात असत. रोज जाऊन येऊन ओळख झालेली. काही काही विचारत आज उभी असलेली. मुलं कदाचित् तेव्हा उभे असलेल्या मुलांची मुलं नसतील? असतीलच. पंचवीस वर्षे झाली. इथलं काहीच फारसं बदललेलं नव्हतं. मग मीच का एवढा पंचवीस वर्षात बदललो. त्या वेळच्या माझ्यावर इतके वर्षात इतके संस्कार झाले की त्या वेळच्या मला मी आता ओळखेनासाच झालो. या रस्त्यावरून जातांना पुन्हा त्या वेळचा मी आठवू

लागलो.

शाळेला घाई झाली म्हणून जेवतांना मधूनच उठून अडखळत पळणारा मी या रस्त्यानं पळत शाळेला गेलो होतो. कोटिभास्कर सरांच्या छड्या कोवळ्या हातावर खाल्ल्या होत्या. लाल झालेले हात वर्गात चोळत बसायचो. कमी जेवल्यानं शाळा सुटल्यावर भूक लागायची. डबेबिबे भानगड नव्हती तेव्हा. भरभर घर गाठायचं म्हणून गडबड. याच रस्त्यावर मी कितीदा ठेचकाळलो. चप्पल नसायची. असली तर अंगठा तुटलेली. पायात अडकायची. एखादीच चड्डी पडल्यावर मळायची. आई रागवायची. मी जपायचो. घरी आल्यावर आई प्रेमानं खायला द्यायची. मागच्या गॅलरीत उभा राहायचो. समोर पत्र्यावर मुंगसं खेळायची. सूर्याची सोनेरी उन्हं मुंगसांवर पडायची. मन हरवायचं वाटीतलं खाणं तसचं राहायचं. उजव्या बाजूचं मारुतीचं शिखर चकाकायचं.

''आई साप भारी की मुंगूस भारी?''

''मुंगूस भारी.''

''ते कसं, साप विषारी असतो.''

'' मुंगूस सापाला युक्तीनं मारतं.''

चालत चालत पुढं गेलो. सिटी हायस्कूल आलं. आत गेलो. चारी बाजूनं बांधकामं झालेली. प्रत्येक इमारतीला वेगवेगळी नावं दिलेली. मधलं सिटी हायस्कूल मात्र शाबूत होतं. पटांगणात कोपऱ्या कोपऱ्यात सिमेंट वाळू विटांचे ढीग पडलेले. माझे पाय जुन्या वर्गाकडं गेले. सातवीचा वर्ग शिक्षकांच्या खोलीजवळचा. तिसऱ्या ओळीतला सातवा बाक. शेवटून दुसरा. लेले जवळ बसायचा. मोत्याचं अक्षर. त्याच्यामुळं माझं सुधारलं. गणितात फक्त तिघांना एकदा साठ पैकी साठ मार्क. मी व लेले त्यात होतो. संक्रांत होती. बाईंनी वड्या दिल्या तिळगुळाच्या. ती चव अजून जिभेवर आहे. साठपैकी साठ मार्क. मराठीची उत्तरं भरमसाट लिहायचो – नको एवढा विस्तार. लागू बाई म्हणायच्या, त्याचं उत्तर म्हणजे वडाच झाड. पारंब्या फांद्या.... इंग्रजीचे कुलकर्णी सर चिडायचे. घाणेरडं बोलायचे. चांदीच्या वाटीतनं सोन्याच्या चमच्यातनं खावा म्हणायचे. पण जीव तोडून शिकवायचे. वर्षभर शिव्या खाल्ल्या पण शेवटी इंग्रजीत बासष्ट मार्क मिळवून घरी गेलो. नमस्कार केला. सात-आठ जणांनाच फर्स्ट क्लास. त्यांच्या हातनं मार्क मिळणं म्हणजे देवच खाली आला पाहिजे. नमस्काराला वाकतानासुद्धा पाठीत गुद्दा... पण प्रेम... निखळ प्रेम... झऱ्यासारखं स्वच्छ, सुंदर. अजूनही भेटले की म्हणतो, 'सर सातवीनंतर पुन्हा कधी इंग्रजी ग्रामरचा

अभ्यासच केला नाही. अकरावीत डिस्टिंक्शन मिळालं ते सातवीमुळंच'. नातू सर थोबाडीत मारायचे. बुद्धिबळ असं शिकवलं की पंधरा वर्षे चांगला खेळायचो. मनात आठवणींची वलयं फुटत होती. मी परत फिरलो. ग्राउंडवर दोन चार मंडळी बोलत होती. आताचे शिक्षक असावेत. अंगाखांद्यानं माझ्याएवढेच. विशेष काही वाटलं नाही. मी कोणालाच ओळखत नव्हतो. तेव्हा असेच जोशी सर, लिमये सर, कोटिभास्कर सर उभे असायचे. वर तोंड करून बघायची हिंमत व्हायची नाही. ग्राउंड भरल्यासारखं वाटायचं. एवढी एवढी चिमुरडी पोरं सायकलवरून उडून गेली. एवढी छोटी मुलं सायकल कशी वापरतात. आश्चर्य वाटलं. त्यावेळी फक्त आमचे नाना सायकल वापरायचे. तीन चाकी सायकल जरा त्यापेक्षा मोठी सायकल. आता माझी मुलं वापरतात. पण त्यावेळी आमची ऐपत नव्हती. सायकल अशी कुठलीच घेतली नाही. वडिलांची वीस एक वर्षांची जुनी सायकल. तीच नंतर मी शिकलो. कोणी शिकवायला यायचे नाही. एखादा मित्रच. मोठी सायकल. गुडघे फुटायचे... रक्तबंबाळ व्हायचे.एकदा उतारवर एका मित्रानं सोडून दिलं. सीटवर बसून पाय पुरत नव्हते... म्हटलं आता मरतो. तोल सावरणं भागच होतं. जवळजवळ एक किलोमीटर तोल सावरला व मग गोल फिरून आपटलो. किती लागलं ते आठवत नाही. पण फार लागलं. तेव्हा मात्र स्वतः सायकल चालवत घरी गेलो. सायकल यायला लागली तो क्षण तोच.

अंधार पडायला लागला तसा परत फिरलो. पुन्हा एकदा सिटी हायस्कूल बघून घेतलं. पुन्हा जुन्या घरापाशी चालत आलो. 'जाऊ या वर?' स्वतःलाच प्रश्न केला. आता नाही गेलो तर पुन्हा कोण ओळखणार आपणाला? नांदगावकर बिल्डींगसह गेले. घर ठिकाणावर आहे तोवर जाऊ या.

मालक वृद्ध होते. त्यांचा मुलगा दुकान चालवायचा. त्या मुलाला आता दोन मुलं झाली. ती दुकान बघतात. वृद्ध मालक फार कडक. नीट कुणाशीही बोलायचे नाहीत. माझ्याशी मात्र बोलायचे. का? कुणास ठाऊक? बालपण हेच कारण असेल. वेगळं करून खायचे. चांगलं काही केलं की बोलवायचे. खायला द्यायचे. लहानपणी मी सर्वांना प्रिय होतो. पण आता मी सर्वांना प्रिय आहे का? नसेन तर का नाही? असे काय संस्कार आपण स्वतःवर करून घेतले की आपण काही जणांना अप्रिय वाटावे.....

दुकानात गेलो. वहिनी बाहेर आल्या होत्या. 'ओळखलं?' त्यांनी मला ओळखणं शक्य नव्हतं. पंचवीस वर्षे झाली होती.

त्यांनी बराच वेळ न्याहाळलं. त्यांना ओळख लागेना. मी आता कोण आहे हे

सांगून त्यांना ओळख पटली नसती. त्या पूर्वीच्या मला ओळखत होत्या. पंचवीस वर्षांपूर्वीचा सातवीतला मी. माझी ओळख मी सांगू लागलो.

'मी...प्रकाश हो...बापूचा भाऊ...नानांचा धाकटा मुलगा...१९६७...मोठा भूकंप झाला......तेव्हा आम्ही राहात नव्हतो का... तो प्रकाश.'

मी वेगळ्याच प्रकारे माझी ओळख करून दिली. त्यांचा चेहरा फुलला. आठवणींचा डोह पुन्हा एकदा ढवळला गेला. कपाळावरच्या आठ्या निघून गेल्या.

'हा – प्रकाश.....कसा ओळखशील रे?....केवढासा होतास चिमुरडा......'

'.....केवढा होतो...चिमुरडा....माझ्या मुली एवढा?.... कसा दिसत होतो, वहिनी? कसा बोलायचो?.....? लहानपणीच मी वहिनींना पाहिलेलं.... वहिनींनी खेळवलेलं....त्यावेळचा मी....'मी' विसरलेला..... काय विचार येत असतील त्यावेळी माझ्या मनात....त्यावेळचं माझं मन कशानं बनलेलं असेल?....वहिनींना माहीत असेल....विचारू या त्यांना....आता कसं विचारणार....केवढे मोठे आपण....वहिनींना आवडणार नाही.'

'वहिनी, मी फार त्रास द्यायचो ना तुम्हाला आणि औंना'

औ म्हणजे वहिनींच्या सासूबाई. वारल्या दहावर्षांपूर्वी. ''औंचा आणि मालकांचा फार लाडका होतास तू प्रकाश.'' मालक म्हणजे सासरे. तेही गेले म्हणे पाच–सहा वर्षांपूर्वी.

''का हो वहिनी, मालक एवढे रागीट पण माझ्यावर का एवढे प्रेम करायचे?''

''असतं नातं एकेकांचं पूर्वजन्मीचं.'' नातं मला माहिती होतं. हे याच जन्मीच नातं होतं. बालपणाचं नातं. बालमनाचं नातं. फुलं कोणाला आवडणार नाहीत? बालपणीचा मी आता मलाच आवडू लागलो होतो. लाकडी उभा जिना. मी खडाखडा करीत पळतच उतरत खाली यायचो. जोराचा आवाज व्हायचा. औ डोळे वटारून बघायच्या – रागवायच्या... पण संध्याकाळ झाली की जवळ बोलवून खाऊ द्यायच्य. सर्वांना मी प्रिय. ही काय भानगड कळायचं नाही.

'नांदगावकर आजोबा तुम्ही आजीशी का भांडता?'

'तुला कळायचं नाही.'

'तुम्हाला तरी कळतंय का?'

'मलाही कळत नाही...खेळ गप्प.'

बुद्धिबळाचा डाव चालू असायचा. आमच्या घरचे मालक. औशी पटायचं

नाही. एकमेकांचे निरोप मी एकमेकांना द्यायचो. बारा वर्षांचा मध्यस्थ. एकदा माडीवर मालकांनी शिरा केला. डब्यातून मला दिला. मी खट्याळपणा केला. औला नेऊन दिला. मालकांनी संध्याकाळी विचारलं, 'कसा होता शिरा' मी म्हटलं, 'औना विचारून येतो.'

''औला दिलास काय भडव्या?''

माझा गाल लाल झाला. उपद्व्याप करायचो. पण पुन्हा मलाच बोलवायची ही मंडळी. बरोबरीच्या मित्रांपेक्षा मी याच माणसात जास्त.

''वहिनी, जुनं घर पुन्हा बघावसं वाटतंय, बघून येऊ?''

''अरे विचारतोस काय? तुझंच घर आहे.''

जुन्या आठवणींनी मन भरून आलं होतं. श्रावणात आकाशानं यावं तसं. पण विषण्णता नव्हती. दुःख नव्हतं. एकेक सर येऊन जावी तशा आठवणी येत होत्या. मोरपीस गालाला लावावं तसं थरथरत होतं. वाईट वाटत होतं ते म्हणजे बदलाचं. मी का बदललो? मी तसाच का नाही राहिलो ? काय वाईट होतो मी त्या वेळी? किती आनंदात होतो. सुखात होतो. सर्वांचा नातू होतो. सर्वांचा मध्यस्थ होतो. कसले संस्कार झाले माझ्यावर म्हणून मी बदलावा? कसलं शिक्षण कसले अनुभव घेतले म्हणून मी बदलावा?

....संस्कारित होणं म्हणजे बालपण जाऊन रूक्षपण येणं? संस्कारित होणं म्हणजे भाबडेपण जाऊन संवेदनाशून्य होणं? संस्कारित होणं म्हणजे फुलपाखराचा कोष होणं?

स्वतःचा देह सावरत ह्या जुन्या जिन्यावरून जाताना पुन्हा भीती वाटली. हा जीना पडेल याची. उजव्या हाताच्या दोराला धरून मी, हळूहळू हालणारा-बोलणारा लाकडी जिना चढत होतो. बऱ्यापैकी अंधार होता. वर माडीवर एक छोटा दिवा लावला होता.

वर गेल्या गेल्या उजव्या हाताला एका खोलीत पाठक की कोण राहत होते. नवरा बायको दोघंच. दोन-चार वर्षे झालेली लग्नाला. मूल अजून नव्हतं. पण मूल व्हावं असं पाठकांना व त्यांच्या बायकोला वाटायचं. तोपर्यंत ते मलाच मूल समजायचे व अधूनमधून मी जायचा. खायला केलं की हाक मारून थोडंसं द्यायचे. पद्मा टॉकीजच्या मॅनेजरची आणि पाठकांची ओळख. सिनेमा फुकट. बहुतेक वेळा मला बरोबर न्यायचे. दोघांना कधी खळखळून हसताना बोलताना मी पाहिलं नाही. पण सिनेमाला जाताना मला बरोबर नेण्यात त्यांचं काय मानसशास्त्र होतं हे आजही कळत नाही. नवीन लग्न झालेलं जोडपं कधी कुणाला सिनेमाला घेऊन जाईल का? मी मध्ये बसायचो. नव्हे बसवायचे. थोडे ताणल्यासारखे संबंध असावेत. मी त्याकडं फारसं लक्ष द्यायचा नाही.

मी असलो की दोघही हसायची, बोलायची माझ्याशी. हा पाठक मात्र वाड्यात कुणाशीही संबंध ठेवून नव्हता. बायकोनं कुणाकडं गेलेलं याला आवडायचं नाही. चोरून त्या आमच्याकडे यायच्या तेही त्याला आवडायचं नाही. नंतर भांडण व्हायचं. संध्याकाळी मग सिनेमा ठरलेला. मध्ये मी ठरलेला. माणसाच्या ताणलेल्या मनःस्थितीत एखादं मूल हवंच काय? आपलं नाहीतर दुसऱ्याचं. खरंच मूल असणं आणि स्वतः मूल असणं दुसऱ्याचा ताण नाहीसा करणारं तसा मी त्या वेळी होतो. पाठकांचं मूल, मालकांचा नातू, नांदगावकरांचा मूलगा.... पुढ पाठकांच्या बायकोला दिवस गेले. छोट्या खोलीतून आता हास्याचा खळखळाट ऐकू येऊ लागला. पाठक ज्यादा वेळ घरी थांबू लागले. वहिनी बाहेर जायला, आमच्याकडे यायला लागली. आटोपोटी दिसू लागलं. मी कौतुकानं त्यांना निरखायचो. वहिनींच्या अंगावर केवढं तेज आलं. अंग भरलं आणि पाठकही आता इतरांशी बोलू लागले. शल्य नाहीसं झालं. छोट्याशा खोलीत पाठकांनी मोठं विश्व निर्माण केलं. छोट्याशा खिडकीतून आनंद दरवळू लागला.....

... पण मला बोलावणं कमी झालं. मी त्यांच्या बरोबर सिनेमाला जाणं कमी झालं. पण मला वाईट वाटलं नाही. तेव्हाही आणि आत्ताही. कारण मला दुवा मिळाला होता आणि आता मी मोठा होऊ लागलो होतो. सातवीतून आठवीत जाणार होतो.

डाव्या हाताला एक तकलादू खोली होती. इंजिनीअरींगचा वाडीचा नाईक राहायचा. कॉलेजचा मुलगा. त्याच्याकडेही मी जाऊन बसायचो. तो चित्रे काढायचा. मीही काढायचो. त्याचे रंग वापरायचो. तो कधी कधी एकटा शून्यात दृष्टी लावून बसायचा. मला ते आवडायचं नाही.

'असे का बसलाय काका?'

अर्धवट उघड्या बायकांची एक दोन कॅलेंडर्स माझं लक्ष खेचून घ्यायची.

'असली कॅलेंडर्स कशाला खोलीत लावता काका?'

'बरं वाटत नाही बघायला?'

' वाटतं की. पण हे वाईट ना?'

'काय वाईट, काय चांगलं हे अजून मला समजायचंय' असं ते म्हणायचे.

माझं समाधान व्हायचं नाही.

'आई, स्त्रियांचे अर्धवट उघडे फोटो लावणं चांगलं की वाईट?'

'वाईट.'

'मग नाईक काकांनी कसे लावलेत?'

'तू जाऊ नकोस तिथं.'

नुसतं न जाणण्यानं प्रश्न सुटणार नव्हता. हे त्या आईला त्या वेळी कळत नव्हतं.

मग आमचं घर. किती छोट्या खोल्या होत्या म्हणून सांगू. आठ बाय आठ असेल कशीतरी. बाहेरच्या खोलीत बऱ्यापैकी उजेड. एक खिडकी बाहेरच्या गच्चीत उघडणारी. कॉट ठेवली की संपलीच खोली. तिथंच कपाटात रेडिओ. कुणी बसायचं येऊन तर कॉटवरचं. सोफासेटला जागा कुठं? पैसा कुठला? पलीकडच्या बिऱ्हाडामध्ये आणि आमच्यामध्ये बाहेच्या खोलीमध्ये पत्रा. सगळं ऐकू जायचं एकमेकांना. पण म्हणून कोणी अनैसर्गिकपणे राहात नव्हतं. घरात भांडणं चालायची. मोठ्यांदा हसणं खिदळणं चालायचं. त्यांची भांडणं कधी आम्हाला ऐकू यायची. आमचं कधी त्यांना ऐकू जायचं. त्यामुळे फारसा फरक पडायचा नाही. प्रकाश यायचा. दरवाजाजवळ पाठकांची खोली. मधल्या खोलीत आम्ही झोपायचो. दुपारीही रात्रीसारखा अंधार करून तिथंच. एक दोन पोती ज्वारीनं भरलेली. शेंगाचा पिंप. मधल्या खोलीत आईशी गप्पा मारताना पोत्यावर चढून बसायचो. पोत्यांचा उपयोग बसायला कोचासारखा. टेकायला लोडसारखा.आजारी पडलेल्या माणसाची ही खोली. मग खोली बघितली की आजारपणं आठवतात. मी पुढं गेलो. स्वयंपाकघर, गॅस नव्हता तेव्हा. स्टोव्ह आणि शेगडी. चुलीच्या पुढं गेलेलो आम्ही. रॉकेल दुकानात मुबलक मिळायचं. खाली बसून आई स्वयंपाक करायची. गरम गरम पोळ्या तव्यावरून डायरेक्ट पानात. किती भूक लागायची. हल्ली भूकही लागत नाही. व्यायामच नाही. तेव्हा किती खेळायचो. संध्याकाळ झाली की घरी यावं वाटायचं. वडील ऑफीसमधून आलेले असायचे. रेडिओ लावलेला असायचा. बातम्या, गीतमाला, बुधवारी लावायचो. कुठल्या गाण्यांना नंबर मिळणार याचा विचार करायचो. घर भरल्यासारखं वाटायचं. मी लहान होतो त्यामुळं घर मोठं वाटायचं. आता घर किती लहान वाटतंय!

कुठं झोपत असू आम्ही पाच माणसं? कशा पुरत असतील त्या तीन खोल्या. अंधाऱ्या पण त्यावेळी तक्रार नव्हती. उलट तीन खोल्यांच घर म्हणून मिरवायचो मी. स्वयंपाकघरातच न्हाणी होती. तिथचं आंघोळ करायची. म्हणजे सर्व स्वयंपाकघरच बाथरूमसाखं वापरायचं. ओल असायची थोडी स्वयंपाकघरात, पण कशाची तक्रार नव्हती.

फुलपाखराच्या आणि माणसाच्या जीवनाचं कसं उलटं समीकरण आहे! फुलपाखरामध्ये प्रथम अळी, नंतर कोश नंतर फुलपाखरू माणसांमध्ये उलटं. आधी फुलपाखरासारखं बालपण नंतर मध्यमवयीन असताना कोशावस्था व नंतर अळीसारखं म्हातारपण.

सगळा वाडा म्हणजे एका कुटुंबासारखा वाटायचा मला. कारण कुठही जायचं, कुठंही बसायचं, कुठंही खायचं. भूकंपानंतर आम्ही वाड्यातले सर्व लोक मधल्या चौकात झोपायचो. भूकंप झाला तर लवकर बाहेर पळता यावं म्हणून. पण रस्त्यावर येऊन उभारलं तर नांदगावकरांचा पाच मजली डोलारा.

स्वयंपाकघरातून परत फिरताना त्या जागेकडं लक्ष गेलं आणि एक आठवण मनाला रक्तबंबाळ करून गेली. शनिवार असावा. घरी कल्पना न देता मी सकाळची शाळा सुटल्यावर माझ्या मित्राकडं थांबलो. बराच वेळ दोन-अडीच पर्यंत. अकराला सुटलेला मुलगा घरी कसा आला नाही म्हणून घरी गोंधळ. बापू एका दिशेने बहीण एका दिशेने. हा नवा मित्र होता. त्यांनी लेलेकडं बघितलं. आईची तारांबळ उडाली. तिनं नांदगावकरांकडं पाहिलं. पाठकांच्यात पाहिलं. मालक वरून खाली आले. तेही अस्वस्थ झाले. दुपारी दोनला मी परत आलो. जेवण व्हायचंय हे मी विसरलोच होतो. स्वयंपाकघरात एका कोपऱ्यात मी पाट घालून बसलो. 'आई जेवायला वाढ. फार भूक लागली.' माझा नवा मित्र बरोबरच घेऊन आलेलो. तो बाहेर कॉटवर बसलेला. बापू व बहीण अजून हुडकतच होते.

आई माझ्या मागच्या बाजूला गेली आणि तिनं बाक्कन पाठीत लाथ मारली. मी पुढं पडलो. 'लाज नाही वाटत, अकराला शाळा सुटल्यावर दोनला घरी यायचं. अजून लहान धरगुडा आहेस वाटतंय काय? धरगुडा घोडा झालास. त्या नांदगावकरांकडे काय तासभर बसायचं. त्या पाठकांबरोबर काय सिनेमाला जायचं. आता सोड ते सगळे धंदे. आता मोठा झालास तू. असं वाऱ्यासारखं फिरायचं नाही. तिथं बसायचं पुरे झालं आता. आता जरा शहाण्यासारखा वाग.'

मी गप्प झालो. नंतर चौदाव्याचं जेवावं तसं जेवलो. माझ्या बालपणाचा चौदावा.

मित्रानं विचारलं,

'आवाज कसला झाला?'

‘आईनं लाथ मारली.’

‘कशाबद्दल ?’

‘उशीर झाला’

‘जाऊं दे. वाईट वाटून घेऊ नकोस.’

मित्रानं हाताला हात लावला.

‘वाईट लाथ मारल्याचं वाटत नाही रे. ही बहुधा माझं नांदगावकरांकडं, पाठकांकडं, मालकांकडं जाणं बंद करणार. मला घरी बसवणार. माझा जीव गुदमरणार.’ मित्र निघून गेल्यावर मी माजघरात पोत्यावर चढून बसलो. धुमसून धुमसून रडलो. आईनं जवळ घेतलं. पाठीवरून हात फिरवत डोळ्यात पाणी आणून विचारलं,

‘लागलं ? दुखतंय काय ?’

‘नाही आई. दुखत नाही, पण वाईट वाटतंय की मी आता लहान राहिलो नाही याचं.’.....

रात्रीचे आठ वाजलेले. स्वयंपाकघरातून मी बाहेर पडलो. सारं बालपण अश्रूंच्या रूपानं डोळ्यातून ओसंडत होतं. मन मोरपिसासारखं हलकं झालं होतं.

‘‘प्रकाश, डोळ्यात पाणी ?’’

वहिनींनी चहाचा कप पुढे केला.

‘वहिनी लहान होतो तेच बरं होतं बघा. आम्ही इथून निघून गेलो तेव्हा माझं बालपण याच वाड्यात सोडून गेलो होतो. ते मला आज पंचवीस वर्षांनी सापडलं.’

आणि मी बाहेर पडलो. पण मनोमनी मला पटलं होतं की तेव्हा मी छोट्या घरात राहणारा मोठा माणूस होतो आणि आता मी मोठ्या घरात राहणारा छोटा माणूस आहे.

● ● ●

वसंत

वसंत ऋतू जसजसा जवळ येऊ लागतो तसतशी माझ्या अंतर्मनात व रोमारोमात हळुवारपणे बदल घडू लागलाय याची मला जाणीव होत जाते. त्या जाणिवा एखाद्या कोकिळेच्या कुहू कुहू आवाजाने उत्कट होतात आणि रोम रोम व्यापून टाकतात. थंडीच्या शेवटी शेवटी झालेला शारीरिक त्रास अचानकपणे दूर होतो. शरीर स्वच्छ मोकळं होतं आणि मन हलकं फुलकं होत. फुलपाखरासारखं आणि वसंत ऋतूतील फुलापानांवर बसायला उत्सुक होऊन जातं. समुद्राला भरती आल्याप्रमाणं काहीतरी भरभरून वाहायला लागतं. शरीरातून नसानसातून एक संगीत निर्माण व्हायला लागतं आणि स्वतःतलं चांगलेपण स्वतःतल्याच वाईटपणावर बंड करून उठतं. !

रस्त्यातून जाता जाता खाडकन् गाडी थांबवून मी उभा राहतो. कोपऱ्यावरच्या आम्रवृक्षाला मोहर आलेला असतो. मी वेडापिसा होतो. सुरू झालं – माझं अंतर्मनातील संगीत सुरू झालेलं असतं. मागून आलेल्या गाड्यांच्या हॉर्नने मी जागा होतो आणि मला पुढं जावं लागतं. माझ्या

माझ्या कामात, काळजीत, व्यापात पुन्हा मी गढून जातो. काही दिवस जातात. वसंत पुढं सरकत राहतो. इतक्या सौंदर्याची लयलूट करणारा वसंतसुद्धा त्या काही दिवसात मी कसा विसरतो हेच मला समजत नाही. कामाच्या व्यापामुळं?– कसला व्याप? रोजचं तेच तेच काम.

कौटुंबिक जबाबदाऱ्यामुळं? – कसल्या जबाबदाऱ्या? स्वतःच आपण खूप काही अडचणीत आहोत असं स्वतःला भासवणं आहे ते. पण ही गोष्ट सत्य आहे की काळ झपझप पुढं सरकत राहतो. वसंत दारावरून खांद्यावर फुलं घेऊन फुकट वाटत जात असतो आणि आपण घरात झोपलेलो असतो, अशी अवस्था असते. मला खूप राग येतो स्वतःचाच की मी का त्या आंब्याच्या मोहराखाली जाऊन उभा नाही राहिलो? आंब्याच्या मोहोर मी का नाही हुंगला? माझ्या रक्तात त्याचा जिवंतपणा मी का नाही सामावून घेतला?

दवाखान्याचा व्याप वाढला होता. रुग्ण नसतील तर का नाहीत म्हणून अस्वस्थ व्हायला व्हायचं. खूप असतील तर जबाबदारी आणि कामामुळं मन जड व्हायचं. महिन्याचा खर्चही वाढलेला. दवाखान्याच्या हिशेबाची जुळवणूक करत बसणं काही वेळा अपरिहार्य व्हायचं. तो एक अदृश्य दबाव असायचा मनावर. त्यामुळं कधी वेळ मिळाला तरी त्या वेळेचा हवा तसा उपयोग नाही करू शकायचो. मी तो वेळ थोड्या बहुत व्यवसायाच्या काळजीतच जायचा. जे स्थान व्यवसायात प्राप्त झालं होतं ते टिकवणं किती अवघड हे जाणवू लागलं होतं. मिळवणं एक वेळ सोपं. कारण मिळवतांना मी झपाटलेलो होतो; पण टिकवणं त्यापेक्षा अवघड कारण त्यावेळी मी शिथिल असतो. हे सारं टिकवण्याच्या नादात माझा वसंत मात्र हळूहळू दूर चालला होता.

आंब्याला बारीक बारीक कैऱ्या लागू लागल्या होत्या. मोहोर संपला होता. मोहोर पाहणं आणि हुंगणं आता संपलं. पुन्हा त्यासाठी एक वर्ष थांबावं लागणार होतं. मागील वर्षी असंच मोहरलेल्या झाडाचं खूप वेळ निरीक्षण करणं राहून गेलं होतं. तसंच ह्याही वर्षी ते राहून गेलं. असं दरवर्षी असतं. मी वसंत ऋतूत खूप काही करायचं ठरवतो आणि खरं प्रत्यक्ष तर मी काहीच करू शकत नाही. द्राक्ष आणि पिकलेले आंबे खाणं एवढाच व्यवहारी पद्धतीनं वसंत अनुभवणं म्हणजे किड्यामुंगीचं जीणं झालं. वसंतात दगड भिरकावून एखादी का होईना कैरी पाडली पाहिजे आणि दगडानं फोडून मीठ लावून खाल्ली पाहिजे. एखादी फोड जरी खाल्ली तरी त्यातनं जो उन्मेष येतो तो खरा वसंत! पोपट चिमण्या वरच्यावर कैऱ्या खातात आणि वसंताची मजा लुटतात.

पक्षी खरे तर फार मजेत असतात, जगतात. चिमण्यांचं चिवचिवणं किती प्रफुल्लित करणारं असतं. माझ्या खिडकीतून दिसणाऱ्या कडुलिंबाला पालवी फुटलेली माझ्या नजरेतून सुटत नाही. त्यावर आलेला मोहोर, त्याची छोटीशी पांढरी फुलं आणि त्यावर नाचणारे भुंगे आपल्या कामात मग्न असतात. ती खरा वसंत लुटतात. झाडं मुळातनं कुरतडणाऱ्या घाणेरड्या अळ्या वसंतानं निःशेष केलेल्या असतात.

दवाखान्याचं व्यवस्थापन ही मोठी डोकेदुखी असते. कधी हा आला नाही तर कधी एक्सरेचा कामगार आला नाही. कधी वेळ देऊन रुग्णच येत नाही. ऑपरेशनची सगळी तयारी वाया जाते.कधी लाईट जाते. दिवसदिवसभर येत नाही. कधी बोअरींगची मोटार बंद पडते तर कधी नळच बंद होत नाही. कधी माळी येत नाही तर कधी इलेक्ट्रिशिअन वेळ पाळत नाही. तर एखादी मशीन विकत घेतलेला दुकानदार फोनवर फोन करीत असतो. ह्या व्यवस्थापनाला कंटाळून मी एखादी सिगारेट ओढून हे सर्व विषय सोडून देण्याचा प्रयत्न करीत असतो. तेवढ्यात रुग्णांचे प्रश्न सुरू होतात. ऑपरेशन्सचा थोडाबहुत ताण सुरू होतो. दिवस दिवस कसा जातो समजत नाही. रात्री कंटाळतो. मी परत येतो तेव्हा बऱ्याचदा बाहेरचं काही दिसतच नसतं. फक्त दिवे. फुलं कोमजलेली असतात. दिवसभराच्या चढउतारांनी मन बधिर व्हायला लागलेलं असतं. मी घरी येतो तेव्हा बायको, मुलंही फारशी स्वागतशील नसतात. त्यांना कुठं फिरायला नेलेलं नसतं ना मी. ती ही अबोल अबोलच असतात. मग माझा मीच फ्रीज उघडतो. त्यातलं गार पाणी संपलेलं असतं. गार पाणी नसलं की या दिवसात माझी तळपायाची आग मस्तकाला जाते. पण मस्तक अगोदरच पेटलेलं. मी कोमट पाणी गिळतो. ठरलेल्या खिडकीपाशी एकटाच बसून राहतो. खिन्नपणे. मला सोबतीला कोणीही नसतं. ना वसंत ना मुलं ना पत्नी . वारंही समोरच्या कडुलिंबाला हलवत असतं पण माझ्याकडे येत नाही. माझ्या खिन्नतेला सीमा नसते. कोकिळाही गायची थांबलेली असते. वसंतात ही विषण्णता का व कुठून आली हे कोडं उलगडतच नाही.

मी सकाळी झटक्यानेच उठतो, आंघोळ करून एकटाच चालू लागतो. रस्त्यावरून आंब्याला लगडलेले आंबे पाहात. वाटेत दोन चार बारकी पोरं दगडानं आंबे पाडत असतात. मी मोहरतो. माझा हात सळसळतो, वाटतं उचलावा दगड आणि पाडावे आंबे. पण पुन्हा मी शक्तिहीन होतो. कुठली कुठली बंधन घेऊन मी फिरत असतो देव जाणे! घड्याळाकडे लक्ष जाताच मी जिथल्या तिथं थांबतो. आणि मागं वळतो. परेड केल्याप्रमाणं एक दो एक दो करीत घरी परत येतो. तेव्हा कोकिळा मला बोलवत असतात. बाजारातून विकत आणलेल्या कच्च्या आंब्याचं तिखट कर म्हणून मी तिला

जरा जोरानंच सांगतो.

पोरांच्या परीक्षा अगदीच जवळ आलेल्या. मी अभ्यास घेत नाही म्हणून हिची नेहमीची ओरड. मी काय अभ्यास घ्यायचा? ज्याचा त्याने नको करायला? मी लहान असताना माझा कोण अभ्यास घेत होतं? कंदिलाभोवती आम्ही तीन भावंड बसायचो. मोठ्यांदा वाचायचीही सोय नव्हती. आईचं आम्हाला शिकवता येईल एवढंही शिक्षण झालेलं नसायचं. वडील फिरतीवर असायचे. पण अभ्यास करताना आई आमच्याजवळ बसलेली असायची. तिनं स्वयंपाक केलेला असायचा. तिचा हात आमच्या पाठीवर असायचा. मधूनच ती पाणी प्यायला आणून द्यायची. ती आमच्यासाठी उशीरपर्यंत जागायचीही. तिचं नुसतं जवळ बसणं आणि आम्हा तिघांच्याकडं बघणं इतकं प्रेमळपणाचं असायचं – उगवत्या सूर्याकडं पाहावं तशी ती पाहत असायची आम्हाला!

माझा लहानपणीचा वसंत मला अजून आठवतो. आंब्याच्या झाडाझाडातून आम्ही फिरायचो. कैऱ्या खायचो. कुठल्यातरी विहिरीत मनसोक्त डुंबायचो. कपडे अंगावरच वाळवायचो. आईची परवानगी घेतलेली नसायची. घरी आल्यावर मार खायचो आणि पुन्हा जेवून बाहेर पडायचो. वसंताच्या अंगाखांद्यावर खेळायचो. मुक्तपणे. त्या वेळची मनाची मुक्तता कुठे गेली? कधी कधी वाटतं शस्त्रक्रिया करावी मनावर. चाकू चालवून गेंड्याची कातडी फाडून टाकावी. आत चढलेली पुटं खरडून काढावी आणि स्वच्छ धुऊन टाकावं सगळं. बघावं, पुन्हा ती मुक्तता येते का नाही ते.

आजचा दिवस फारच कामात गेलेला असतो. सुट्टी सुरू झाल्यानं मुलांची पडझड वाढलेली असते. सुट्टीत ठरवलेली पोलिओग्रस्त मुलांची ऑपरेशन्स एकदमच आलेली असतात. रुग्णांची वर्दळही कमी नसते. हॉस्पिटल भरलेलंच असतं. सगळं संपवून राऊंड घेईपर्यंत रात्र झालेली असते. मी परत येतो तेव्हा मुलं झोपलेली असतात. ही सुद्धा झोपेतच असते. मी खिडकीजवळ बसतो. हळूहळू शांत शांत होण्याचा प्रयत्न करतो. जेवतो आणि झोपून जातो.

वसंताचा आणि माझा असा मुका संवाद चालूच असतो. मी त्याला भिडायला तयार असतो. पण बऱ्याच गोष्टी त्याला माझ्यापासून लांब ठेवण्याचा प्रयत्न करत असतात. हॉस्पिटलमधील काम किंवा कौटुंबिक व्याप हेच फक्त मध्ये येतात असं नाही. आणखी एक गोष्ट आमच्यामध्ये येते आणि ती म्हणजे – स्वतःतीलच मानसिक संघर्ष.

हा आणि कुठला संघर्ष? असं वेगळं रूप घेऊन येणारा, घरादारापेक्षा व समाजापेक्षा वेगळं अस्तित्व ठवेणारा हा कसला संघर्ष? हा संघर्ष मनातला.

मनामनातला. स्वतःला कुरतडणारा, खाणारा, वाळवी लागल्याप्रमाणं सर्वच संपवून टाकणारा. हा संघर्ष जीवनाला शाप की वरदान ते न कळणारा. हा संघर्ष स्वतःमधल्या चांगल्या आणि वाईटाचा. हा संघर्ष सत्त्वाचा आणि तमोगुणाचा. हा प्रत्येक माणसात केवढा असतो? असतो का नसतो? किती असावा? असावा की नसावा?असे अनेक प्रश्न उत्पन्न होतात. पण माझ्यातला हा संघर्ष खूप मोठा आहे. सतत कुरुक्षेत्राची अवस्था माझ्या मनाला करून दिलेला हा संघर्ष वसंतात चांगलंच डोकं वर काढतो. माझ्यातलं चांगलं आणि वाईट समोरासमोर युद्धाला उभारतं आणि अर्जुनासारखी अवस्था होते. काय मारावं? काय ठेवावं? मारणंही माझ्या हातात नसल्यासारखं. मारण्याइतकी ताकदही मला निसर्गतः दिलेली नसते. मी वाईटही मारू शकत नाही आणि चांगलंही. या युद्धात वाइटाची सरशी होते तेव्हा मी अस्वस्थ होतो. संघर्ष वाढला संघर्ष वाढला म्हणून मी डंके पिटतो. जेव्हा चांगल्याची सरशी होते तेव्हा मी शांत होण्याचा प्रयत्न करतो. पण सारं क्षणभंगुरच. कुणाचीही सरशी टिकत नाही. मी मात्र रंक्तबंबाळ होत असतो. ह्या संघर्षामधून डोकं वर काढायलाच मिळत नाही. कित्येक दिवस संपून जातात. पण साधी वसंताची आठवणही होत नाही. मला वाटतं हा संघर्ष जितका कमी तितका माणूस सुखी. मला वाटतं या संघर्षातून प्रत्येक जणच कमीअधिक प्रमाणात जात आहे. हा संघर्ष जीवनातील खरा संघर्ष आहे आणि बाहेरील संघर्षापेक्षा कितीतरी पटीनं अस्वस्थ करणारा आहे. सोनं जसं जळून आत्मरूप दाखवतर तसं हा संघर्ष माणसाला जाळून त्याचं आत्मरूप दाखवतो. ह्याला वेळ काळ नाही. हा सतत आपल्याशी भिडलेला असतो. तो आपणाला कुठंही सोडत नाही. बांडगुळासारखा आपल्यावरच जगत पण आपणाला शोषत राहत असतो. स्वतःच्या अस्तित्वाशीच संधान बांधून एखाद्या विषारी नागाप्रमाणं तो उभा असतो.पण आत्मतत्त्वाचं तो संरक्षणही करत असतो. तो आपणाला पूर्ण मरूही देत नाही. तो भयानक संकटातून तारतो. पण तितक्याच ताकदीनं पुन्हा दंश करीत राहतो. हिरे माणकांचं रक्षण केल्याप्रमाणं आपल्या जीवनाचं तो रक्षण करतो. जसं समाजात सत्याचं आणि असत्याचं कायमचं युगानुयुगे जुंपलं आहे, तसंच माणसाच्या मनात चांगल्याचं आणि वाइटाचं ह्या संघर्षारूपानं जुंपलं आहे. माणसाचं मन ही ह्या संघर्षाची कर्मभूमी आहे.

हा संघर्ष, घरातला विरोध आणि व्यवसायातील असमतोल या सर्वांनी जेव्हा मला अभिमन्यूप्रमाणं व्यूहात अडकवलेलं असतं तेव्हा मी कसा जाणार वसंताकडं? वसंत मला खुणावत असतो. बोलवत असतो. कोकिळ पक्षी साद घालत असतात. आणि मी या चक्रव्यूहात अडकलेला असतो. अभिमन्यूप्रमाणे. मी रडत असतो.

विव्हळत असतो. पण मी बाहेर येऊन वसंताला आलिंगन देऊ शकत नाही. दरवर्षी असं होतं. दरवर्षी ठरवतो मी की हा चक्रव्यूह आपण भेदायचा. वसंताशी एकरूप व्हायचं. पण दरवर्षी वसंत तसाच निघून जातो. मी मरेपर्यंत हे असंच चालणार का? ती मुक्त मिठी वसंताशी कधी होणार?

खूप काम करून संध्याकाळी मी परततो. खास पत्नीसाठी. मुलांसाठी. आज मात्र ती जागी असतात. मला येऊन बिलगतात. बापाची आतली खळबळ बच्चेलोकांना कळलेली असते काय कुणास ठाऊक! पत्नीही थोडी निवळलेली असते. फ्रीजमध्ये गार पाणी असतं. खिडकीपाशी चार खुर्च्या टाकलेल्या असतात.कडुलिंबाला हलवणारं गार वारं खिडकीतून आत येत असतं. मुलीनं कविता केलेली असते आणि मला वाचून दाखवायला ती उत्सुक असते.छोट्यानं त्याच्या हनुवटीला हातांनी आधार दिलेला असतो आणि मोठ्या श्रोत्याचा चेहऱ्यावर आव आणलेला असतो. मुलगी माझ्यासमोर येऊन उभी राहते आणि म्हणू लागते –

फुलं घेऊन हातात
डुलत हा चैत्र आला
पुन्हा गावेसे वाटले
धुंद कोकिळ पक्ष्याला
मधुशीतल गोडवा
पानापानांत भरला
जीव ओतून सृष्टीत
राजा वसंत हा आला.

कविता संपते. माझे अश्रू अनिवार होतात. मी तिला जवळ घेऊन तिचे पटापट मुके घेतो. जणू वसंताला आलिंगन दिल्याप्रमाणे!

टी.व्ही.च्या बातम्या चालू होतात आणि 'केरळमध्ये मान्सूनचे आगमन' ही बातमी एखाद्या खंजिराप्रमाणे मला भासू लागते.

●●●

मोर

सकाळची वेळ होती. वर्तमानपत्रातील बातम्यांवर नजर फिरवीत होतो. बातम्या कसल्या – सगळ्या समस्याच. बोडो आंदोलनात किती गेले, काश्मीर प्रश्न, अपघात, अंधश्रद्धा, अधश्रद्धा निर्मूलनाचा प्रयत्न, त्रिशंकू सरकार, निवडणुकीची टांगती तलवार..... एवढ्यात माझा मुलगा सोनू आला आणि माझा दंड पकडून जोरात हलवू लागला. हातातील पेपर खाली पडला. त्याचा आवेग आणि उत्साह पाहण्यासारखा होता.

''पप्पा लवकर चला, मी तुम्हाला गंमत दाखवतो.''

त्यानं माझ्या बोटाला धरून ओढतच मला आमच्या तिसऱ्या मजल्याच्या बाल्कनीत नेलं.

फुलवलेला पिसारा असलेला मोर आणि दोन लांडोरी असे तिघे आमच्या अपार्टमेंटच्या कुंपणाच्या भिंतीवर बसलेले होते. थंडी होती हवेत आणि श्रावणातीलं कोवळं ऊन. अशा वातावरणात डौलदारपणे ती तिघं भिंतीवर उभी. मोर तुमच्या घरी, तुमच्या दारात – अंगणात पाहण्याचा योग आलेला. एक वेगळाच आनंद. आमच्या अपार्टमेंटचा वॉचमन मुठीनं दाणे फेकत होता मोरांच्या समोर. स्वतःच्या एक वेळच्या जेवणाची भ्रांत असलेला हा वॉचमन, विसरून

गेला आपली गरीबी. सिंहासनावर आरूढ झाल्याप्रमाणे हे पक्ष्यांचे राजे समोर उभे. दाणे टाकल्यावर त्या पक्षातील मोर खाली आला. हळूहळू डौलदारप्रमाणे पुढं येत त्यानं एकेक दाणा टिपायला सुरुवात केली. त्या दोन लांडोरीही त्याच्यामागून तशाच लाजत, मुरडत, दचकत आणि लचकत पुढं आल्या आणि दाणे टिपू लागल्या. सोनू माझं बोट सोडून केव्हाच खाली गेला होता.

जादाकरून मोर पाहिले ते सारे प्राणी आणि पक्षी संग्रहालयात. कुठल्यातरी बागेत जाळीच्या बंदिस्त घरात जखडलेले. साधा पिसारा फुलवावा एवढी जागाही नसलेली जाळीची घरं. पाहताना कणव यायची मोरांची. पुढं येऊन येऊन जाळीच्या दारावर चोचीनं टोच मारण्याशिवाय काय करणार हे मोर? कसला तरी कुबट वास येत असलेला. असे मोर पाहिल्याच्या पार्श्वभूमीवर आजचं हे दृश्य फारच वेगळं होतं. अशा पद्धतीनं मोकळ्या मोरांनी माझ्या अंगणात यावं, मुलांनी दाणे टाकावे... जणू काही स्वप्नच. मुलं समोर उभं राहून ते चैतन्य मनामध्ये साठवून घेत होती. तिसऱ्या मजल्यावर सारं पाहताना क्षणभर मी गहिवरून गेलो. मोर कुणाचे, कुठून आले हे विचारायचं विसरूनचं गेलो. सोनू वर आला. त्याचा चेहरा खूपच बोलका दिसत होता. जीवनाला चालना देणारं, चैतन्य निर्माण करणारं काहीतरी आगळंवेगळं आपण पाहिलंय असे त्याला वाटत होतं. कुठल्यातरी पक्ष्यामध्ये माणसाला एवढा आनंद देण्याचं सामर्थ्य असतं हे मला आज कळलं होतं.

मोर रोजच येऊ लागले. चारेक दिवसानंतर पुन्हा ही मोर-मंडळी कठड्यावर बसली. सोनू माझ्याजवळ येऊन म्हणाला, 'पप्पा, मी मोरांना दाणे टाकायला जातो.' मी वाचत होतो. मला राहावलं नाही. नेहमीच्या बातम्या वाचायचाही कंटाळा आलेला. त्यापेक्षा चुकून एखाद्या वेळेला ह्या मोरानं पिसारा फुलवला तर? चुकून मोरानं नाचायला सुरुवात केली तर तो क्षण आपण सोडू नये असा वाटल्यानंतर पेपर बाजूला ठेवून मी गच्चीत आलो.

सोनू मोराला दाणे टाकू लागला. मोर आणि सोनू दोघेही तल्लीन झालेले. वॉचमनही कोपऱ्यातून कौतुकानं पाहात होता. मी वरून पाहात होतो. अभ्यासासाठी पाचेक मिनीटसुद्धा एका जागी न बसणारा हा चंचल मुलगा मोरासमोर ध्यानस्थासारखा बसला होता. वरून हे सारं पाहात असताना हृदयात एक वेगळ्याच प्रकारची तार छेडल्याप्रमाणं वाटू लागलं. एक वेगळाच झंकार, वेगळाच आनंद आणि एक वेगळीच शांतता मी अनुभवत होतो. पक्ष्यांचा आणि माणसांचा काय संबंध! केवढी ही जवळीक, केवढी तृप्ती!

पुढे कित्येक दिवस सकाळच्या वेळाचा हा दिनक्रमच होऊन बसला. दोनचार वर्षापूर्वीची गोष्ट असेल. इथून जवळच रामलिंग नावाचं गाव आहे. शंकराचं जागृत देवस्थान. जंगलाचाच प्रदेश. शंकराबरोबरच तिथं मोर खूप असतात असं ऐकलेलं. दुपारच्या जेवणाचे डबे बरोबर घेतले आणि आम्ही रामलिंग गाठलं. दर्शन घेतलं. गुहेतून टपटप अंगावर पडणारं पाणी आणि खूप प्राचीन स्वयंभू लिंग पाहिलं. एका झाडाखाली दुपारची जेवणं व झोप आटोपली. अधूनमधून मोरांचा मिॲव, मिॲव आवाज येत होता. पण एकही मोर दिसला नाही म्हणून आम्ही कुटुंबीय नाराजच होतो. खरंतर सर्वांना मी ओढूनच बाहेर काढलेलं. पावसाळा, चिखल, थंड हवा अशात कुणालाच यायचं मनात नव्हतं. सर्वांनी सामान आवरलं आणि नाराजीनंच आम्ही गाडीत बसलो.

रामलिंगच्या टेकडीवरून खाली दोन-तीन कि.मी. डोंगर उतारावरून आलो. बाहेर मिॲव मिॲव अशा आवाजाचा जल्लोश सुरू झालेला. आकाश काळ्या ढगांनी व्यापलेलं, टपटप पावसाचे थेंब पडू लागलेले. गाडीच्या खिडकीतून रामलिंगच्या पर्वत उतारावर मोरांचे कळपच्या कळप उभे राहिलेले दिसले. छोटी छोटी दहा बाय दहा आकारांची हिरवी डेरेदार झाडं. त्या झाडांच्या जवळ चारपाच मोर उभे असलेले. आम्ही उभ्या असलेल्या जागेपासून मोरांचं अंतर तसं लांब होतं.तरी त्यांचा आवाज स्पष्ट ऐकू येत होता. त्याचं चालणं लचकणं, मुरडणं आम्हाला दिसत होतं. मी गाडी थांबविली. आम्ही चौघेही गाडीच्या बाहेर आलो. दुर्बिण, कॅमेरा वगैरे वस्तू जवळ होत्याच. गाडी थांबवून आम्ही एका कट्ट्यावर उभे राहिलो. मोरांचं जणू संमेलनच ते! डोळ्यात प्राण आणून आम्ही पाहू लागलो. त्यांच्या आवाजासारखा आवाज माझी मुलं आवाज काढू लागली. नाचू लागली. मोरही त्यांच्या आवाजाला काय जणू प्रत्युत्तर देत होते. बघता बघता त्यातले चार-दोन मोर नाचायलाही लागले. त्यांनी पिसारा फुलवला. केवढा मोठा पिसारा-एक छोटसं झाड जेवढं असावं तेवढा! दहा बाय दहा एवढा मोराचा पिसारा पाहतांना मी माझं अस्तित्व विसरू लागलो. अनेक मोर फेर धरून नाचलेले मी प्रथमच पाहात होतो. मला असं वाटलं की बस् हा एकच असा पक्षी आहे की जो तुमच्या मनाला आणि हृदयाला नव्हे तर सरळ तुमच्या आत्म्यालाच स्पर्श करतो. मनाच्या पातळीपेक्षा खोलवर कुठंतरी हा पक्षी आपलं अस्तित्व रुजवत आणि बिंबवत होता, ठसवत होता.

अनेक पक्षी आपण पाहतो. प्रत्येकाचा ठसा एका वेगळ्या कारणासाठी आपल्या मनात उमटलेला असतो. आता कोकिळच घ्या. किती छान गातो. वसंत ऋतुची चाहूल करून देतो. वसंत संपल्यावरदेखील त्याच्या आवाजानं आपण आठवणीनं वसंत ऋतुत पुन्हा एकदा निसर्गात फिरून येतो. तरीही हा कोकिळ मनापेक्षा खोल कुठंतरी संधान बांधून

आहे असं वाटत नाही. चिमण्या घ्या; चिमण्या पाहिल्या की, सकाळ झाली असं वाटतं. काहीतरी सुरू झालंय असं वाटतं. मरगळलेल्या जीवनाला एक चैतन्य देऊन जातात चिमण्या. कावळ्यांची एक गंमत आठवते. मी स्वीडनला काही दिवस शिक्षणाच्या निमित्तानं गेलो. दोनेक महिन्यात मी एकही पक्षी पाहिलेला नव्हता तिथं. नुसतं बर्फ, बर्फासारखीच न बोलणारी माणसं म्हणजे माझ्याशी न बोलणारी आणि पक्षीही नाही बघायला व बोलायला. बारकाईनं पाहिलं तर आपण पक्ष्यांशी किती बोलत असतो. पोपट घ्या, चिमण्या घ्या, कबूतर घ्या आपण चक्क त्यांच्याशी कुठलेतरी आवाज काढत संवाद साधतो. प्राण्यांशी तर किती बोलतो आपण, बैलाशी शेतकरी बोलतो, कुत्र्याशी त्याचा मालक बोलतो, घोड्याशी घोडेस्वार तर हत्तीशी माहूत बोलतो. असं बोलण्याची पद्धत नसावी युरोपात. जिथं माणसं माणसांशीच नाहीत बोलत तिथं प्राण्यापक्ष्यांशी काय बोलणार? दोनेक महिने एकही पक्षी न पाहणारा मी जेव्हा परत निघालो तेव्हा इंग्लंडमध्ये – लंडनमध्ये प्रथम पक्षी पाहिला. वसंताची चाहूल इंग्लंडमध्ये नुकतीच लागू लागलेली होती. एका मोठ्या सुंदर किल्ल्याचं आम्ही निरीक्षण करत होतो आणि एक मोठा कावळा, काव काव करीत समोर मोकळ्या जागेत हिरवळीवर बसला. मला केवढं बरं वाटलं. कित्येक दिवसांनी पक्षी पाहिल्याचं. तो कावळा कौतुकानं मी कॅमेऱ्यात टिपून घेतला. माझ्यानंतर बहुधा तीच अवस्था इतरांची झाली काय कुणास ठाऊक? अनेकांनी कावळ्याचे फोटो काढले. असा हा कावळा अभावानंच भेटला तर हवाहवासा वाटतो.

वटवाघुळ पाहिलं की भयाणता, भुताटकी आठवते, कबुतर पाहिलं की मुंबईच्या गेट वेची आठवण येते. हिंदी चित्रपट सृष्टीतील नायक आठवतो – कबुतर उडवीत मुंबईत पदार्पण करणारा. जमिनीवर दाणे भिरकवावेत आणि हजारो कबुतरांनी घुटरगू, घुटरगू करीत त्यावर ताव मारावा – त्या आठवणी मनात तरळतात. बिचारी कबुतरं आकाशात विहार करून पुन्हा इमाने इतबारे मालकाकडं परत येताना मी पाहतो. तेव्हा कौतुक वाटतं त्यांच्या श्रद्धेचं. कारण इतक्या कोंदट आणि छोट्या कप्प्यात त्या कबुतरांना ठेवतात ते पाहिलं की मन खिन्न होऊन जाते.

घार पाहिली की, जीवनातील विशालता, भव्यता आठवते. घार आकाशात सर्वत्र संचार करते पण तिचं लक्ष पिलांपाशी असतं, हे जीवनाचं सत्य सांगून जाते. पोपट पाहिला की पोपटांची, बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी, पण पोपटाचंही सौंदर्य न्यारंच. माणसाचं साहित्य आणि जीवन दोन्ही व्यापलंय ह्या पक्ष्यानं.किती गाणी, किती कविता, किती कथा ह्या पोपटावर व्हाव्यात. पण पोपट माणसावर आणि माणूस पोपटावर किती प्रेम करतो हे मी प्रत्यक्ष पाहिलंय. देशपांडे नावाच्या माझ्या एका मित्रानं एक दिवस

झटका आल्यासारखं पिंजरा उघडून पोपट बाहेर सोडून दिला. तो पोपट फिरफिर फिरून संध्याकाळी पुन्हा देशपांडेच्या घरात येऊन बसला.

या साऱ्या पक्ष्यांच्या तुलनेत मोर मला वेगळा वाटतो. कारण मोर हा तुम्हाला साऱ्या आठवणींपासून दूर घेऊन जातो. मोराला पाहिलं की विचार थांबतात. या जगातील सर्व गोष्टींपासून तो तुमचं बोट धरून तुम्हाला दूर कुठंतरी घेऊन जातो. मोर आत्म्यालाच भिडतो आणि आपणाला साक्षात्कार घडवतो. मोर पाहिल्यावर द्वैत संपतं. सर्व निसर्ग, मोर व आपण एकजीव होतो. एकरूप होतो आणि मोरांप्रमाणं नाचू लागतं. असा साक्षात्कार त्या दिवशी मोरांनी आमच्या साऱ्या कुटुंबालाच घडवला. रामलिंगची सहल अजरामर झाली.आयुष्यात एखादं पाऊल पुढं टाकल्यासारखं वाटलं. असा हा पक्षी. आदरणीय असा हा स्वर्गीय पक्षी आमच्या अंगणातले दाणे टिपतो याचं आम्हा कुटुंबीयांना अलीकडं फारच कौतुक वाटत होतं.

माऊंट अबूला जाताना अहमदाबादेत दोन दिवस राहण्याचा प्रसंग आला. सकाळी चहा पिताना हॉलजवळून मिॲव मिॲव आवाज ऐकू आला. मला वाटलं बहुतेक मांजरं असतील. शहरात कुठले मोर?

''मांजर आहेत काय इथं?'' मी मोठ्या कौतुकानं विचारलं

''नाही, इथं मोर आहेत.'' हे उत्तर ऐकल्यावर मी खाडकन उठलो व हॉलचं दार उघडून बाहेर आलो. बाल्कनीतून पाहतो तो समोर क्रीडांगणात तीन–चार मोर डोल डोल डोलत होते. ते नाचणं पाहून वाटलं, अहमदाबाद नाही पाहिलं तरी चालेलं, निसर्गाचं एवढं सुंदर दर्शन त्या अहमदाबादेत दिवस उगवतांना मिळालेलं. मोर पाहिला की, फार मोठा शकुन झाल्यासारखं वाटत, ऊर भरून येते, काम होणारच असं वाटतं.

दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता अंधूक दिसत होतं. कॅमेरा खांद्याला अडकवून पायवाटेवरून साबरमती नदीच्या तीराकडं चाललो होतो. मी व माझी पत्नी आवाज न करता हळूहळू पुढे जात होतो. आमच्या पुढं दहाबारा फुटावर एक मोर चालला होता. जोपर्यंत आम्ही कुठल्या अनैसर्गिक हालचाली करीत नव्हतो तोपर्यंत तो अगदी बिनधास्त डौलदारपणे पुढं जात होता. जणूकाही आम्हाला काहीतरी दाखवायलाच तो आम्हाला बरोबर घेऊन चाललाय असं वाटत होतं. दोन्ही बाजूनं मोरांचा केकारव ऐकू येत होता.

फर्लांग दीड फर्लांग चालल्यावर साबरमतीचा तीर आला. आता मात्र मला मोराच्या जवळ जाऊन फोटो घ्यावा असं वाटू लागलं. मी भरभर पुढं आलो. मोरापासून

पाचसहा फुटावरून मी कॅमेरा डोळ्यासमोर धरतो तोच त्या माझ्या हालचालींमुळ मोर घाबरला. त्यानं त्याचे दोन्ही पाय जमिनीवर रुतवले व एकदम उंच आठ दहा फूट झेप घेतली आणि दोन्ही पंख फडफडवीत तो पंधरा फूट लांब जाऊन उभा राहिला आणि झाडीत अदृश्य झाला. मोर उडून पुन्हा बसेपर्यंत मी तीन चार फोटो टिपले. फोटो हलले. पण माणसाच्या स्वतःजवळ आठवणी साठवून ठेवण्याच्या ह्या भावनेतून आपण विनाकारण नैसर्गिक आनंदापासून कसे दूर जातो हेच लक्षात आलं. असेच मोरांबरोबर आम्ही अहमदाबादेतील त्या गावाबाहेरच्या आश्रमात दोन दिवस राहिलो. पुन्हा मी मोरांचे फोटो काढण्याचा फंदात पडलो नाही.माणसांबरोबर राहण्यापेक्षा मोरांबरोबर राहणं फारच आल्हाददायक वाटलं मला.

आमच्या सोनूचा मोराला दाणे घालण्याचा प्रकार तर चालूच होता. मोर अंगणात येत होते. त्यात हल्ली विशेष काही वाटत नव्हतं. त्याचा तेवढा वेळ त्या कारणासाठी जावा याबाबतही माझं काही दुमत नव्हतं. मलाही सवय लागल्यासारखी झाली होती. वर्तमानपत्र वाचण्यापूर्वी मी गच्चीत उभा राहून खाली घडणाऱ्या घटनांचा मनमुराद आनंद लुटत असे. सोनूबरोबर इतर मुलं जमा होत होती. दोन वर्षांपासून दहा वर्षांपर्यंतची ही मुलं आपापल्या घरातून निरनिराळ्या प्रकारचं धान्य आणत होती आणि मोरांपुढ टाकीत होती. अजिबात आवाज आणि दंगा न करता मुलं मोरांना न्याहाळत होती. आवाज केला की मोर पळतात असं त्यांना सांगितलेलं. तरीही मधून मधून हसून, नाचून संगीत निर्माण करायची मुलं. ते सारं पाहून माझंचं बालपण माझ्यासमोर उभं राहून नाचतंय असं मला वाटायचं.

सासूचा आणि सुनेचा संबंध कसा विक्षिप्त असतो हे नमूद करण्याची गरज नाही. जरी हा असा विक्षिप्त संबंध असला, त्यात राग असला, थोडा दुरावा असला तरी तो एक अपरिहार्य संबंध आहे याची जाणीव त्या दोघींनाही असते. माझी आई माझ्याकडं राहात होती. बऱ्यापैकी वृद्ध. पंच्याहत्तरच्या पुढचं तिचं वय. पाठीमध्ये थोडी वाकलेली. बऱ्याच वेळा कपड्याचं पूर्वीसारखं भान नसायचं. आईचा स्वभावही विनोदी. वाकून चालताना एका पायावर दुडकी चाल घेत एखाद्या पक्ष्यानं चालावं तशी ती काहीवेळा चालत असायची. एका कुठल्यातरी महत्त्वाच्या कार्यक्रमाला जाऊन आल्यावर माझी आई स्वयंपाकघरात उभी होती. छान भरजरी साडी नेसलेली. साडीच्या काठावर मोरपिसाची नक्षी होती. वाकलेल्या आईच्या कासोट्याचा काही भाग थोडासा बाहेर निघाला होता. जणूकाय मोराचा छोटासा पिसाराच आणि पिसाऱ्याच्या नक्षीचाच काठ होता त्या साडीला आणि आईची चाल एखाद्या पक्ष्याप्रमाणं असल्यानं माझी पत्नी नेहमी आईवर विनोद कराची, दुरावा नव्हे पण कधी कधी क्षणिक उपहास असायचा. तेव्हा माझी पत्नी म्हणाली

होती.

''मोर आला, मोर आला मोर.''

माझ्या पत्नीकडं दुर्लक्ष करीत आई दुडुक दुडुक करत चालत आपल्या खोलीकडं निघाली. भले विनोदानं माझ्या पत्नीनं असे म्हटलं असेल पण माझ्या पाठमोऱ्या आईच्या आकृतीकडं मात्र मी खूप कौतुकानं पाहिलं व खरोखर एखादा मोर चालत चालत आपल्या समोरून निघून जावा अशा पद्धतीनं त्या दिवशी माझी आई तिच्या खोलीत निघून गेली. आईचं आणि मुलाचं प्रेमाचं नातं ते;हिने चेष्टेने म्हटलं असलं तरी त्या दिवशी मला आईमध्ये खरा मोर दिसला. त्यानंतर काही महिन्यानी माझी आई गेली. पत्नीनं अनवधानानं माझ्या आईला त्या राजबिंड्या पक्ष्याची उपमा दिली म्हणून मी पत्नीची धन्यताच मानतो. कारण हल्ली मोर दिसला की मला आईची आठवण होते. माझ्या पत्नीनं माझ्या आईला मोराशी संलग्न केलं. आई आठवल्यानं मला दुःख नाही होतं. आई गेलेल्या जखमेची खपली नाही निघत, पण त्या जखमेवरून मोरपिस फिरल्यासारखा भास होतो मला. मी मोराला पाहिल्यावर आईच्या आठवणींच्या शेवटी मला पाठमोरा मोर दिसतो.

काही कामानिमित्त आठ दिवस मला बाहेर गावी जावं लागलं. रात्री उशिरा परतून मी झोपलो. सकाळी उठून नेहमीप्रमाणं मी गच्चीत उभा राहिलो.खाली अंगणात नेहमीपेक्षा थोडा फरक जाणवत होता. मुलं कोणीच नव्हती. एकटा सोनूच मोरांना दाणे टाकीत होता.

तो मोठा मोर नव्हताच. फक्त दोन लांडोरी दाणे टिपत होत्या. वातावरणात एक दिव्य शांतता जाणवत होती. मी थोडासा अस्वस्थ होऊन खाली गेलो.

''सोनू मोर कुठे गेला ?''

असं मी विचारताच हातातली वाटी सोनून भिरकावून दिली आणि तो माझ्या जवळ आला. दोन्ही पायाच्या टाचा तो जमिनीवर घासू लागला आणि दोन्ही हाताच्या मुठींनी माझ्या छातीवर जोरजोरात मारू लागला. जोरजोरात रडू लागला. मी त्याचे दोन्ही दंड पकडले व स्वतःपासून त्याला लांब धरत विचारलं.

''अरे काय झालंय ते तरी सांग.''

''पप्पा एका माणसानं त्या मोराला एक मोठा दगड मारला. मोर कठड्यावरून खाली उतरून चालला होता. दगड मारल्यावर मोर खाली पडला आणि तडफडू लागला, तो माणूस पळत आला आणि त्या मोराची मान पकडून तो पळून गेला.''

''तू काय करत होतास त्या वेळी.''

''मी पळत पळत जाऊन कठड्यावर उभा राहीलो, चोर चोर, पकडा म्हणून

जोरात ओरडलो, पण माझं कोण ऐकणार? तोपर्यंत तो माणूस पळून गेला'' असं म्हणत पुन्हा सोनू माझ्या छातीवर प्रहार करू लागला. बिचारा मोर, तो वर गेलाच होता. त्या लांडोरींना तर बोलताही येत नव्हतं. त्या पक्ष्यांची बाजू घेऊन माझा छोकरा माझ्याशी भांडत होता. कारण मनुष्यजातीचं मीही एक प्रतीक होतो. माझा मुलगा जणू एक मोरच बनून साऱ्या मनुष्य जातीला जाब विचारीत होता.

मी वॉचमनला विचारलं, ''काय झालं?''

''सायेब, मानसं लई वंगाळ, ह्यो एवढा मोठा दगूड हानून पक्ष्याला पळवलं.''

माझ्या मुलानं मला विचारलं,

''पप्पा माणसं मोठी झाल्यावर असं मोर मारतात?''

खरं तर ह्या साऱ्या प्रसंगातून मला उत्तर देणं तर सोडाच पण स्वतःच्या ताकतीनं मी जमिनीवर उभं राहू शकेन की नाही अशी माझी अवस्था झालेली. मी म्हणालो,

''नाही बेटा, माणसांनी असं करून उपयोगी नाही.''

''पण पप्पा मोराला असं मारता येतं?''

''नाही बेटा मोराला असं मारता येत नाही, तसा कायदा आहे. मोराला मारलं तर तो गुन्हा आहे.''

'' मग या माणसाने मोराला कसं मारलं आणि का मारलं? ''

''तुझ्या प्रश्नांची उत्तरं मला आत्ता देता येत नाहीत, मी विचार करतो आणि काही दिवसांनी सांगतो.''

एवढ्यावर सारा खेळ संपला. दोन्ही लांडोरी एव्हाना कठड्यावर चढून खाली निघून गेलेल्या .

मी सोनूला उचललं. तसा दहा बारा वर्षांचा पोर. त्याला खांद्यावर घेतलं. त्याला बरं वाटावं म्हणून वर घरी आणून त्याच्याशी गोड गोड बोलू लागलो.

सोनूच्या प्रश्नांची उत्तरं माझ्याकडं नव्हती म्हणून नव्हे, पण मी स्वतःच ह्या साऱ्या प्रकारांमुळं खिन्न झालो होतो. माझ्या मनातला मोर माझ्याशी नीट बोलेनासा झाला होता. एकीकड आमचा गरीब वॉचमन, ही छोटी छोटी मुलं मोरावर जीव ओवाळून टाकत होती तर एकीकडं दगड फेकणारी काही माणसंही होती. इकडे माझं व्यावसायिक काम सुरळीत चालू होतं. सोनूच्या प्रश्नांची उत्तरं मला सापडत नव्हती तरीही मी तो विचार सोडून दिला नव्हता.

आठ ते दहा दिवसांनी एक घटना घडली. मी वर काहीसं काम करीत होतो. सोनू खालून जीवाच्या आकांतानं ओरडलेला मला ऐकू आलं.

''पप्पा लवकर या, पप्पा पळा.''

मुलाचा आक्रोश ऐकून मी ताबडतोब गच्चीत गेलो. सोनू कंपाऊंडच्या कठड्यावरून जोरजोरात ओरडत होता.

''पप्पा पप्पा मोर गेला, लांडोर गेली.''

''कुठं गेली?'' मी ओरडलो.

मी वरून सर्वत्र बारीक नजरेनं पाहात होतो. कुठं एखादा माणूस मोराला पळवतोय काय हे शोधत होतो. पण कुठंच काही दिसेना.

''पप्पा कुत्र्यानं लांडोर नेली''.....

मी जवळची एक काठी हातात घेतली. पळतच खाली गेलो. सोनू जवळ कठड्यावर येऊन उभा राहिलो आणि समोर पाहू लागलो. खूप दूरवर एक कुत्रा लांडोरीची मान तोंडामध्ये पकडून पळत होता. तशाही परिस्थितीत मी त्या कठड्यावरून खाली उडी मारली आणि पळत पळत काही काटेरी झुडपं तुडवत मी पुढं गेलो. माझ्या लक्षात आलं की तोवर कुत्रं माझ्या दृष्टीपलीकडं गेलंय.त्याला अडवणं मला शक्य नव्हतं. पायामध्ये वहाणाही नव्हत्या. तसाच मी परत फिरलो. पायाला असंख्य काटे टोचले होते. पण त्याची जाणीवही मला होत नव्हती. कठडा उतरून मी परत अंगणात आलो. माझा मुलगा माझ्यासमोर उभा होता. दातांनी ओठ दाबत होता. त्याचे दोन्ही हात थरथरत होते. अतिशय चिडला होता तो. पहिला मोर गेला तेव्हा दुःख जास्त होतं पण आता चीड जादा होती. पूर्वीसारखं तो माझ्याजवळ येऊन माझ्या छातीवर बुक्की मारत नव्हता. उलट तो माझ्यापासून चिडून दूर सरकत होता. याबद्दल वाईट वाटण्याच्या मनःस्थितीत मीही नव्हतो. मी आणि तो दोघं एकमेकांकडं बराच वेळ पाहात बसलो. मला न बिलगता पळत पळत तो वर निघून गेला. मी वर येण्यापूर्वी वॉचमनला म्हणालो,

''वॉचमन, त्या मोराच्या मालकाला सांग, पुन्हा मोर पाठवू नका आमच्या अपार्टमेंटच्या अंगणात.'' बिचारी एकटी लांडोर कठड्यावर चढली व हळूच निघून गेली. मी वर आलो तेव्हा माझा सोनू त्याच्या आईला बिलगत होता. तिची साडी जोरजोरात ओढून तो ओरडून तिला विचार होता,

''आई कुत्री आणि माणसं यात काहीच फरक नाही का गं?''

●●●

यादव सरकार

सुमारे आठ वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. नक्की तारीख आठवत नाही. खरं तर तारखेला तसं महत्त्व काय? जीवनाच्या कालखंडात कुठंतरी ठिपक्यासारखा तो एक क्षण असतो. काही माणसं भेटतात त्यावेळी. पुढंमागं ती माणसं तुमचं जीवन समृद्ध करून जातात. त्याची जाणीवही आपणाला नसते. तसंच काहीसं झालं यादव सरकारांबाबत. माझा मोठा चुलत भाऊ सुधीर मला एके दिवशी या गृहस्थाकडे कोगीलला घेऊन गेला. त्या काळात मी ही अनेकदा विचलित मनःस्थितीतच असे. अजूनही असतो; पण दोन्हीत फरक जाणवतो.

शर्टवर एक दोन ठिकाणी रफू केलेला पांढरा स्वच्छ शर्ट व विजार. जाड भिंगाचा चष्मा. डोक्यावर विरळ झालेले पांढरे स्वच्छ केस गळ्यापर्यंत व मानेपर्यंत रूळलेले. असे हे निर्लोभस पण कमालीचं शांत व्यक्तिमत्त्व. भावानं त्यांची ओळख करून दिली.

''प्रकाश, हे यादव सरकार''

मला क्षणभर खाली वाकावं असंही वाटलं नाही. मी उभ्या उभ्याच नमस्कार केला. सरकारांच्या चेहऱ्यावर

कुठलाही बदल जाणवला नाही. स्टोव्ह पेटवून त्यांनी चहा केला. बाहेरच्या कठड्यावर बसून विमनस्क स्थितीत मी चहा प्यालो. माझा भाऊ व सरकारही फारसं काही बोललेलं स्मरत नाही.यादव सरकारनी मठी बांधून एक-दोन वर्षे झाली असवीत. त्याच्या खिडक्या फारच बाजूला असाव्यात. त्यामुळे त्यातून जनावरं आत येण्याची भीती होती असं ते म्हणत होते, म्हणून स्वामी कृष्णदेवांनी खिडक्यांस जाळ्या बसवून देण्यास येऊन जातो असं सांगितलं होतं. चारच दिवसांपूर्वी स्वामींनी येऊन सरकारांच्या खिडक्यांना स्वतः जाळ्या ठोकल्या होत्या. सरकारांपेक्षा तीस एक वर्षे लहान असणारे हे स्वामी पूर्वाश्रमीचे इंजिनिअर होते. मठी बांधण्यात स्वामींचा सिंहाचा वाटा होता असं सरकारांनी आवर्जून सांगितलं होतं. स्वतःच्या गुरूंनी येऊन शिष्याला जनावरांचा म्हणजे सापांचा त्रास होऊ नये म्हणून जाळ्या बसवून जाणं हे मात्र मला तेव्हाही काहीतरी वेगळं वाटलं. नेहमी पाहात असलेलं, गुरूच्या पायावर डोकं ठेवायचं, त्यांनी प्रसाद द्यायचा; यापेक्षा हे वेगळं काहीतरी आहे याची जाणीव मात्र मला त्याही परिस्थितीत झाली होती.

कुठल्याही भावनेविना मी निरोप घेतला. त्यांनी दिलाही. माझा पत्ता विचारून घेतला. यादव सरकारांबद्दल जुजबी माहिती माझ्या भावानं मला दिली होती. ते एकटे राहात. एक मिळवता व दुसरा अपंग मुलगा पुण्यात आईबरोबर राहात असे. तीनेक वर्षांपूर्वी वडिलांच्या सेवेसाठी सरकार कोल्हापूरला आले. येतांना पत्नीला विचारलं असेल. त्यांचा तिथं बसलेला जम मोडून त्यांनी यायचं टाळलं असेल. आणि सरकारांचा वानप्रस्थाश्रम सुरू झाला असेल. मुलाला पेन्शन व फंडाची सर्व रक्कम सुपूर्त करून त्याच्याकडून व्याजापोटी फक्त महिना ५००/- रु. घेण्याचे ठरवून सरकार पुण्याचं घर सोडून या उजाड जागेत एकटे राहात होते. त्यांनी इथं एक बोअर मारली होती व त्यात थोडं पाणीही लागलं होतं. त्या पाण्यानं त्यांनी दीड एकराच्या जागेत पुढच्या अंगणात अनेक फुलांची झाडं लावलेली होती. मागच्या बाजूला पेरूची छान बाग होती. कलमी आंब्याची दहा वीस झाडं चांगली बारा तेरा फूटावर गेली होती. ते मठीच्या उजव्या बाजूला थोड्या शेंगा, मिरच्या व टोमॅटोचं जरुरीपुरतं पीक घेत असत. त्यावर दीड एकरात गड्याकडून थोडी शेती ते करीत असत. बाकी उर्वरित शेती आपल्या वडिलांच्या आज्ञेनुसार आपल्या लहान भावाला बहाल करून टाकली होती आणि व्यावहारिकरीत्या खऱ्या अर्थानं सरकारांचं सरकारपण अशा पद्धतीनं संपुष्टात आलं होतं. यादव सरकार सर्व काही सोडून फक्त महिना पाचशे रुपयावर मठीत अत्यंत गरीब पद्धतीने आपले जीवन व्यतीत करीत होते आणि त्याबद्दल त्यांच्या मनात काडीचंही दुःख नव्हतं. स्वतःच्या हातानं आपली सरकारगिरी संपवलेला तो एक फकीर होता आणि दिसायचाही फकीरासारखाच. फक्त

त्यांच्या डोळ्यात एक चुणूक होती आणि जीवनात स्वायत्तता होती.या सर्वच गोष्टी पैशानं मिळवता येत नसणाऱ्या होत्या.

खरं तर पहिल्या भेटीनंतर कधीच पुन्हाः पुन्हा या माणसाला भेटावं असं मला वाटलं नव्हतं. एक दिवस दवाखान्यात 'यादव' आलेत असं कळल्यावर मी त्यांना तातडीनं आत बोलावलं. पिवळ्या धमक देशी केळींचा एक डझन त्यांनी माझ्या टेबलावर ठेवला.

''डॉक्टर आपल्या बागेतील केळीचा घड पिकला.''

''मग कोल्हापूरला काय काम काढलं होतं?''

''काही नाही. केळी वाटत फिरतोय. सुधीरकडं, भावाकडं पोहोचती केली.आणि एक दोन ठिकाणी जायचंय . चलू का? ''

''चहा घेऊन जा ना.''

चहा पीत असताना मी त्या माणसाला निरखत होतो. वयाच्या ७६-७७ मधल्या ह्या माणसाचं दुसऱ्याला देणं अजून संपलेलं नव्हतं. ते चहा पिऊन उठले. एकदा मठीवर राहायला अगत्यानं बोलवलं. त्यांचा पाठमोरा देह अजून आठवतोय.समोरून जसे तसेच पाठमोरून. काही फारसा फरक जाणवलाच नाही. आत एक बाहेर एक हे या माणसाला माहीतच नसावं. अंतर्बाह्य पांढरा स्वच्छ असणारा हा सरकार धीरे धीरे पावले टाकीत चालत असायचा.

चुलत भावानं एकदा आग्रह करून राहायला मठीत नेलं. मी माझ्या व्यापातनं कुठतरी बाहेर पडतोय याचाच फक्त मला आनंद वाटत होता. भावानं माझं आणि त्याचं जेवण बरोबर घेतलं होतं. एकदोन शाली बरोबर घेतल्या आणि ६/६.३० च्या दरम्यान कोगील गाठलं. गाडीचा आवाज ऐकून सरकार बाहेर आले आणि त्यांनी गेट उघडले. चहा आला. जेवणं झाली आणि त्यांच्या बाहेरच्या कट्ट्यावर आम्ही तिघं बसलो. बाहेर रातकिड्यांचा आवाज. अंगणातील फुलझाडं मात्र बहरलेली. ती चंद्राच्या प्रकाशात स्पष्ट दिसत होती. कुठल्याही प्रकारचा आवाज नव्हता. पक्षीही झोपलेले असावेत. उन्हाळ्यातला गार वारा. आकाश स्वच्छ, निरभ्र, चांदण्यांची नुसती बरसात. झुंबर लावल्यासारखे तारे आकाशाला लटकलेले. मन शांत शांत होत चाललेलं. क्षणभर कुठेतरी संवेदना चमकून गेली. आणि वाटलं आपण यादव सरकारांच्या दरबारात बसलेलो आहोत!! इथं ताऱ्यांची झुंबरं आहेत. इथं वारा घालावा लागत नाही. इथं फुलं जिवंतपणे

डोलतात. तोडून फुलदाणीत ठेवावी लागत नाहीत. सरकारनं सगळे पैसे चुरमुऱ्यासारखे का वाटून टाकले असावेत या गणिताचं पहिलं सूत्र मी माझ्या मनाच्या कागदावर मांडून टाकलं होतं. मलाही हल्ली थोडी थोडी अक्कल यायला लागली होती.

कुणीही कुणाशीही कुठल्याही विषयावर बराच वेळ बोललं नाही. काही प्रश्न काही समस्या काही दुःखं बरोबर घेऊन आलो होतो. पण या दरबारात शांततेत त्याची उत्तरं कुणी दिली हे कळलंच नाही. पण पुराच्या पाण्यातील घाण हळूहळू खाली बसावी तसं झालं. नंतर भावानं त्यांना काही प्रश्न विचारून काहीशी चर्चा केली. मला भाऊ म्हणाला, तुला काही विचारायचं असलं तर विचार. मी एक वेळ सरकारांच्या डोळ्यात पाहिलं. एक हास्य होतं त्यात. डोळ्यानं हसत होता तो माणूस. ते पाणिदार डोळे मला शांत शांत करत गेले. मी घेऊन आलेल्या साऱ्या प्रश्नांच्या मी कागदी नावा तयार केल्या आणि शांत यादवांच्या डोळ्यातून दिसणाऱ्या पाण्यात अलगद सोडून दिल्या. यादवांच्या लक्षात आलं होतं हा पोरगा आज काही बोलणार नाही आणि माझ्या लक्षात आलं होतं हा माणूस मला माझ्या संघर्षातून वर काढणार. पण हा जगणार किती? याचं वय काय? यानं स्वतःला जपलं पाहिजे. यानं माझ्यासाठी सुद्धा स्वतःला जपलं पाहिजे आणि अशाच डोळ्यांचे सागर माझ्यापुढे उलथले पाहिजेत. मला त्यात अनेक कागदी नावा सोडायच्यात इतक्या अत्युच्च अनुभूतीत सुद्धा माझा स्वार्थ मला कसा दंश करीत असे त्या काळी याची आठवण हल्ली मला अधिक अंतर्मुख करते.

वारा कमी झाला. आम्ही अंथरुणं टाकली. शांत मनानं झोपेची चाहूल घेऊ लागलो. रात्रीचे साडे अकरा बारापर्यंत मी तसाच पडून राहिलो. कट्ट्यावरून आकाशातले बदल मी पाहात होतो.ढग कधी आले ते कळलंच नाही. पूर्वेकडे काही ढग जमा झालेले दिसले. थोडं अंधारल्यासारखं झालं. चंद्र दिसेनासा झाला आणि आकाशात दूरवर एक दोन विजा चमकल्या. टप टप एक दोन थेंब, मोठाले अंगणात पडलेलं जाणवलं. उन्हाळी पावसाची चाहूल लागली. सरकार व भाऊ कधीच झोपून गेलेले होते. बाराच्या सुमारास घुंगरांची एक बैलगाडी दारात आली. सरकारना हाक दिली गेली. सरकार उठले. तोवर गाडीवान आत आला. बॅटरीनं सरकारनी त्याचा चेहरा न्याहाळला.

''काय रे पांडू, रात्री आलायस?''

''सरकार, खळ्यात चार थेंब पडलं. वर बघा. पावसाचा नेम नाय. खळ्यात तुमची पोती आजच भरल्यात. घेऊन यायला लागणार.''

असं म्हणत तो आत आला. पडवीतली पोती खांद्यावर उचलली. नीट लावली.

खराट्यानं साफसफाई केली. चार लाकडांचा एक माचा त्यानं तयार केला आणि अर्ध्या तासात सरकारांची दहा पोती ज्वारी घेऊन तो आला. स्वतः पोती उतरवली. नीट लावली. आणि एकच्या सुमारास तो निघून गेला. मी जागाच. सारं शांतपणे पाहात होतो. पोती ठेवतांना त्याला थोडी मदतही केली.

''सरकार, हा कोण तुमचा वाटेकरी?''

''नाही बाबा, हा तर गावातला एक शेतकरी. खळ्याजवळ राहतो. पावसाचे थेंब पडले. माझी मळणीची पोती भरलेली त्याला माहिती होती. आणली आपली बिचाऱ्यानं. असं जपतात. माझ्या संरक्षणाची काळजी जबाबदारी जणू काय त्यांचीच आहे असं वागतात. ही माणसं आहेत म्हणून मी आहे. नाही तर सारी ज्वारी निकामी झाली असती.''

सरकार शांतपणे पुन्हा झोपून गेले. मग झोपच येईना. चार साडेचार वाजत आले. अनेक विचारांनी पुन्हा मनाचा ताबा घेतला. 'कोण हा माणूस? इतकं काम कसं करतो सरकारांचं? सरकारनी पैसेही दिले नाहीत याला. आपल्याकडे एक आंब्याची पेटी उचलायला पाच रुपये घेतात. इथं एकेक पोतं १०० किलोचं अशी दहा पोती यांनी आणली कशी? तेही रात्री बाराला! तेही सांगितलं नसतांना या निर्मनुष्य जागी खरोखर माणसं राहतात असं जाणवलं. आणि इकडं तिकडं नजर वळवली. सरकार अंथरुणावर उठून बसले होते. मांडी घालून डोळे बंद ठेवून अविचल बसलेली ती मूर्ती पाहिली आणि मला हळूहळू गुंगी येऊ लागली.'

माझ्या एकूणच व्यावसायिक जीवनाशी अशा पद्धतीच्या एका वेगळ्या जीवनपद्धतीचा संबंध येत राहावा असं मला वाटू लागलं आणि भारावल्यासारखा यादव सरकारांकडे येत राहिलो. विशेषत्वानं मी जेव्हा माझ्या व्यावसायिक जीवनात विस्कटायचो, माझ्या पायाखालची वाळू सरकू लागायची तेव्हा मी पिशवीत एकदोन दिवसांचे कपडे भरायचो आणि गाडी घेऊन सरकारांची मठी गाठायचो. सरकारांचं मला व्यसन लागायला लागलंय असं माझ्या निकटवर्तीयांना वाटायचं. माझ्या बोलण्यात यादव सरकार येऊ लागले. माझ्या वागण्यात थोडे थोडे सरकार येऊ लागले. ते माझ्या जगण्यात येऊ लागले. माझ्या अस्वस्थतेत आणि स्वस्थतेतही सरकार डोकावतांना दिसू लागले.

मी खरंतर इतका का विस्कटतो, इतका का अस्वस्थ होतो, माझ्या मनात इतकी चलबिचल का होते याचा शोध काही मला लागत नसे. पण सहा एक महिन्यानंतरची माझी परिस्थिती इतकी बिघडत असे की एक दोन दिवस सरकारांसोबत घालवल्याशिवाय मी

शांत होत नसे.

असाच एकदा पूर्ण भेदून गेलेला मी सरकारांसमोर उभा राहिलो.

''सरकार, सारं संपलं, काहीच करावंसं वाटत नाही. तुमच्यासारखं एकटं कुठंतरी जाऊन राहावं वाटतंय. तेही नसेल नशिबात तर राहू दे. सारं संपलं तरी चालेल.''

''बसा डॉक्टर, चहा प्या.''

सरकारनी स्टोव्ह पेटवला आणि तो स्टोव्हचा फर्रऽऽ असा आवाज सुरू झाला. हा आवाज आणि माझं बालपण यांचा एक संबंध आहे. आई स्टोव्ह पेटवून चहा करायची आणि मला द्यायची. तेव्हाचा मी वेगळा होतो. तेव्हा मला असं काही वाटायचं नाही. मी आतल्या खोलीत गेलो. यादव सरकार स्टोव्हला पिन करण्यात व्यस्त होते. जमत नव्हतं. माझ्याकडे मी पिन घेतली व स्टोव्ह चांगला पेटवला.

''हल्ली दिसत नाही. डॉक्टर म्हणालेत मोतिबिंदू वाढलेत. ऑपरेशन करायला पाहिजे.''

''मग काय ठरवलंय?''

''स्वामी कृष्णदेव येतो म्हणालेत. आठ दहा दिवस राहून बघूया म्हणालेत.''

''मग करून टाका. पण पैशाचं काय?''

''स्वामींनी सांगितलंय पैशाचं बगू काय करायचं ते.''

थोड्या वेळान बाळू एक भाकरीची पुरचुंडी घेऊन आला. बाळू सरकारांच्या सेवेला राहात असे. मठीत अभ्यास करून दहावीत बसला होता. पाणी भरणं, स्वच्छता करणं ही कामं तो करायचा. सरकारना हल्ली कमी दिसायचं.

''भाकरी कुणी दिल्या?''

''संभाच्या बायकोनं.''

''आरे पण कशाला? केल्या असत्या मी.''

''ती म्हणत हुती, डाक्दर आल्यात वाटतं म्हणून दिल्या.''

माझी गाडी अथवा कोणी पाहुणा सरकारांच्याकडं आला की अशी भाकऱ्यांची पुरचुंडी पोहोचत असे. गावातील कोण ना कोणतरी आपणहून देत असत.

सणादिवशी सर्वजण सरकारना पुरणपोळ्या पाठवत असत. पाचपन्नास पोळ्या जमत. सरकार एक दोन खात. बाकीच्या घेऊन संध्याकाळी कट्ट्यावर बसत. गावातील

गरीब पोरं संध्याकाळी सरकार सरकार करत येत. त्यांना सरकार पोळ्या वाटत बसत. सरकार कट्ट्यावर एका ताटात पोळ्या घेऊन सर्वांना वाटत असत. दिवाळीच्या वेळी फराळाच्या पदार्थांची तीच अवस्था. सरकारांच्या पेरूची बाग फुलली की गावातील मुलं विचारायला येत.

''सरकार पेरू घेऊ?''

''घ्याना. पण कच्चे तोडू नका. तुमचीच बाग आहे. मला कुठं चावतात हल्ली पेरू!''

वाऱ्यापावसात पिकलेल्या पेरूंचा सकाळी सडा पडत असे. गोळा केलेले पेरू संध्याकाळी सरकार पोत्यावर टाकत आणि येणाऱ्या जाणाऱ्यांना वाटत असत.

मी सरकारांना नाना प्रश्न विचारीत असे. त्यांना कंटाळा किंवा राग आलेला कधीच दिसत नसे. त्यांना मी त्यांच्या गत आयुष्यातील आठवणी खोदून खोदून विचारायचो. माझ्याशी जितक्या मोकळेपणानं व आपुलकीनं ते सर्व स्वतःबद्दल सांगत तितक्या मोकळेपणानं ते दुसरीकडे कुठं सांगत असतील असं मला तरी वाटत नाही.

सरकारांचा आंतरजातीय विवाह . बायको ब्राह्मण. सरकार मराठा. तेव्हा पराकोटीचा विरोध असायचा याला. मुंबईत नोकरी. पगार जुजबी. आंतरजातीय विवाह म्हणून कुणी राहायला घर देत नसे तेव्हा. सरकार सपत्नीक. एका वाय्.एम्. सी. मध्ये (ख्रिश्चनांची असोशिएशन) राहिले होते. टांग्यातून त्या वेळचा मुंबईच्या रस्त्यावरून (६०/६५ वर्षांपूर्वी) एक चिमुकला संसार कसा इकडून तिकडं फिरत होता ते सांगतांना सरकार विचलित होत नसत.

सरकार बाबा सावरकरांच्या सहवासात बराच काळ राहिले. बाबांच्या काळ्या पाण्याच्या शिक्षेनंतर सरकार त्यांची सेवा करत. त्यांचे पाय चोळीत. बाबांना किती वेदना व्हायच्या हे सांगायचा प्रयत्न करीत. बाबांनी शिक्षा कशी भोगली याची सविस्तर वर्णन सरकार बराच वेळ सांगत राहात. मी देहभान विसरून ऐकत बसत असे. गावातील तीन चार तरुण पोरं साक्षीला असत. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या सहवासाबद्दल मी त्यांना खोदून खोदून विचारीत असे आणि दिलखुलासपणे सांगतही असत.

यादव सरकार जिथे नोकरीला होते तिथेच जवळच्या ऑफिसमध्ये दुर्गा भागवतही काम करत असत. चहाला दोघे एकाच कॅन्टीनमध्ये येत असत. दुर्गाबाई आणि यादवांनी समोरासमोर बसून अनेकदा चहा पिलाय असं ते सांगत. त्यांची त्या काळी काय बोलणी होत? दुर्गाबाई तेव्हापासून बोलायला थोड्या कडकच होत्या का? वगैरे अनेक

प्रश्न मी विचारायचो आणि सरकार हसायचे. सरकार फार कमी वेळा हसत. मी मुद्दाम मार्मिक विनोद करीत त्यांना हसवायचा प्रयत्नही करीत असे. माझ्या समाधानासाठी का होईना कदाचित् पण कधी कधी ते हसतही असत.

कृष्णाच्या यादव कुळाचा सर्व इतिहास सांगत सांगत यादव गंभीर होत आणि आमचा व त्या कुळाचा काहीतरी संबंध आहे असं म्हणून ते हसत.

जर्मनीच्या कुण्या एका तरुण आणि अत्यंत श्रीमंत मुलीनं एक नोबेल पारितोषिक प्राप्त कादंबरी वाचली व त्या कादंबरीतील वर्णनाप्रमाणे ती देश सोडून भारतात आली. त्या कादंबरीतील नायिकेवर ती इतकी फिदा झाली होती की आपणही तिच्यासारखं जीवन झोकून द्यायचं असं तिनं ठरवलं. ती पुण्यात आली आणि भारतातील मुलाशी लग्न करायचं ठरवून बसली. नेमकं यादव सरकारांच्या एका तरुण सुंदर आणि उत्साही मित्राला तिनं मागणी घातली. त्या मित्राला साधीच नोकरी होती. त्या दोघांनी एका खोलीत संसार सुरू केला. ती श्रीमंत जर्मन तरुणी त्या एका खोलीत स्वतःचा संसार कसा व्यवस्थितपणे करीत असे हे सांगतांना यादव सरकार गलबलून जायचे. पुढं त्या मित्राची नोकरी काही कारणांनी गेली. म्हणजे ती कंपनीच बंद पडली. कित्येक दिवस सरकार त्या दोघांना पैसे देत असत. पण बाळंतपण वगैरे कसं होणार? म्हणून शेवटी तिनं बाळंतपणाला जर्मनीला जायचं ठरवलं. सरकारनी तिकिटाची सोय केली आणि ती बाई जर्मनीला गेली. मध्ये एक वर्ष यादवांचा मित्र एकटाच राहिला. पुन्हा त्याला जुजबी नोकरी मिळाली. ही बाई परत येईल अशी आशा कुणालाच नव्हती. पण एक दिवस ही बाई स्वतःच्या मुलाला घेऊन हजर झाली आणि पुन्हा त्या दोघांचा संसार सरकारनी चार-वर्षे पाहिला. अचानक काहीतरी होऊन यादवांचा मित्र मरण पावला. ती बाई एकटीच पडली. तिनं पुन्हा जर्मनीला जाण्याखेरीज गत्यंतर नव्हतं. सरकार तिला पोहचवायला मुंबईपर्यंत गेले. आपलं पाच - सहा वर्षांचं भारतीय वंशाचं मूल घेऊन ती बाई शांतपणे जर्मनीला निघून गेली हे सांगताना यादवांचे डोळे अधिकच पाणिदार व्हायचे.

यादवांच्या आठवणी ऐकताना मी शांत व्हायचो तर कधी गलबलून जायचो. कधीकधी दुःखी व्हायचो. तर कधी आश्चर्यचकित व्हायचो. कधी चमकायचो तर कधी दचकून जायचो. कधी कधी सर्पदंश झाल्याप्रमाणं काळानिळा व्हायचो. कधी मी गडद व्हायचो तर कधी फिकट व्हायचो. यादव सरकारांच्या आठवणींना शब्दांचे कितीही लेप लावले तरीही त्याच्या खपल्याच पडणार हे मला माहीत आहे.

नदीनं समुद्राला मिळावं तसा मी सरकारांना मिळत होतो. सरकार माझ्यातलं

उसळतेपण आणि अस्थिरपण शांतपणे स्थिर करत होते. पाचशे रुपयांवर जगणारा एक फकीर लाखो रुपयांची उलाढाल करणाऱ्या एका डॉक्टरला श्रीमंत करून जात होता.

सरकार फक्त अशाच गोष्टी सांगत असं नाही. कधी कधी त्यांच्या आजोबांनी केलेल्या शिकारीचं वर्णन करत. ते ऐकून तर मी हादरून जात असे.

सरकारच्या आजोबांनी एकदा जंगलात एक रेडा बांधला होता.त्यावर एक गवताची तकलुपी छपरी तयार केली होती. जेवण खाण करून ते शिकारीसाठी मोक्याच्या ठिकाणी बंदूक भरून दबा धरून बसले होते. शिकार वाघाची करायची होती. त्या दृष्टीनं सर्व तयारी झाली होती. रेड्यापुढं गवताच्या पेंड्या टाकल्या होत्या. लख्ख चांदणं होतं. रेड्याच्या वासानं जनावर येणार याची त्यांना खात्री होती. बंदूक धरून एक झटक्यात जनावर उडवायचं असा निश्चय केलेला. आजोबांनी भली भली जनावरं उडवलेली होती. कितीतरी बक्षिसं मिळवलेली होती. राजदरबारात सन्मान झाले होते. सरकारांच्या आजोबांच्या शब्दात सांगायचं झालं तर,

''रात्री दहा अकराच्या सुमारास जनावर दबा धरत धरत पुढं आलं. दहा फूट लांब उभा आडवा वाघ तो. पण त्याहून रेडा कितीतरी मोठा. त्या वाघानं जे खोपीत उडी मारली ते पहिलं रेड्याचा गळा पकडला आणि एका झपाट्यात एवढा मोठा रेडा उलटा केला. रेडा चार पाय वर करून पडला आणि दुसऱ्या झटक्यात दावण तोडून जो रेडा सरपटत ओढून नेला म्हणता. माझ्या डोळ्याचं पारणं फिटलं. इतकी जनावरं बघितली पण एवढं उमदं जनावर मी पाहिलं नाही. बस्स. मी ठरवलं, मारायचं नाही हे जनावर आणि तसं सोडून दिलं. बघता बघता तो वाघ त्या सावजाला घेऊन दूर निघून गेला होता.''

सरकार म्हणाले, असे होते माझे आजोबा. ठरवलं असतं तर सहज मारलं असतं त्यांनी जनावर.

सकाळी उठून मी व सरकार गावातून फिरायला जायचो. घराघरातून मायलेकी बाहेर यायच्या.

''सरकार कुठं चाललायसा, फिरायला व्हय. दूध पाठवून द्यायचं काय?''

''नको नको. आहे दूध.''

ज्या घरातून बायकांना बाहेर यायला परवानगी नव्हती त्या घरातील बायका आणि सुना सरकारांशी दिलखुलास बोलतांना मी पाहायचो. प्रत्येक घरातून बापई माणसं सरकारांची चौकशी करायची.

''डॉक्टर आल्यात वाटतं, जेवण पाठवू काय रातच्याला!''

''नको, जेवण येणाराय.''

यादवांचा आणि माझा संबंध गावातल्या प्रत्येकाचा एक कुतूहलाचा आणि आदराचा विषय होता.

शेंबडी शेंबडी बारकी कितीतरी पोरं सरकार आलं, सरकार आलं म्हणत माझ्या व त्यांच्या पुढं मागं धावत असत. आमच्या समोर नाचत, बागडत असत. कधी कधी आमचा हात धरण्याचा प्रयत्न करत असत. रफू केलेल्या शर्टांचा यादव सरकार या सर्वांबरोबर फिरत असे. येणारे जाणारे सर्वजण थांबून लवून नमस्कार करीत असत. दोनचार कुत्रीही यादवांची पाठ सोडायला तयार नसत. ती अगदी शांतपणे आमच्या मागून येत असत. जणू काय वरातच. सरकारांची वरात. यादव सरकारांची वरात. प्राण्यांची, पक्ष्यांची, मुलांची, आयाबापयांची वरात. पैशाची नव्हे पण प्रेमाची वरात!!

सर्व काही पाहून माझे डोळे पाणावायचे. वाटायचं किती श्रीमंत आहे हा माणूस! खऱ्या सरकारांपेक्षा कितीतरी श्रीमंत! ना याला खायची चिंता ना प्यायची. ना राहायची चिंता. ना जगण्याची चिंता ना मरण्याची.

मी एकदा विचारलं,

''सरकार मरणाची भीती वाटते का हो?''

''मुळीच नाही.''

''तसं नव्हे. तुम्ही एकटे. सेवेला घरचं माणूस नाही. मृत्युशय्येवर असतांना त्रास होईल याची भीती नाही का वाटत?''

''डॉक्टर एक प्रश्न विचारू?''

''विचारा.''

''तुम्ही कधी एखादा पक्षी मृत्युशय्येवर खितपत पडलेला बघितला का? एखादी चिमणी कधी खूप आजारी आहे असं पाहिलंय का? ते जाऊ दे डॉक्टर, एखादी चिमणी आजारी पडून झाडावरून खाली पडून मेलेली तुम्ही पाहिलं आहे का?''

''खरं आहे सरकार, मी पक्षी आजारी पडलेला अथवा एखादा पक्षी नैसर्गिकपणे मरतांना नाही पाहिला.''

''एवढे पक्षी मरतात. एवढी जंगलातली जनावरं मरतात. त्यांची कोण करतं हो सेवा मृत्युशय्येवर, म्हणून मी काळजी करावी?''

त्या दिवशी मी परतताना मी सरकार नको नको म्हणताना त्यांना वाकून नमस्कार केला. त्यांना कुणी डोकं ठेवून नमस्कार केलेला आवडत नसे. तसं त्यांना करताना मी

कधी पाहिलंही नव्हतं.

यादव सराकारांकडं माझं येणं व माझ्याकडं त्यांचं येणं वाढत चाललं. मीही एक त्याच्या जीवनाचं अंग बनून गेलो. अडीअडचणीच्या वेळी हा डॉक्टर आपल्या उपयोगी पडल्याशिवाय राहणार नाही ही त्यांची धारणा होती.

मध्ये गावातली चार पोरं त्यांनी माझ्याकडं पाठवली. एक चिठ्ठी लिहिली. पोरांना कुठंतरी नोकरी लावायचा प्रयत्न करा म्हणून. मी लगेच अरविंद कॅटस्पिनचा पर्सनल ऑफिसरला फोन करून कळवलं. त्यांनी कामगार म्हणून चौघांपैकी दोघांना ठेवून घेतलं. सरकारांच्या बाळूला नोकरी मिळाली. सरकार अधिकच खूश झाले.

उन्हाळा वाढू लागला. पेरूची बाग वाळू लागली. पेरूला कीड लागू लागली. प्यायच्या पाण्याची टंचाई झाली तर पेरूला कुठलं पाणी? एक दिवस खिन्न मनानं सरकार आले. म्हणाले,

''पेरूची बाग काढतो डॉक्टर. पाण्याचे फार हाल होतात. कीड लागलीय पेरूला.''

''सरकार कशाला काढता एवढी मोठी झाडं. एखादी बोअरींग मारा. पाहिलीचं आटलं तरी दुसऱ्या बोअरींगला लागेल पाणी.''

''पैशाची सोय होणं अवघड आहे.''

''मी देतो पाचेक हजार. सवडीनं परत द्या. बाकीचे जमवा.''

सरकारनी कसेतरी पाच हजार जमवले. माझे पैसे घेतले व बोअर मारायला सुरुवात केली. १६० फूट खोल बोअर मारूनसुद्धा टिपूसभर पाणी आलं नाही. त्यांचे पैसे संपले. पुढं गेलात तर कदाचित पाणी लागेल असं पाणके म्हणाले. पण सरकारना या वयात जुगार खेळायचा नव्हता. ते माझ्याकडे आले.

''डॉक्टर पाणी लागलं नाही.''

या वयात नियतीनं सरकारना दुखवायला नको होतं, असं मला वाटलं. मीही खिन्न झालो. ज्या पेरूच्या बागेत मी वाड्यासारखा तासंतास पक्ष्यांचे आवाज ऐकत बसायचो. किडेलेले का होईना पण अनेक पेरू चिमण्या पोपट खायचे. गोरगरिबांच्या मुलांना चार दोन चांगले पेरू मिळायचे. हे का बघवू नये नियतीला? बघता बघता पेरूची बाग जमीनदोस्त झाली. जमीन नांगरली आणि तेथे सरकारनी चार दोन कलमी आंबे लावले. पेरूच्या बागेवरून नव्हता फिरला नांगर. नांगर फिरला होता तिथल्या वातावरणावरून. मला शांतता देणारा तिथला परिसर हळूहळू शुष्क बनत जाणार होता

याची मला चाहूल लागली. आणि मी खिन्न झालो. मी यादव सरकारांना नेहमी म्हणायचो,

''जाऊ दे बाग. तुम्ही तुमची तब्येत जपा.

या वयात पडलं तर फ्रॅक्चर होतं, हाडं ठिसूळ झालेली असतात.''

कुणासाठी तब्येत जपायची यादवांनी? त्यांच्यासाठी की माझ्यासाठी? मीच मला प्रतिप्रश्न करायचो. मनातल्या मनात ओरडून सांगायचो , ''हो माझ्यासाठी, गावातल्या त्यांच्या संबंधांसाठी, गोरगरिबांच्या मुलांना पुरणपोळ्या मिळण्यासाठी. यादवांनी तब्येत दुसऱ्याला देण्यासाठी जपावी. नाहीतरी त्यांचं आयुष्य सारं दुसऱ्याला देण्यात गेलंय. आतातरी त्यांनी तब्येत स्वतःसाठी का जपावी?''

२९ व ३० डिसेंबर १९९७ ला मी दोन दिवस सरकारांकडे राहिलो. त्यांची तब्येत बरी होती. त्यांनी कुणाकडूनही काही मागवलं नाही. आलेलं घेतलं नाही. आम्ही दोघंही स्वयंपाक करून जेवलो. मी भाजी केली. चपात्याही केल्या. सरकारना फारसं काही करता येत नव्हतं. दोघं फारसं बोललो नाही. गेल्या अनेक वर्षात अनेक गोष्टी बोललो होतो. बोलून काही विषय संपणार नव्हते. प्रश्न संपणार नव्हते. तरीही मी विचारलं,

''सरकार, व्यवसायातील स्पर्धा वाढतेय. थोडं वाईट वळण घेतेय, सरळ मार्गानं जाणारे संपतील की काय असं वाटतंय. इतर स्पर्धक जी हत्यारं जवळ बाळगतात ती बाळगावी लागणार की काय असं वाटतंय. ती मीही बाळगावी काय?''

''डॉक्टर, तुम्हीही ती बाळगा. पण त्या हत्यारांचा उपयोग तुमच्या कल्याणासाठी नव्हे तर लोकांच्या कल्याणासाठी करा. त्यातून तुम्हाला दोन्हीही मिळेल. स्पर्धेतही टिकाल व नावलौकिकही मिळेल.''

मी काय समजायचं ते समजलो. त्यानंतर बरोबर दोन महिन्यांनी सरकारांचा धाकटा भाऊ माझ्याकडे आला. सरकार त्याच्या घरी आले होते व त्यांना अस्वस्थ वाटत होतं. मी तातडीनं घरी गेलो. चार दोन फिजीशियनना फोन केले. सरकारना हार्टचा प्रॉब्लेम होता. शेवटी एका हृदयरोगतज्ज्ञाकडे दाखल केलं आणि मी माझ्या कामाला लागलो. दुसरे दिवशी सकाळपासून मीही कामात व्यस्त होतो. दोनच दिवसात मुलीची दहावीची परीक्षा सुरू होणार होती. त्याचं थोडं दडपण होतं. चोवीस तास कसे गेले कळलंच नाही. म्हणजे एक दिवसानंतर दुसरे दिवशी मी सरकारना भेटायला दुपारी दीडच्या सुमारास गेलो.

अतिदक्षता विभागात गेल्यावर मी सरकारांची चौकशी केली. नर्सनं दार बंद करून घेतलं व मला सांगितलं, ''सरकार गेले.'' काल रात्रीपर्यंत बरे होते. पहाटे चारला

इतका मोठा ॲटॅक आला की वाचवणं शक्य नव्हतं. मी डाक्टरांना भेटलो. त्यांनीही हेच सांगितलं.

माझ्या पायाखालची जमीन हलली. माझ्या मनात विचारांनी थैमान घातलं. मला भिंतीचा आधार घ्यावा लागला.

''चिमणी कधी आजारी असताना बघितली आहे का डॉक्टर?''

हे सरकारांचं वाक्य मनात पिंगा घालू लागलं. मी चुकलो, मी काल का नाही आलो असं मला बिल्कूल वाटलं नाही. कारण खरोखरच मी अडचणीत होतो. कामात होतो आणि सरकारांचे भाऊ तसं काही असेल तर मला नक्की बोलवतील ही धारणा होती.

यादव सरकारांसकट कोणालाही ते इतक्या तडकाफडकी संपतील असं वाटलं नव्हतं.

दुसरे दिवशी मुलीची बोर्डाची परीक्षा. यामुळं घरी ही बातमी सांगणं योग्य नव्हतं. माझ्या मनावर झालेला परिणाम मुलीला थोडासुद्धा दिसून उपयोगी नव्हता. आयुष्यात पहिलंच एवढं मोठं नाटक करावं लागणार होतं. आतून पूर्ण ढासळलेला मनाचा मनोरा बाहेरून मात्र दिसून उपयोगी नव्हता. मी एकटाच खोलीत बसून राहीलो होतो. यादव सरकार व्यक्तिशः जाण्याचं एवढं मोठं दुःख होतं का माझा आधार तुटल्याचं या द्वंद्वात मला पडायचं नव्हतं त्यावेळी.

यादवांच्या मातीला तिसऱ्या दिवशी सकाळी ९ पासूनच मी हजर होतो. मी आणि माझा थोरला चुलत भाऊ सुधीर. आठ-नऊ वर्षांचा कालखंड ज्या भावानं मला यादव सरकारांच्या सहवासात घालवायची संधी दिली तो. सरकारांकडून मी किती वर्षांच्या अपेक्षा करायच्या? चांगले ८२ वर्षे जगले. साऱ्यांना आयुष्य आणि पैसा वाटत हा मनुष्य इतका जगला.

बाळू पळतच माझ्याकडे आला. माझा हात हातात घेतला आणि घडाघडा बोलू लागला.

''डॉक्टर दवाखान्यात पंधरावीस गावातली माणसं घेऊन गेलो. धाकट्या सरकारना सांगितलं की थोरल्याचं दहन इथं पेरूच्या बागेत करायचं. तशी सरकारांची इच्छा होती. त्यांनी बोलून दाखवली होती मला. सारा गाव जमा झाला होता वेशीत. कुणी कामावर गेलं नाही. सकाळी अकराला गाडी वेशीत अडवली. पालखी सजवलेली पालखी उचलून गावानं पांडुरंगाच्या गजरात सरकारांना उचललं. जणू पुष्पक विमानच.

अभंग म्हणत ज्ञानबा तुकोबाच्या गजरात गावातल्या वारकऱ्यांनी इथं आणलं. वारकऱ्यांच्या पद्धतीनं सगळं केलं.''

एवढं बोलून बाळू माझ्या कुशीत आला. बाळूचा मीच यादव सरकार झालो होतो का काय कुणास ठाऊक? पण त्या बिचाऱ्याला काय माहीत कुठं यादव सरकार आणि कुठं मी. कुठं इंद्राचा ऐरावत आणि कुठं शामभटाची तट्टाणी. फक्त त्याला वाईट वाटू नये म्हणून सरकार फिरवितात तसा हात फिरवला त्याच्या पाठीवरून आणि ते पोरगं काम करायला माझ्यापासून दूर निघून गेलं.

यादव सरकारांच्या अस्थिभोवती शे दीडशे माणसं फेर धरून उभी होती. सारा गाव अंगणात गर्दी करत होता. मठी सुन्न होऊन सारं पाहात होती. यादव सरकारांच्या भावानं माझा हात धरला आणि म्हणाले,

''डॉक्टर, पहिल्या अस्थी तुम्ही उचलायच्या.''

साऱ्या गावकऱ्यांनी होकारार्थी माना डोलावल्या. मी काय केलं होतं यादवसरकारांसाठी म्हणून मी हे काम प्रथम करावं? सरकार जातानांही तो मान देऊन गेले.

धाकट्या सरकारना सद्‌गदित होऊन मी म्हणालो,

''आता तुम्ही आमचे सरकार. या इथं एक कट्टा बांधा. इथं पुन्हा पेरूची बाग लावा. बोअरिंग चांगली तीनशे फूट काढा. पाणी लागलंच पाहिजे. नियती काय एवढी क्रूर नाही. इथं बाग फुलू दे. पोरं पेरू खाऊ देत. पक्षी येऊ देत. या उजाड माळावर पुन्हा एकदा जीवन फुलू दे. तीच यादव सरकारांना श्रद्धांजली.''

●●●

शेंगा

सरता पावसाळा. एखादी सर येऊन जायची. आकाश कधीकधी ढगांनी गच्च भरायचं. काळवंडायचं. मग कंटाळा यायचा. त्या दिवशी मी माझी गाडी काढली आणि मठाचा रस्ता धरला. मठावर वातावरण छान असतं. महाराजांबरोबर थोड्या गप्पा, दर्शन, मठावरचा घट्ट दुधाचा चहा आणि फेरफटका. बघता बघता हाय वे सोडून मठाच्या रस्त्याला लागलो. एकटाच. एकटं फिरणं मला आवडतं. आपण स्वतःशी बोलतो.

मठावर आलो. आकाशातील ढग कमी होऊन ऊन पडलेलं. पाच साडेपाचचा सुमार असेल. महाराजांची खोली उघडीच होती. दर्शन घेतलं आणि भिंतीला टेकून बसलो.

''टेकून काय बसलाय, असे पुढे या.'' महाराजांनी अस्सल मराठीतून खड्या आवाजात सुनावलं. नव्वदीला आलेले महाराज अजून सहसा टेकत नसत.

''झगडण्याचा कंटाळा आलाय महाराज.'' हे असलं काहीतरी रडवं बोलणं काढल्याशिवाय यांच्याकडं आल्यासारखं वाटायचंच नाही. सगळी आबादी आबाद

असेल तर कशाला येतोय इकडं मठाकडं. कुठंतरी काहीतरी घोळ झाला असेल अथवा केला असेल, एकदोन अंदाज दणकून चुकले असतील, बायकोनं तापवलं असेल की मन शांत करायला मठावर यायचं ही सवयच लागलेली. आणि इथं आल्यावर. ''हल्ली मनच लागत नाही कशात,'' किंवा ''सगळं सोडून द्यावं असं वाटतंय,'' असलं काहीतरी रडगाणं महाराजांपुढं लावायचं ही माझी एकट्याची नाही साऱ्यांचीच तऱ्हा.

''झगडण्याचा कंटाळा आलाय ना, मग या मठात कायमचे राहायला,'' असं महाराजांनी म्हटलं की आमची पाचावर धारण बसायची.

एक मध्यमवयीन बाई आपल्या वाऱ्यासारख्या पोराला घेऊन आली होती. ते फुलपाखरांसारखं इकडून तिकडं पळत होतं. बाई म्हणाली,

''महाराज जरा याला शांत करा, बघा कसं आहे ते.''

महाराज जोरात हसले आणि त्या बाईच्याच डोक्यावर त्यांनी हात ठेवला व म्हणाले,

''पहिलेंदा तुम्ही शांत व्हा. मग ते शांत होईल. दाखवता का इथं दहा मिनीटं शांत बसून एकही विचार न आणता? तुम्हाला जमणार नाही मग त्यानं का शांत बसावं? अहो तो अस्थिरच आहे चंचलच आहे आणि तसाच असणार, बाहेरून त्यात बदल करता येत नाही आणि करूही नये.''...

''उठा उठा शहाणे आहात फार.'' म्हणत महाराज शेजारची काठी घेऊन उठले. मी त्यांच्याजवळ गेलो. त्यांनी डावा हात माझ्या खांद्यावर टाकला. आधारासाठी. – माझ्या का त्यांच्या आधारासाठी हे कोडं मला कधी उलगडलंच नाही. महाराजांचं लक्ष कापऱ्यात बसलेल्या सत्तर वर्षांच्या वृद्धेकडं गेलं,

''ही मुलगी कोण?'' त्या वृद्धेकडं बोट दाखवून त्यांनी विचारलं. मी म्हणालो ही मुलगी म्हणजे त्या मुलाची आजी.

''कुणाची गं तू?'' महाराजांनी या वृद्धेला विचारलं.

''मी तांब्यांची लेक.'' तिनं कुठला तरी शंभर वर्षांमागचा इतिहास सांगितला. पण तिला महाराजांनी मुलगी म्हटल्याचा आनंद इतका होता की तिच्या चेहऱ्यावरच्या सुरकुत्या काही काळ तरी लुप्त झाल्या. महाराजांच्या आणि तिच्या वयातलं अंतर पाहता महाराजांनी तिला 'मुली' म्हणणं मलाही फारसं वावगं वाटलं नाही. यासाठी मला वृद्ध माणसं फार आवडतात. तीनतीन पिढ्या त्यांनी पाहिलेल्या असतात. त्यांनी स्वातंत्र्यापूर्वीचा आणि स्वातंत्र्यानंतरचा देश पाहिलेला असतो. त्यांनी देशाची वाट

लावायला चाललेली माणसं जन्मतांना व मरतांनाही पाहिलेली असतात. महाराज मला त्यासाठीही आवडतात. ‘‘मी गांधींच्या सभेला गेलो तेव्हा काय झालं, मी सुभाष बाबूंना कसा भेटलो आणि रमणाश्रमात मी जेव्हा गेलो तेव्हा प्रत्यक्ष रमणमहर्षींनी मला जेवायला कसं वाढलं.’’ याची वर्णन महाराज सांगू लागले की मी देहभान हरपायचो. व्यवहार आणि अध्यात्म हातात हात घालून फिरायचे मठात. मोठी गंमत वाटायची.

मी आणि महाराज चालू लागलो की, महाराज उजव्या हातातील काठी सतत वर उचलून मठावरील नवीन डेव्हलपमेंटस् दाखवायचे. हा त्यांचा आवडता छंद.

‘‘हे बघा इथं नवीन बोर मारली.’’ माझ्याकडं पाहात वळून, ‘‘किती इंच पाणी लागलं असेल?’’

‘‘असेल दोन तीन इंच’’ मी.

‘‘तसं नाही नक्की सांगा’’

‘‘तीन इंच’’

‘‘इथं पाणीच लागलं नाही. तीनशे फूट खाली गेलो.’’ असं म्हणत महाराज सात मजली हसायचे. खरतर एवढं खोदून पाणी लागलं नाही म्हणजे खजील व्हायची गोष्ट. पण महाराजांचं संयुगच वेगळं होतं. त्यातही विनोद करून हसून रिकामे.

‘‘ते तिकडं टेकडी दिसते काय? तिथं तीन बोर मारल्या. एकाला दीड तर दुसरीला एक इंच पाणी लागलं. सोळा बोर मारल्या फक्त तीन बोरला पाणी लागलं.’’

‘‘महाराज पाणी कुणी दाखवलं?’’

‘‘मी दाखवलं. पण तिथं लागलं नाही. मग तो पाण्हारी आणला, जाधव का कोण ते तुम्हाला माहीत आहे काय?’’

‘‘हो पण महाराज तुम्ही दाखवलं आणि तिथं पाणी लागलं नाही म्हणजे आश्चर्य आहे.’’ मी आदरानं पण थोडा विनोदी स्वर ओढला.

‘‘मी तसला जादू करणारा सिद्धी प्राप्त झालेला महाराज नाही. मी फक्त तुमच्या मनात जादू करतो आणि तुम्ही पुन्हा माझ्याकडं येता. तुम्हाला माझ्याकडंच का यावं वाटतं हो?’’

‘‘खरं सांगू महाराज, आज शहरात कुणाला वेळच नाही एकमेकाची रडगाणी ऐकून घ्यायला. एखाद्याला सांगायला गेलं की उलट तोच काहीतरी सांगायला लागतो की भीक नको पण..... अशी अवस्था होते. तुम्ही स्वतःचं एक दुःख न सांगता आमचं

ऐकता म्हणून आम्ही तुमच्याकडं येतो.’’

‘‘ इथं दोडका लावला थोडा. ’’

‘‘दोडके यायला लागलेत की हो.’’

‘‘तीन तीन फूट लांब दोडके असतात, हे बघा इथं फुलबाग केलीय थोडी, पूजेला फूलं लागतात. ’’

मी आणि महाराज हळूहळू पुढं जात होतो.

गार वारं येत होतं. महाराजांचा हात माझ्या खांद्यावर तसाच होता. मधूनच माझ्या खांद्यावर कधी थाप पडायची तर कधी गुद्दा. कधी सर्व सोडून हातावर टाळी. मला कधी प्रश्न विचारतील सांगता यायचं नाही. म्हणून मी सतर्क राहायचो.

‘‘महाराज, आपण एखादं सुंदर नैसर्गिक दृश्य पाहतो आणि देहभान विसरतो, ती अवस्था आणि तुम्ही आणता ती आध्यात्मिक मुक्तावस्था यात काय फरक आहे?’’

‘‘डॉक्टर, तुम्ही आणता ती अवस्था क्षणभंगुर असते. पण विदेहीपणे मुक्ती ही तहहयात असते; ती समोर नारळाची बाग बघितली का? दोनशे नारळ आहेत. एकदा या डबा घेऊन जेवायला.’’

महाराज विषय बदलतील.

‘‘म्हणजे नारळ लागायला अजून किती वर्षे?’’

मी व्यवहारी प्रश्न विचारला.

‘‘ते तुम्हाला काय करायचंय? तुम्ही या डबा खायला. त्यासाठी नारळ असावे लागतात काय?’’

‘‘हा कवठी चाफा दिसतोय.’’ चाफ्याला फुलं लागलेली. सुवास दरवळलेला.

‘‘होय. वास छान आहे ना? ए पांड्या चढ वर. डॉक्टरांना फुलं दे थोडी.’’

पांड्या खारीसारखा सरकन वर चढला. ओंजळभर फुलं काढली. मला दिली. मी वास घेतला. डोकं शांत झालं. माझा झगडा थोडा कमी झाला.

एक टेकडी उतरत आम्ही खाली गेलो. दाहाबारा खोल्या. व्हरांड्यात शेंग्याच्या वेलीचे मोठाले ढीग पडलेले. ‘‘शेंगा चांगल्या दिसतात.’’ मी एक शेंग उचलली.

‘‘घ्या डॉक्टर, चांगल्या ओंजळभर घ्या की’’ म्हणत महाराज बसले. मूठभर शेंगा मला दिल्या. त्यांची मूठ म्हणजे माझी ओंजळ! ‘‘अरे शिरपा, डॉक्टरांना जरा शेंगा दे

बघू.''

आम्ही पुढं पुढं जात राहिलो. एक मिसुरडं फुटलेला पोरगा झाड लावायला खड्डा खणत होता.

''कुठल्या गावचा रे तू?'' महाराज.

''वाडीचा.''

''कधीपासून खड्डा खणतोस?''

''सकाळपासून.''

''तुला काय अक्कल बिक्कल आहे का रे'' असं म्हणत महाराजांनी काठीचा एक फटका त्याच्या पाठीत मारला. ते पोरगं हेलपडलं आणि सावरत पुढं आलं. त्यानं महाराजांच्या पायावर डोकं ठेवलं. दर्शन घेतलं.

''जरा घट्ट हाय महाराज''

''थांब तुझं लग्नच करत नाही, भडव्या एक खड्डा खणायला एक दिवस. तुझं लग्न कसं करायचं रे मग. लग्न केल्यावर किती खड्डे खणावे लागतात ते तू ह्या डॉक्टरला विचार.'' आणि महाराज माझ्याकडं पाहात हसत पुढं चालू लागायचे. पोरानं खड्ड्याला जोर लावलेला असायचा. जणू काही खड्डा नाही खणला तर लग्नच नाही होणार!

''महाराज, यांची लग्न तुम्ही लावून देता?''

''मग कोण लावून देणार? दिवसाला एक खड्डा खणता येणार नाही तर कोण पोरगी देणार याला?''

महाराजांचं गणित सरळ होतं. आम्ही आयुष्यभर उगाचच बीजगणित आणि भूमिती सोडवत बसलो असं मला वाटलं.

समोर काही माणसं गप्पा मारीत बसली होती. ''ए उठा, तिथं काय बसलाय, लाजा वाटत नाहीत काय तुम्हाला! ए रामा, आज जेवायला देऊ नको यांना.''

समोरची माणसं पटाटा उठली आणि त्यांनी महाराजांचं दर्शन घेतलं. जरा हळू पण प्रत्येकाला काठीचा मार खावा लागला.

''जरा पाण्याला बसलो महाराज.''

''पाणी मागनं, आधी काम पूर्ण करा, नाहीतर जेवण नाही.''

''महाराज ही माणसं कुठली?'' मी न राहावून विचारलं.

''शेजारच्या गावाहून येतात सेवेला. आठवड्यातून एक दिवस इथलं काम करतात. अशी निरनिराळी माणसं इथं रोज कामाला असतात.''

''म्हणजे तुम्ही यांना पैसे नाही देत कामाचे, बिन पैशाची काम करतात ही इथे?'' मी हादरलोच.

''पैसे! कसले पैसे? आणि कुणाकडं आहेत यांना द्यायला पैसे? आता तुम्ही इथं शांत व्हायला येता, शांत होऊन जाता. तुम्ही काय पैसे देता मला?''

''पण महाराज बिचारी एवढी राबतात आणि तुम्ही त्यांना बोलता, मारता. गंमतच वाटली मला.''

''अहो डॉक्टर, ही मुद्दाम माझा मार खायला समोर येतात. मी मारलं की खूष असतात. महाराजांनी प्रसाद दिला म्हणतात.''

''तुमची दुनिया वेगळी आहे महाराज,'' मी.

''दुनिया एकच, पण तुमच्याकडं स्वार्थाचं राज्य चालतं आणि इथं त्यागाचं, चला पुढं, तुमच्या डोक्यात नाही शिरायचं. पेशंटला हात लावायला पन्नास रुपये घेणार तुम्ही, तुम्हाला काय हे कळायचं?''

जुनी शाळा पाडायचं काम चाललं होतं. दहा-पाच लोक भिंतीवर चढून भिंत उतरवीत होते. महाराज नको-नको म्हणताना भिंतीवर चढले. आणि त्यांनी भिंतीवरच्या माणसांना खडसावलं.

''काय चिंचुके खेळता काय रे, दोन दिवस झाले तरी भिंत उतरवत नाही. उद्यापासून आपापली भाकरी बांधून जेवायला यायचं. मठावरचं जेवण देणार नाही. काय अन्न खाताय का काय रे, हाणा घण.''

असं महाराज जोरात म्हणाले आणि काठीचा तडाखा घण घेतलेल्या माणसाला दिला. त्या सरशी तो अंगात आल्यासारखा भिंतीवर प्रहार करायला लागला. आम्ही तिथं होतो तेवढ्यात राहिलेली भिंत जमीनदोस्त झाली.

माणसांनी पटापट महाराजांचं दर्शन घेतलं.

''जावा रे चहा तयार आहे मठावर, पिऊन मग पुढच्या कामाला लागा.'' मोठ्या प्रेमानं महाराजांनी सांगितलं.

''महाराज, एक शंका विचारू?'' मी.

''विचारा.''

‘‘तुम्ही मला का नाही मारत-प्रसादासाठी?’

‘‘तुम्ही कामच कुठं करता तुम्हाला मारायला? तुम्ही जेव्हा कामाला इकडे याल तेव्हा मारणार, पण प्रश्न चांगला विचारलात तुम्ही डॉक्टर,’’ असं म्हणत महाराजांची काठी आमच्या पाठीवर स्वार झाली.

‘‘चला चहाला, इथला चहा आवडतो ना तुम्हाला!’’ महाराज.

‘‘हो इथला चहा नुसत्या दुधाचा असतो,’’ मी.

‘‘आणि तुमच्याकडचा नुसता पाण्याचा असतो, हो ना?’’

‘‘महाराज, तुम्ही आता भिंतीवर चढणं, लांब लांब फिरायला जाणं बंद केलं पाहिजे. तुमची तब्येत.....’’

‘‘काय होईल, मरण येईल. येऊ दे की. डॉक्टर मरणाला काय भ्यायचं. आता अठ्ठ्याऐंशी झाली, अजून किती जगायचं. मठ काय तुम्हा सर्वांचाच आहे. पुढं चालवालच की तुम्ही.’’

‘‘महाराज मी विसरून गेलो बघा सर्व अर्धा तास, आता कसं हलकं वाटायला लागलंय.’’

‘‘ठीक आहे. चहा घ्या.’’

चहा पिऊन मी निघालो तर पुन्हा महाराज मला पोहोचवायला येऊ लागले. मी नको नको म्हणत होतो. मला म्हणाले;

‘‘तुम्ही एवढे फिरलात माझ्याबरोबर आता तुम्हाला दारापर्यंत सोडायला मी येतो, त्यात काय एवढं?’’

मीच जरा जडावल्यासारखा झालो.

आम्ही दोघं चालत फाटकापर्यंत आलो.

पावसाळ्याचा दिवस. मुलांना व हिला ओल्या शेंगा भाजून खायला फार आवडत. महाराज मघाशी शेंगा देतो म्हणाले होते. अजून कुणीच शेंगा आणून दिल्या नव्हत्या. शेंगांचा विचार माझ्या डोक्यातून जाता जाईना. पण मी महाराजांना कसं विचारणार? त्यांना काही वाटणार नाही पण मलाच विचारायची लाज वाटत होती. थोडा वेळ काढल्यासरखं करून मी दर्शन घेऊन निघालो. महाराज तिथंच उभे होते.

आता शेंगांचा नाद पूर्णपणे सोडून मी पुढील बाजूनं गाडीकडं आलो. पुढचं दार उघडून आत बसलो. पावसाचे थोडे थोडे शितोंडे उडत होते म्हणून मी काच वर केली. आणि गाडी स्टार्ट करणार इतक्यात कुणीतरी काचेवर टाक् टाक् केलं. मी काच खाली

केली.

‘‘साहेब किल्ली द्या शेंगा ठेवायच्यात’’

‘‘मग दे ना पुढं’’

‘‘नाही डिकीत ठेवायच्यात.’’

मी दार उघडून बाहेर आलो. जवळजवळ अर्धं ठिकं शेंगा त्या गृहस्थानं आणल्या होत्या. डिकी मी उघडून दिली. त्यानं शेंगा आत टाकल्या. मी डिकी लावून गाडीत बसलो आणि गाडी सुरू करून वळवली. एवढ्यात माझं लक्ष फाटकाकडं गेलं. भर पावसात महाराज हात हलवत उभे होते. मीही गाडीतून हात बाहेर काढून निरोप घेतला.

गाडीतून परत येताना. महाराजांचं एक वाक्य मात्र माझ्या मना घुमत होतं.....

‘‘तुमच्याकडं स्वार्थाचं राज्य चालतं तर इथं त्यागाचं.’’

●●●

माहेर

वैतागून कामाचं ठिकाण सोडणं आणि वाट फुटेल तिकडं धावत सुटणं माझ्या दृष्टीनं नवं नव्हतं. करत असलेल्या कामाचा अधून – मधून कंटाळा येणं हे फारसं गैर आहे असं नव्हे. साचलेपण मनाला उद्‌विग्न करतं. रविवारीही काही वेळाकाही व्याप अंगावर येऊन पडतो एकाकीपणा, मिळतच नाही. एकटेपणानं काही विचार करणं ही बाबच दुरापास्त.

पुन्हा एकदा वेंगरूळला दोन दिवस जायचं असा मी निश्चय केला. आप्पांना फोन केला. आप्पा नुकतेच दूरच्या प्रवासाहून कोल्हापूरला आलेले. मकर संक्रांतीचा दिवस. सणादिवशी त्यांना कसा त्रास द्यायचा असा विचार मनात आला. पण आमचे संबंध ह्या पलीकडचे आहेत. असं मी तरी निदान मानतो. कोल्हापुरातून आप्पांना घेऊन त्यांच्या गावी वेंगरूळला यायचं ठरवलं.

सकाळी हॉस्पिटलमध्ये जाऊन एक दोन ड्रेसिंग केली. राऊंड घेतला व आप्पांच्याबरोबर वेंगरूळला यायला निघालो. वेंगरूळ गावात शिरता शिरता मला रस्ते आणि झाडं परिचयाची वाटू लागली. पक्षांचे आवाज काही काही

सांगू लागले. झाडांची सळसळ, पानांची पडझड माझ्याशी हसू, बोलू लागली. तांदळाच्या भाकरी भाताचं गरगरीत जेवण केलं व मी झोपलो. दोनेक तास झोपून आप्पा आणि मी त्यांनी बांधलेल्या शेगावकर महाराजांच्या मंदीराजवळील त्यांच्या मळ्यात आलो. इथं मागं एकदा मी असाच राहिलो होतो. पाठीमागची काजूची झाडं माझ्या ओळखीची झाली होती.

काजूच्या बनात एक सतरंजी टाकली व झाडाच्या बुंध्याला टेकून मी व आप्पा बसलो. बोअरिंगमधल्या पाण्याची धार वर्णन करता येणार नाही असला आवाज काढत हाती. आप्पा अधूनमधून उठून खराट्यानं झाडून वाळलेली पानं एकत्र लावत होते. शेतावर कामाला आलेली माणसं यथेच्छ पाणी पिऊन ढेकर देत पुढं जात होती. एक वेगळाच वास जमिनीतून आणि वातावरणातून येत होता. संध्याकाळ आणि रात्र यांच्यामधला काळ होता तो. पक्षी बहुधा आपल्या पिल्लांशी बोलत असावेत. एवढ्यात झाडावर सरसर आवाज झाला. एक खार झाडावरून सरकत दुसऱ्या झाडावर गेली आणि तिथून तिसऱ्या झाडावरून मंदिराच्या पत्र्यावर अदृश्य झाली.

''आप्पा खारी बऱ्याच दिसतात.''

''काय विचारू नका. नको एवढ्या खारी आहेत. सगळं वरच्यावर खाऊन टाकतात. पेरू पिकला ह्यांचाच. आता हे काजूचं फळ बघता बघता हाणतात. सात नारळ लावले होते समोर आता वीस फूट उंच झाले असते, अहो कोंभच उडवतात हो. ''

आप्पांच्या सांगण्यात राग दिसत नव्हता. गालाच्या खळीतून हसत आप्पा कौतुकानं सांगत होते. सरसरणाऱ्या खारीकडं पळणाऱ्या नातीकडं बघावं तसं बघत होते.

''आप्पा औषधं वगैरे टाकून काही उपयोग होत नाही ?''

''काय वाटेल ते औषध लावा ह्या खातातच कोंभ. सिमेंटचे कठडे बांधले झाडाभोवती तरी जरा कोंभ वर आला तरी उडवलाच ह्यांनी कोंभ.''

''मग अवघड आहे की हो आप्पा!''

''काय करायचं ? ह्यांच्यातून जे राहील ते खायचं.''

''पण आप्पा तुमच्या वाटणीला खारीचा तर वाटा येतो का हो ?''

आप्पांनी पुन्हा खराटा घेतला व झाडायला सुरुवात केली.

''आप्पा इकडं या, या वाळवीला काय करता ?''

''टाकतो पन्नास टक्के बी. एस. सी. पावडर''

‘‘आंब्याच्या मोहोराला काय करता?’’

‘‘करतो फवारणी, आता मिळतात ना काही औषधं, पण धुकं पडलं की काही चालत नाही. बघता बघता मोहोर गळून जातो.’’

हे सारं निसर्गचक्र पाहायला मिळतं इथं. मुंग्या रांग लावून काही काही आणून ठेवताना दिसतात. चिमण्या कावळे वरच्यावर फळं उडवतात. खारी यथेच्छ ताव मारतात. वाळवी तर आपल्या बापाचं लाकूड असल्यासारखं झाडाचा बुंधाच कच्चा खाते. जनावरं पाला खातात. राहातं काय झाडात? पण माणसं ह्या साऱ्यामधून राहतं तेवढं राखून खातात. फार मोठी तक्रार नसते त्यांची ह्या साऱ्या पशुपक्ष्यांबद्दल. पक्षी आले नाहीत तरी कुठं करमतं त्यांना. गोफणीनं दगड भिरकावणाऱ्या शेतकऱ्याला आठ दहा दिवस चिमणीच दिसली नाही तर तो सुद्धा कावरा बावरा होईल. फारसं निसर्गचक्र नाही कळलं तरीही त्याचा स्वीकार करताना दिसतात ही माणसं.

मध्ये एक माझा मित्र भेटला. वाळवीतज्ज्ञ असं मानतात त्याला. तो म्हणाला,

‘‘जमीन ही वाळवीच्या मालकीची प्रथमच असते. नंतर आपल्या मालकीची. तुझ्या पूर्वीही ही वाळवी होतीच. तिचीच ही जमीन. तू नंतर मालक झालास.’’

‘‘अरे पण ही विध्वंस करते झाडांचा.’’

‘‘जिवंत झाडांचा नाही करत फारशी, जून झालेल्या किंवा मेलेल्या झाडांचा करते, टाकाऊ लाकडांचा करते. वाळवी नसती तर या शेकडो वर्षात जगात माणसांपेक्षा लाकडं जास्त दिसली असती.’’

हा वाळवी तज्ज्ञ माणसांच्यापेक्षा वाळवीच्याच बाजूनं जास्त बोलतोय हे समजल्यावर मी विषय बदलला होता.

थोडा थोडा अंधार पडायला लागला होता. ख्वाडारऽऽ ख्वाडार, क्वाटरऽऽ क्वाटर असे चित्रविचित्र आवाज पक्षी काढायला लागले. घुक घुक, घुक घुक घुबडं ओरडायला लागली. क्वा-कि ऽऽ क्वां-किं, वॉक, वॉक वॉक असा एक पक्षी इंग्रजीतून बोलायला लागला. क्रीऽऽक, क्रिऽऽक असा आणि किती नवनवीन आवाज सांगू? ते लिहिताच येत नाही. निसर्गातलं बरंच काही नाही शब्दानं सांगता येत. निसर्गाचं अंतरंग समजून घ्यायला स्वतःचं अंतरंग उघडून ठेवावं लागतं. शब्द किती कमी पडतात जाणीवांच्या मानानं. जाणीवासुद्धा कमी पडतात अनुभूतींच्या मानानं. झाडाखालून उठायची वेळ झाली हे जाणवू लागलं. अंधार हळू हळू गडद होऊ लागला. पायाला मुंग्या आल्या . मी झटापटा पाय झाडला. आप्पांना हुडकायला गेलो.

एखादं ढोर रानात चुकल्यासारखा उसात सार सार आवाज झाला. मोटारीचा पाण्याच्या नळाचा आवाजही बंद झाला. पक्ष्यांचा आवाज विरत गेला. विजेच्या दिव्यांची वलयं धीटपणा देऊ लागली. बारीक बारीक कीटक दिव्याभोवती फेरू धरून नाचू लागले. सारा निसर्ग काळाभोर पडू लागला. रातकिड्यांनी नीरव शांततेत सूर धरला. एक दोन चांदण्या लुकलुकू लागल्या.

आप्पांचा ठिपका लांबून येताना दिसला. मी पण हळू हळू पुढं गेलो. मुंग्या आलेल्या पायाला काय काय होतं. पण मला काही जाणवत नव्हतं, मुंग्या हळूहळू कमी होत गेल्या.

समोर अंधारात ओढ्यातले गोटे पायाला लागायला लागले.

‘‘आप्पा, आप्पा, या ओढ्याला पाणी कधी असतं.’’

‘‘कुठलं पाणी, दहा दहा फुटावर एकेक मोटार आहे, उचलतात पाणी. ओढा रिकामाच.’’

‘‘आप्पा, मळ्यात डांबरी रस्ता झाला की हो?’’

आप्पांनी मंदिराच्या पुढच्या बाजूस रस्तेवाल्याला मस्का लावून सारं अंगण डांबराचं करून घेतलं होतं. स्वच्छ दिसत होतं. पण पूर्वी इथं थोडी थोडी हिरवळ उगवायची.

‘‘आप्पा पण पहिलं काय वाईट होतं?’’

‘‘चिखल व्हायचा ना उत्सवात’’

मधला काही झाडं आप्पांनी शिताफीनं उडवली होती.

‘‘आप्पा झाडं का हो उडवली?’’

‘‘लोकांना बसायला जागाच पुरेना’’

आप्पांनी मोठं वाजवी उत्तर दिलं.

आप्पाही खारीसारखे वरच्यावर एकेक गोष्ट उडवत होते.

मला भीती वाटत होती ती मोटारींनी ओढा उडवला. खारींनी फळं उडवली तर आप्पांनी डांबरी अंगणासाठी दोन-चार झाडं उडवली. त्यांची त्यात चूक होती असं नाही. पण हे डांबरीकरण आणि हे विद्युतीकरण ह्या निसर्गाचं एकेक मूळ उपटतंय असं मला वाटू लागलं.

‘‘पण आप्पा, आता हे डांबरीकरण इथच थांबवा. पाठीमागं काजूच्या बागेत

जागा नाही बसायला म्हणून तिथही कराल डांबरीकरण.'' मी अनवधनानं बोलून गेलो. आणि आप्पा जरा चराकले. तोवर एक एस.टी. खाऽर करीत निघून गेली. पण पूर्वीसारखी धूळ नाही उडवली एस. टी. नं., कारण रस्ता डांबरी झाला होता ना!

या आधुनिकतेचा या निसर्गावर परिणाम होतो आहे याची भीती वाटते. वाटतं काय बरोबर आणि काय चुकीचं! हे सारं आक्रमण मोठ्या विवेकानं थोपवणं किती गरजेचं आहे हे इथं मला जाणवतं.

तरीही अजून इथला निसर्ग संतृप्त अवस्थेत आहे. इथं टी. व्ही आणि रेडीओचा आवाज येत नाही. इथं फक्त रातकिड्यांचा आवाज असतो रात्री. इथं अजून काजवे चमकतांना दिसतात. खारीनं कितीही फळं खाल्ली तरी अजून आप्पा कौतुकानं सांगत असतात की, यंदा पोटापुरता काजू झाला. इथं अजूनही जनावरांना ओली वैरण मिळते आणि इथलं ताक अजूनही दह्यासारखं घट्ट असतं. इथं आप्पा अवाक् होऊन सारं पाहात असतात आणि दाढीवरून हात फिरवीत दोन-चार दीर्घ श्वास घेत असतात. इथल्या जमिनीचा मालक अजूनही खराट्यानं लोटत असतो. इथला ओढा दोन-चार महिने का होईना खळखळाट करत असतो.

रात्री मंदिरात ताणून दिली. सकाळी लवकर जाग आली. आप्पा खराटा घेऊन बाहेर पडलेले. आप्पांनी बोअरींगवर बांधलेला सहाफूट खोल हौद पूर्ण भरला होता. मी चहा घेतला व त्यात उडी मारली. पंधरा बाय वीस फुटाचा तो हौद. त्यावर बसून उघड्या भिजलेल्या अंगानी मी सारा आसमंत आणि निसर्ग न्याहाळू लागलो. पाण्याच्या स्पर्शानं आणि थोडा व्यायाम झाल्यानं शिथिल झालेल्या मेंदूत भरगच्च रक्तप्रवाह होत होता आणि सारा रोमरोम पुलकित होऊन उठत होता. आता तर चिमण्या अगदी जवळ येऊन बोलत होत्या. झाडावरच्या खारी माझ्याकडं वाकून वाकून बघत होत्या. आप्पांचा आंगठ्याएवढा बारका नातू हौदाच्या काठावरून बसून 'आत येऊ का नको' असा विचार करीत होता. आणि त्याचा दणकट बाप त्याला उचलून पाण्यात बूडवून परत वर ठेवत होता.

मी विसरलो होतो सारं. खरंतर लेख लिहायला म्हणून मी गाव सोडलं होतं. महत्त्वाच्या जबाबदाऱ्या मागं टाकून मी पिसाटल्यासारखा बाहेर पडलो होतो. आणि इथं आलो. इथल्या खारी, मुंग्या, चिमण्या आणि इतर पक्षी मला कुठं लिहू देतायत? इथली झाडं कुरवाळत बसलो तर वेळ कुठं मिळतो लिहायला? इथल्या हौदात डुंबताना तर सारे विचार थांबतात. इथलं उन उबदारपणा आणतं अंगात आणि नको वाटतं सारं. लिहिणंही नको आणि ते पांढरपेशी जगणंही नको. वाळवीसारखं झाडाचा बुंधा कुरतडत बसणं वाटतं ते. इथं मला उपनिषदातल्या दोन पक्ष्यांच्या गोष्टीची आठवण होते. एक जण एक दोन फळं खाऊन वर जाऊन सारं विश्व पाहायला लागतो. दुसरा नुसताच खाली बसतो. वर जातच नाही. जेव्हा जातो तेव्हा समजते त्याला वर बसण्यातली रंगत, पण तेव्हा झाडावरून उडून जाण्याची वेळ आलेली असते.

मी जड अंतःकरणानं हौदाच्या बाहेर येतो. कपडे बदलतो. सुती लुंगी सोडून टेरीकॉटची पँट घालतो. तसं नव्हे मी कात टाकतो! आणि वाट धरतो माझ्या शहराची. तिथं धावणं असतं रक्त आटेपर्यंत. धावलं नाहीतर मरतं तिथं. नुस्तं धावतच बसलं तर माणूस जीभ बाहेर पडून बेशुद्ध व्हायला होतं. इथं मात्र शांत बसलं तरी जगता येतं. तिथं वर्षानुवर्षे धावूनसुद्धा जीवनाचा अर्थ नाही समजत. इथं मात्र खारी, मुंग्या आणि मधमाश्या पाहिल्या की, काही काही समजायला लागतं.

माझी एस्टीम मारुतीची दारं मी रिमोट कंट्रोलनं उघडली. व्ही. आय. पी. बॅग डिकीत टाकली. माझ्या वातानुकूलित गाडीत मी बसलो आणि बटनानंच काच खाली केली. कंबरेत दुखत असतानाही आप्पा वाकून मला अभिवादन करत होते. मी आप्पांचे दोन्ही हातात हात घेतले आणि म्हणालो.

''आप्पा पुरुषांना माहेर नसतं का हो?''

आप्पांनी ओळखलं काय ओळखायचं ते. त्यांनी माझे हात हातात घेतले आणि हळुवार दाबत म्हणाले.

''का म्हणून, असतं पुरुषांना सुद्धा माहेर.''

मी पुढच्या सीटचा बेल्ट माझ्या छातीभोवती करकचून आवळला आणि काच वर केली. माझी गाडी ऐंशीच्या वेगाने नवीनच केलेल्या डांबरी रस्त्यावरून कोल्हापूरला धावू लागली.

●●●

भूमिका

मी एकोणीसशे अैंशीच्या सुमारास कथालेखनास सुरुवात केली. एम. बी. बी. एस च्या शेवटीशेवटी व इन्टर्नशिपच्या काळात मी माझ्या पहिल्या कथासंग्रहातील कथांचं लेखन केलं. जीवनातील सौंदर्य, मांगल्य टिपण्याच्या काळात मी रुग्णांच्या दुःखाचे डोह पाहायचो आणि ढवळून निघायचं मन. मन जड व्हायचं. विचारांना वाट करून देण्यासाठी मी लिहायचो. लिहलं की मनं मोकळं मोकळं होतं हे त्या काळी मला उमजलं. मनातला भार लेखनाद्वारे मी हलका करीत असे.

एकोणीसशे चौऱ्यांशीला मी एम्. एस्. झालो. कोल्हापूरला आलो. माझ्या कुटुंबानं आणि गावानं मला जवळ केलं. हळूहळू मी स्थिर होऊ लागलो. त्या काळात वर वर विनोदी भासणाऱ्या पण सामान्य माणसाची वेदना सांगणाऱ्या काही कथा मी समाजाच्या व्यंगावर बोट ठेवीत ठेवीत लिहिल्या आणि माझा दुसरा कथासंग्रह प्रसिद्ध झाला.

नंतर मात्र आयुष्यात बदल होत गेले. सर्व चांगलं चांगलं असतांना त्या पांढरपेशी चांगलेपणातील निरर्थकता जाणवू लागली. जळगावच्या माझ्या एका मित्राकडं त्याच्या अंतःकाळीही मी जाऊ शकलो नाही. 'राजन' नावाच्या

माझ्या एका लेखात मी लिहलं, 'व्यवहाराची पानं कुरतडत अळीसारखा मी जगत होतो. राजन मात्र वर्तमान जगला आणि भविष्यात विलीन झाला.'

लोकप्रिय जगणं जसं असतं तसं माझं त्या काळातील जगणं होतं. पण मला ते निष्क्रिय वाटू लागलं. नवीन हॉस्पिटल बांधण्याचा प्रचंड ताणही होताच. हॉस्पिटलचं काम व जबाबदारी अतिरेकाला पोहोचली. आणि एका मानसिक संघर्षाला कोंडी फुटली. मनानं रक्तबंबाळ होण्याचे अनेक प्रकार त्या काळात होऊन गेले. संन्यस्तासारखा मी एकटा क्षेत्र महाबळेश्वरला जाऊन राहिलो आणि तिथं जे मी एकट्यानं अनुभवलं ते माझ्यात सामावण्यापलीकडचं होतं.

'मधमाश्यांचं मधानं भरलेलं पोळं मधमाश्यासहित हातात घ्यावं, मधमाश्यांनी आपल्यावर तुटून पडावं पण तरीही हातानं पोळं पिळून त्यातील मध प्यावा असे प्याले ते दिवस.'

त्या काळात माझी मानसिकताही विलक्षण होती. 'जसे पाण्यानं डोळे डबडबावेत तसं चांदण्यानं आकाश डबडबलं होतं, एखादा अश्रू टपकन पडावा तस उल्कापात झाला आणि मी भानावर आलो'

माझे अनुभव जसेच्या तसे मी डायरीत उतरवीत होती. मला कल्पनाही नव्हती की हे पुढं प्रसिद्ध होणार आहे. अक्षरगंध दिवाळी अंकात एक शब्दही न बदलता ते सारं प्रसिद्ध झालं. ते माझं सर्वात खाजगी लिखाण होतं.

याच काळात माझं कथा लिहिणं थांबलं आणि मी ललित लेख लिहू लागलो.माझं कितीही खाजगीपण असलं तरी मी ते ललित लेखाच्या माध्यमातून व्यक्त करू लागलो. म्हणजे स्वतःला व्यक्त करण्याची गरज मला वाटू लागली. करमणूक हा लेखनामागचा हेतू संपला. विनोद पडद्याआड गेला. आणि पुन्हा दाहकता आली. इथं कसलेच कपडे आपल्या लेखनाला चढवावेसे वाटेना झाले. मी जसंच्या तसं लिहू लागलो. याचं उत्तम उदाहरण म्हणजे 'वसंत' या लेखात माझ्या मनाच्या संघर्षाचा मी केलेला उल्लेख मी इथं मुद्दाम लिहीत आहे.

'हा आणि कुठला संघर्ष? असं वेगळं रूप घेऊन येणारा, घरादारापेक्षा आणि समाजापेक्षा वेगळं अस्तित्व ठेवणारा हा कसला संघर्ष?' हा संघर्ष मनातला. मनामनातला. स्वतःला कुरतडणारा, खाणारा, वाळवी लागल्याप्रमाणं सर्वच संपवून टाकणारा, मानवी जीवनाला शाप की वरदान ते न कळणारा, हा संघर्ष स्वतःमधल्या चांगल्याचा आणि वाईटाचा. सत्त्वाचा आणि तमाचा. हा प्रत्येक माणसात केवढा असतो? असतो की नसतो? किती असावा? असवा का नसावा असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. माझ्यात हा संघर्ष खूप मोठा आहे. सतत कुरुक्षेत्राची आठवण मनाला

करून देणारा हा संघर्ष वसंतात चांगलंच डोकं वर काढतो. माझ्यामधील चांगलं आणि वाईट समोरासमोर युद्धाला उभारतं आणि अर्जुनासारखी अवस्था होते. काय मारावं? काय ठेवावं? मारणंही माझ्या हातात नसल्यासारखं. मारण्याइतकी ताकदही मला निसर्गतः दिलेली नसते. मी वाईटही मारू शकत नाही आणि चांगलंही. या युद्धात वाईटाची सरशी होते तेव्हा मी अस्वस्थ होतो. संघर्ष वाढला म्हणून मी डंके पिटतो. जेव्हा चांगल्याची सरशी होते तेव्हा मी शांत होण्याचा प्रयत्न करातो. पण सारं क्षणभंगुरच. कुणाचीही सरशी टिकत नाही. मी मात्र रक्तबंबाळ होत असतो. ह्या संघर्षातून डोकं वर काढायलाच मिळत नाही. कित्येक दिवस संपून जातात. पण साधी वसंताची आठवणही होत नाही. हा संघर्ष जीवनातील खरा संघर्ष आहे आणि बाहेरच्या संघर्षापेक्षा कितीतरी पटीनं अधिक अस्वस्थ करणारा आहे. सोनं जसं जळून आत्मरूप दाखवतं तसा हा संघर्ष माणसाला जाळून आत्मरूप दाखवतो. ह्याला वेळ काळ नाही. हा सतत आपल्याशी भिडलेला असतो. तो आपल्याला कुठंही सोडत नाही. बांडगुळासारखा आपल्यावरच जगत पण आपल्याला शोषत तो राहात असतो. स्वतःच्या अस्तित्वाशीच संधान बांधून एखाद्या विषारी नागाप्रमाणं तो उभा असतो. पण आत्मतत्त्वाचं तो संरक्षणही करत असतो. तो पूर्ण मरूही देत नाही. तो भयानक संकटातून तारतो तो रक्षण करतो. जसं समाजात सत्याचं आणि असत्याचं युगानुयुगे जुंपलं आहे, तसंच माणसाच्या मनात चांगल्याचं आणि वाईटाचं ह्या संघर्षरूपानं जुंपलं आहे. माणसाचं मन ही या संघर्षाची कर्मभूमी आहे.

वरील दीर्घ उतारा देण्याचं कारण हा संघर्ष हा माझ्या लेखनामागील एक प्रेरणास्रोत ठरला. मनातले निखारे मी हातावरून कागदावर उतरवत गेलो. पुन्हा एकदा हे स्वतःला सोडवून घेणं होतं काय? तर नव्हतं. पूर्वीसारखा हरणानं जाळीतून सुटण्याचा प्रयत्न नव्हता हा. कारण मन परिपक्व होऊ लागलं होतं. माणूस असा तसा ह्यातून सुटू शकत नाही याची जाणीव होती. हे जीवनातील अडकलेपण, गुंतलेपण हेही जीवनातील एक सत्यच आहे याची जाणीव होती. हे जीवनातील अडकलेपण, गुंतलेपण हेही जीवनातील एक सत्यच आहे याची जाणी व होऊ लागली होती. लिहून मी यातून सुटका करून घेऊ शकत नव्हतो. इथं लेखनामागील कारण स्वतःतील धग कमी करणं एवढंच होतं. समाजप्रबोधनाचा हेतू मुळीच नव्हता. इथं हेतू होता शांत होण्याचा प्रयत्न करण्याचा. आपलीच कोडी कागदावर मांडून सोडविण्याचा. हेतू होता आयुष्याचं गणित पाटीवर सोडवण्याचा. आणि हेतू ठेवून कुठं लिहताय? लिहणे हे बऱ्याच अंशी नैसर्गिक आविष्काराचं रूप घेऊन येतं. थंडी पडली की माणसं कुडकुडतात. कुडकुडणं हा त्यांचा हेतू नसतो. ती नैसर्गिक प्रतिक्रिया असते. तसं झालं लिखाणाचं. लिखाण हे प्रतिक्षिप्त क्रियेप्रमाणं होऊ लागलं. ते जगण्याचं एक अंग बनलं. लिहिणं हे जीवनाच्या वस्त्रावर

एम्ब्रॉयडरीसारखं होऊ लागलं. ते बाजूला काढता येईनासं झालं. जगण्याचे आणि लिहीण्याचे धागे एकमेकात इतके घट्ट बसत गेले. एका प्रसिद्ध नर्तकीनं स्वतःच्या नृत्यातून स्वतःला आविष्कृत होतांनाचे नृत्याबद्दलचे काढलेले उद्‌गार या दृष्टीनं सूचक आहेत. ती म्हणते,

''त्यासारखं अवीट आगळं सुख नाही. तो निखळ आनंद ती संजीवनी! पायाखालची जमीन सुटली नसतांनाही मस्तक आकाशाला टेकल्यासारखं वाटणं. नृत्य करता करता मन त्रयस्थ होतं आणि म्हणतं, हा थिरकता देह मी नव्हे! तुझ्या नृत्याविष्काराचं साधन नव्हे मी. ना माध्यम. मी आहे प्रत्यक्ष नृत्याविष्कार! नृत्याचा दृश्य आशय, आशयाची सुभग प्रतीती, आशयाचं संपूर्ण निस्वार्थी भान आहे मी!''

ही नर्तकी स्वतःला नृत्याच्या साह्यानं उधळून देत असतांनाच स्वतःचा शोध घेतांना दिसते. एका अद्वैतात विलीन झाल्यासारखी भासते.

रस्ते मनातले या लेखात मी शाळेतून भुकेजून घरी जात असताना पावला पावलाला दगडगोट्यांनी ठेचकळायला लावणाऱ्या त्या शॉर्टकट रस्त्याबद्दल लिहलं आहे.

'कुणीतरी कुदळ मारून चार रताळं मला खायला द्यावी असं रोज वाटायचं. कारण तिथवर येईपर्यंत मी पूर्ण पेकाळलेला असायचो. आणि मला तो बुरूज चढायचा असायचा. घरी गेल्यावर आईबरोबर भरपेट जेवायचं या विचारानं तो बुरूज मी चढायचो. घरी आल्यावर आई मोठ्यांदा ''आला ऽ गं ऽ बाई'' म्हणायची व मला वाढू लागायची. तिला कळायची माझी तगमग. तशी तगमग कळणारी माणसं आयुष्यात पुन्हा भेटत नाहीत. ती माणसं फक्त या असल्या रस्त्यावर भेटतात. पुन्हा आपण मोठे होतो, रस्ते मोठे होतात, घरं मोठी होतात. पण त्या रस्त्यावर एकाचं दुःख दुसऱ्याला समजणारी माणसं कुठं असतात?

आपल्या मनाची तगमग जाणून घेणारी सोडाच पण ती सांगावी अशी तरी किती माणसं भेटतात समाजात? स्वतःतील सात्त्विक शांततेनं आपल्यातील धग शोषणारी किती माणसं भेटतात समाजात? म्हणून मला समाजापासून कधी कधी दूर जावं असं वाटू लागतं आणि मी निसर्ग जवळ करतो. माझ्या मोर या लेखात मी याबद्दल लिहिलंय की,

'या साऱ्या पक्ष्यांच्या तुलनेत मोर मला फार वेगळा वाटतो. कारण मोर हा तुम्हाला साऱ्या आठवणींपासून दूर घेऊन जातो. मोर पाहिला की विचार थांबतात. या जगातील सर्व गोष्टींपासून तो तुमचं बोट धरून तुम्हाला दूर कुठंतरी घेऊन जातो. मोर आत्म्यालाच भिडतो आणि आपणाला साक्षात्कार घडवतो. मोर पाहिल्यावर द्वैत संपतं. सर्व निसर्ग, मोर व आपण एकरूप होतो, आणि मोराप्रमाणं आपलं मन नाचू लागतं.'

अलीकडं एकटं जावं, एकटं राहावं, शांत व्हावं आणि आयुष्याकडं पुन्हा एकदा नव्या नवलाई पाहावं असं वाटू लागलं. त्यामध्ये गुंतलं असतांना जे लिहिलं तसं त्यापासून दूर मुक्त होऊन काय वाटतं ते बघावं. अशी एकटेपणाची ओढ मला लागू लागली. वास्तव कितीही झगमगीत असलं तरी एकटेपण, शांतपण त्यापेक्षा जास्त हवंहवंस वाटू लागलंय. ही मानसिक संघर्ष संपल्याची तर चाहूल नव्हे? मला तसं नाही वाटत. तो संघर्ष माणसांबरोबरच संपणार. पण ही मला एका शाश्वत मूल्याची ओढ वाटतेय. या सर्व लेखामधून माझा मलाच प्रश्न पडतो की, इतक्या विस्कटलेल्या वास्तवामध्ये सामाजिक, राजकीय संघर्षाच्या पार्श्वभूमीवर माणसाला विसावा देतील अशी कोणती मूल्यं अजूनही अस्तित्वात आहेत? जे मूल्य अशा प्रकारच्या चिंतनाला आणि लेखनाला प्रवृत्त करतं त्या मूल्याकडं हळूहळू नकळत ओढ निर्माण होऊ लागली आहे.

संगणक , ऐशआरामी गाड्या आणि पाश्चिमात्य संस्कृतीच्या घेरावामध्ये गुंतलेल्या मनाला एकाकी राहावं असं वाटतं. या सर्वांपासून बाजूला खेचून पक्ष्याप्रमाणं स्वच्छंदी राहण्याची जी ओढ आहे ती ओढ ह्या मूल्याची जाणीव करून देते. सर्वसामान्य प्रमाणे ही ओढ फार ताकदीची असते असे नव्हे, पण माझ्यामध्ये मला ती प्रकर्षानं जाणवते. आणि त्यातून ह्या जीवनाचा एक वेगळा स्रोत मला दिसतो. जग कितीही बदललं, कितीही जागतिकीकरण झालं तरीही ही एकटेपणाची ओढ मनाला दिलासा देणारीच आहे. यातूनच मी लेखन जवळ केलं. ललित लेखांच्या माध्यमातून मी लिहीत गेलो. एकटं जाणं, राहणं, चिंतन करणं आणि लिहिणं या क्रिया वेगवेगळ्या असल्या तरी त्या एकाच प्रेरणेपासून निर्माण होणाऱ्या आहेत. ही प्रेरणा एकटेपणातील आनंदाच्या शाश्वत मूल्यापासून तयार झाली असावी असा माझा विश्वास आहे.

जीवनाच्या गुंतलेपणातून मुक्त होणं, काही काळाकरिता का होईना किती जिवंतपणा आणतं जगण्यात हे मी स्वतः अनुभवलं आहे. या एकटेपणाच्या चिंतनातून कधीकधी स्वतःच्या आणि या निसर्गाच्या एकूणच सर्व सृष्टीच्या अस्तित्वाच्या, प्रयोजनाच्या आणि त्याच्या आणि माझ्या समन्वयाच्या काही दिशा सापडतात. त्या मला तृप्त करून जातात. ह्या एकाकीपणाच्या स्रोतातून एक जाण निर्माण होऊ शकते, ती जीवनाला आणि मनाला प्रगल्भता देते. मला लेखनाला उद्युक्त करते. म्हणून माझ्या जगण्याच्या प्रेरणा आणि माझ्या लेखनाच्या प्रेरणा ह्या जीवनमूल्याच्या स्रोतातून तयार होणाऱ्या आहेत असंच अलीकडं मला जाणवू लागलंय.

●●●

* ललित गद्याची निर्मिती प्रकिया *

(शिवाजी विद्यापीठाच्या ललित कला विभागातर्फे झालेल्या कार्यशाळेत वाचलेला शोधनिबंध)

पी. जी. कुलकर्णी

कोल्हापूर.

ललित गद्याची निर्मिती प्रक्रिया ही स्वत: लेखकाच्या विचार मंथनाची एक दिशा असते. अनुभव, अनुभूती, प्रसंग व्यक्तिरेखा एवढ्या पुरतीच ती मर्यादित न राहता पुन:पुन: लेखकाच्या विचार स्पंदनात ती भिजत राहते. लेखकाने अनुभवलेले प्रसंग, व्यक्तिरेखा त्यांचा आणि लेखकाचा संबंध आणि संवाद याचबरोबर त्याच्या व्यक्तित्वाचा त्या व्यक्तिरेखेवर आणि प्रसंगावर झालेला संस्कार ह्या प्रक्रियेचा एक भाग बनतो. एवढेच नव्हे तर पात्रांचा लेखकाच्या मनावर होणार संस्कार आणि परीणाम हाही तितकाच महत्त्वाचा असतो. या साहित्यप्रकारात लेखक मध्यवती असतो आणि सतत त्याच्या मनवार सभोवतालच्या घटनांचा प्रभाव पडत असतो. या पार्श्वभूमीवर लेखक त्याच्या लेखनाचा लेखन प्रक्रियाबाबत अधिक मुलगामी आणि सत्य विचार करु शकतो. इतरांनी केलेल्या ललित लेखनाच्या वाचनामुळे उमटलेली प्रतिक्रिया आणि त्याबाबतचे विचार हे त्या लेखनकृतींच्या निर्मिती प्रक्रियेला थेट हात घालू शकतील असे वाटत नाही.

ललित लेखन म्हणजे लेखकाचा मुक्त आत्माविष्कार त्याला. आत्मचरित्राचा मृद्गंध येतोच. त्या अनुषंगाने काही व्यक्तिचित्रे ही त्यात येतात. कधीकधी बालपणीच्या हळुवार आठवणी सुंदर पिसारा फुलवतात आणि वेगळ्या जगात नेतात. जीवनात काही व्यक्तिमत्त्वे विलक्षण ताकदीची भेटतात. ती लेखकाप्रमाणे वाचकांच्या मनाचा कब्जा घेतात आणि अंत:र्मुख करतात. विरक्ती जागविणारी आणि लेखकाच्या अंतर्मनाचा गाभारा फुलवणारी ही माणसे ललित गद्याचा आत्मा फुलवतात. वयोवृद्ध माणसे, वेड लावणारा निसर्ग, जीवनानुभवातून येणारी जाणती विरक्तीची उर्मी या ललित लेखांची बैठक घट्ट करतात.

ललित लेख बराचसा नवकथेकडे झुकताना दिसतो. तर कधी तो व्यक्तिचित्रण ही फुलवीत असतो. पण खरेतर तो व्यक्तिचित्रणही नसतो आणि कथाही नसतो. कथेच्या आकृतीबंधासारखा त्यात शेवट नसतो. व्यक्तिचित्रणाच्या आकृतीबंधातही तो बसत नाही. पण तरीही ललित लेख हा या दोन्ही साहित्य प्रकारच्या संवेदना देऊन जातो. निरनिराळ्या साहित्य प्रकाराच्या सुखद अथवा अस्वस्थ करणाऱ्या संवेदना वाटणारा पण प्रत्यक्षात तो साहित्य प्रकार नसलेला असा हा ललित गद्याचा आकृतीबंध आहे.

कधी तो काव्यात्म पातळीवर जाऊन तरलतम संवेदना देतो. तर कधी कथात्मक पातळीवर वाचकाला रिझवत जातो कधी तो ललित निबंधासारखे मोरपीस फिरवून जातो, कधी एखादी व्यक्तिरेखा फुलवतो पण कधी कधी जीवनातील भीषण सत्याचे दर्शन घडवून तो अस्वस्थही करतो.

ललित गद्य या स्वरुपात लेखन करण्याची गरज लेखकाला कशी उत्पन्न होते याचा विचार केल्यास लेखकाला जे काही सांगायचे असते ते उत्कट असते, त्यांच्या मनात दबलेले विचार त्याला व्यक्त करायचे असतात. यात काही व्यक्ती असतील तर काही प्रसंग, कधी निसर्गचित्रे असतील तर कधी नेहमीच्या जीवनात महत्त्व वाटणार नाही अशा निर्जिव गोष्टीही असतील. हे सांगणे कथा, कांदबरी आणि कविता या कुठल्याच साहित्यकृतीत बसेल असे नसते. त्याच्या ह्या व्यक्तिकरणाला आकृतीबंधाचा अडसर येऊ लागल्याने तो निराश होऊ लागतो. त्याला जे सांगायचे असते त्याला अर्थ असतो, त्याच्या जीवनानुभूतीतून ते सकसपणे बाहेर आलेले असते, त्याचा आणि हा निसर्ग यांचा जो संबंध आहे त्याचे अप्रत्यक्ष विश्लेषण त्यातून होत असते असे असून सुद्धा त्याचे प्रकटीकरण हे आकृतीबंधाविना अडकून पडते.

ललित गद्य या वाङ्मय प्रकारात लेखनाबद्दलची जी स्वतंत्रता मिळते तिचा फायदा अशा वेळी लेखकाला घेता येतो. त्याचे विचार या माध्यमातून मनमोकळेपणाने व खरेपणाने व्यक्त केले जाऊ शकतात. आणि लेखकाला स्वस्थ व हलके वाटू लागते.

लेखकाचे कितीही खाजगीपण असले तरीही ललित लेखाच्या माध्यमातून तो ते व्यक्त करु शकतो. जीवनातलं अडकलेपण, गुंतलेपण हेही जीवनातील एक सत्यच आहे. लिहून त्यातून सुटका होऊ शकत नाही. बऱ्याच वेळा समाजप्रबोधनाचा हेतू ललित लेखात नसतोच. स्वत:तील धग कमी करणे, शांत होण्याचा प्रयत्न करणे, हा ही त्या मागचा हेतू असू शकतो. स्वत:मधील अतृप्तता आणि अस्वस्थता ही कधी कधी मानसिक अंतद्वातून निर्माण होते. लिहणे हे कधी कधी नैसर्गिक अविष्काराचे रूप घेऊन येते. थंडी पडली की माणसं कुडकुडतात. कुडकुडणे हा त्यांचा हेतू नसतो. ती नैसर्गिक प्रतिक्रिया असते.

ते जगण्याचे एक अंग बनते. लिहणे हे जीवनाच्या वस्त्रावर एम्ब्रॉयडरी सारखे होऊ लागते. ते बाजूला काढता येईनासे होते. लिहण्याचे आणि जगण्याचे धागे एकमेकांत घट्ट बसू लागतात.

कुठल्याही साहित्यकृतीत स्वत:बाबत लिहण्याचा सोस हा टिकेचा विषय बने. पण ललितगद्यात तो तितकासा मारक ठरु शकत नाही. इथे तुम्ही स्वत:बाबत, तुमच्या विचाराबाबत, तुमच्या प्रतिक्रियेबाबत स्पष्टपणे लिहू शकता. हे जरी खरे असले तरी

स्वत: व्यक्त होत असतांना काही नियम पाळायचे असतात ते इथेही पाळावे लागतात. स्वत: निर्गर्वी आणि वजनरहित होऊन या स्वव्याकीकरणाला जन्म द्यायचा असतो. जशी माता मुलाला जन्म देताना इथे गर्विष्ठ नसते आणि कुंठली तिची पोझही नसते. निसर्गाचा भाग म्हणून निसर्गाच्या संवर्धनात ती कार्यरत असते आणि निसर्गाशी ती विलीन, एकरुप झालेली असते तेव्हा तसे हे स्वव्याक्तिकरण ललित लेखात येणे गरजेचे असते आणि त्यासाठी लेखनगर्भ आत्मनिष्ठा ही लेखकाजवळ असणे आवश्यक असते.

ललित गद्यातील या वैशिष्ट्यांनी आणि गुणांनी लेखक या वाङ्मयप्रकाराकडे आकृष्ठ होतो. छोटेमोठे क्षण टिपण्याऱ्या आणि कलाटणीखोर शेवट करण्याचा आकृतीबंध जोपासणाऱ्या कथेपेक्षा इथे ललित लेखन वरच्या पातळीवर जाते. एक मोठा जीवनपट हजारो लोकांच्याबरोबर उलगडत अत्यंत सामान्य वाटणारा विषय घेऊन जीवनातील सौह्याद्रता टिपणारा व्याप्तविशाल निसर्गाच सत्य सांगण्यासाठी एखादिका होईना खिडकी उघडणारा हा सकस आणि सुंदर वाङ्मय प्रकार आहे.

गतकाळातील स्मृती हेच आपले ज्ञान असते. व्यक्ति व्यक्ति परत्वे त्याला मर्यादा असतात. या स्मृतींचा संस्कार लेखकाच्या मनावर होऊ लागतो आणि मनात विचारांची, मत प्रवाहांची कंपने उठू लागतात. हा झंकार जीवनाच्या कुठल्याही तत्वज्ञानाच्या पार्श्वभुमीवर ललित गंद्याचे स्वरुप घेऊन येतो.

आपल्या मनाची तगमग जाणून घेणारी सोडाच पण ती सांगावी अशी किती माणसं भेटतात समाजात? स्वत:तील सात्विक शांततने आपल्यातील धग शोषणारी किती माणसे भेटतात समाजात? अशा पार्श्वभूमीवर काही माणसे अशीही भेटतात की ती लेखकावर अपरिमीत परिणाम करतात. लेखकाच्या जीवनाची दिशादेखील बदलविण्याचे सामर्थ्य ह्या व्यक्तिंमध्ये असते. त्यावक्तीचे आणि लेखकाचे व्यक्तिमत्त्व एकमेकांना संस्कारित असते. त्या दोघांमधील संवाद, अनुभूती, ऋणानुबंध ही एका शांत नैसर्गिक पार्श्वभूमीवर उलगडत जातात. शेवटी हा सारा ऋणानुबंध हा निसर्ग ही मैत्री कशासाठी? एकरुपतेसाठी. एक नैसर्गिक अद्वैत अशामधून अभिप्रेत होत जाते. खरेतर या अद्वैतामध्ये अनुभूती चींब भिजून जात असते. सगळीकडे शांतता असते. तरीही ही अनुभूती व्यक्त करण्याची लेखकाची इच्छा अनावर असते. कधीकधी अनाकलनीय असते. कधी बालकाप्रमाणे पापभिरु रुप घेऊन ती येते. तर कधी कधी अप्रत्यक्षपणे काही तत्त्वज्ञान ती दाखवून देते. अनुभुतीच्या प्रकटीकरणाचा ध्यास हे एक अस्सल आणि धगधगते साहित्य आणि इतर कलाकृतीतील मूल्य आहे. या मूल्याचा प्रेरणेतून लेखक व्यक्त होत असताना ललित गद्याचा आकृतीबंध अतिशय पोषक ठरतो. भावभावना, विार, प्रसंग, व्यक्ती, निसर्ग, तत्त्वज्ञान अध्यात्म आणि साध्या साध्या अनेक गोष्टींचे

कारंजे उडवीत हा वाङ्मय प्रकार जीवनाच्या सत्याचा शोध घेण्याच्या प्रयत्नात असतो. लेखकाला आलेल्या अनुभूतीच्या प्रकटीकरणामागे असलेली प्रेरणा ही जीवनाचे सत्य शोधकाच्या प्रेरणेचाच एक भाग असावा.

साहित्य लेखनाचा उद्देश फक्त मार्गदर्शन, मनोरंजन आणि स्वांत सुखाय न राहता तो जीवनमुल्याचा ध्यास घेणारा असवा. ललित गद्याचा उपयोग हा फक्त मनोरंजन आणि मार्गदर्शनापुरता मर्यादित ठेवला तर हा वाङ्मयप्रकारातील सकसता कमी होऊन तो रसहीन होत जाईल.

मराठी साहित्यात ललित गद्याचे स्वरुप बदलत गेले आहे. 'रस्ते मनातले' या माझ्याच ललित लेखांच्या संग्रहाचा आधार घेऊन हा बदल आणि ललित गद्याची निर्मिती प्रक्रिया याबाबत मूलगामी आणि सखोल असे लिहिता येईल. पूर्वीच नमूद केल्याप्रमाणे स्वलेखनाती अनुभवाचा विचार हा अधिक सत्य असू शकेल.

'रस्ते मनातले' या ललित लेखात रस्ते हे केंद्रबिंदू मानून रस्त्यांचा व माझा, माझ्या मनाच्या पातळीवर काय संबंध येतो याचा विचार त्यात आलेला आहे. रस्ते हे जेव्हा माणसांनी गजबजलेले असतात तेव्हा ते जीवंत असतात. ते माणसामाणसांना व माणसांच्या समुहाला प्रत्यक्षपणे जोडत असतात. मनाच्या पातळीवर रस्ते जीवंतच असतात. रस्त्यांवर आपले व आपल्यवर रस्त्यांचे संस्कार झालेले असतात. ते माणसापेक्षा दीर्घकाळ टिकतात व गत माणसांच्या आणि गत वैभवाच्या आठवणींचे साक्षीदार ठरतात. रस्ते जसे शहराला शोभा आणतात तसेच ते मनाच्या पातळीवर जीवनाला शोभा आणतात व आठवणींचे साक्षीदार बनतात.

ही रस्त्यांबद्दलची संकल्पना जेव्हा माझ्या जीवनात आलेल्या रस्त्यांना मी लागू करतो तेव्हा ते मला रक्तवाहिन्यांप्रमाणे वाटू लागतात. जणूकाही माझ्या सर्वांगाला ते प्राणवायूचा पुरवठा करतात. मी बाळ असतांना खरसुंडीच्या कच्चा रस्त्यावरील पाटील असोत अथवा जरा मोठा झाल्यावर आठवणारे मामाच्या वसवड्याच्या रस्त्यावरचे शंकरआण्णा असोत, ती माणसे गेली तरीही ते रस्ते अजून माझ्या स्मरणात आहेत. असेच नव्हे तर मी जेव्हा तिथून पुन्हा फिरतो तेव्हा ती माणसे जीवंत झाल्याचा मला भास होतो.

मनातल्या रस्त्यांचे सामर्थ्य तिथले लोक त्यावर असणाऱ्या घरातील कुटुंबे त्यांचे आणि माझे मनाच्या पातळीवरचे ऋणानुबंध, कडू गोड आठवणी आणि पाश्वभूर्मी असलेली तेव्हाची सामाजिक, नैसर्गिक आणि आर्थिक परिस्थिती या गोष्टी वाढवत असतात. या सर्व गोष्टींच्या सामर्थ्यानिशी रस्ते मनात येतात आणि आठवणींचा हल्लकल्लोळ उठवतात.

आता माझे मन ही या सर्वांच्या परिणामाचे आणि परीमाणाचे एक केंद्र बनते. मन ह्या सर्व गोष्टींच्याबाबत आपली स्वत:ची प्रतिक्रिया देण्याचा प्रयत्न करु लागते. आता मन हे लेखाच्या केंद्रस्थानी येण्याचा प्रयत्न करु लागते. जीवंत रस्त्याच्या बोटाला धरुन मन दुडूदुडू धावू लागते. लेखाच्या सुरवातीला केंद्रस्थानी असणाऱ्या रस्त्यांवरुन आता माझे मनही धावायला लागते. बरोबर याच ठिकाणी वाचकाच्या बाबतीत मात्र त्याचे स्वत:चे मन या सारख्या त्याच्या जीवनातील रसत्यांवर आठवणींचा पाऊस पाडत धावायला सुरुवात करते. आणि हेच या ललित लेखाचे प्राथमिक यश असते.

या पार्श्वभूमीवर लेखकाला कळून चुकलेले असते की वाचक आता लेखामध्ये समाविष्ठ झाला आहे. तसे लेखकाने वाचकाला दूर कधीच ठेवलेले नसते. सुरवातीपासून तो वाचकाला खुणवत, जवळ बोलावत असतो. खरे तर तो सारे काही वाचकालाच सांगत असतो. ज्यावेळी वाचक यात खऱ्या अर्थाने सामील होतो. तेव्हाच खरे अद्वैत साधते. या ललित गद्यात लेखक वाचक आणि केंद्रस्थानी असलेली वस्तू एकरुप होऊन जातात. त्या मनातल्या रस्त्यांवरुन लेखक आणि वाचक हातात हात घालून आपल्या आठवणी उजळून टाकतात.

प्रस्तुत पुस्तकातील यादव सरकार या लेखाबाबत काही गोष्टी नमूद कराव्या वाटतात. यादव सरकार ही अध्यात्मिक पार्श्वभूमी असलेली वृद्ध व्यक्ती लेखकाच्या जीवनात येते आणि साधारणपणे दहा वर्षांचा काळ निघून गेल्यानंतर अनंतात विलीन होते. या व्यक्तीच्या आणि स्वत: लेखकाच्या सहवासातून निर्माण होत गेलेल्या व्यक्तिरेखेचा उल्लेख वरील लेखात आहे.

हा ललित लेख बराचसा नवकथेकडे झुकणारा आहे. त्याचा बांधा व्यक्तिचित्रणात्मकतेकडेही झुकतो पण वस्तुत: ती कथाही नव्हे व व्यक्तिचित्रणही नव्हे. कथेच्या आकृतीबंधाप्रमाणे त्याचा शेवट नाही. सरळसोटपणे घडत जाणाऱ्याघटनांचा त्यात उल्लेख आहे. व्यक्तिचित्राच्या आकृतीबंधातही तो बसत नाही. तरीही हा लेख दोन्ही साहित्य प्रकाराच्या संवेदना देऊन जातो.

यादव सरकार या लेखात फक्त यादव सरकार नाहीत तर लेखक स्वत: त्यात समाविष्ठ झाला आहे.

ललितगद्य या आंतरबाह्य काव्यतरलता आणि आहायधमता यांचा सुरेख संगम होऊ पहात आहे. कथा काव्याप्रमाणे ललित लेखनही मुग्ध अनुभव देणारे भावतरल साहित्यविभ्रम बनत आहे. मुक्तचिंतनाच्या अंगाने कामात्म फ्लटा अविष्कारात आज मराठीत ललित लेखन बहरत आहे. गद्यस्वरुप तरीही काव्यात्म असा हा आत्माविष्कार आहे.

माणसाच्या मनात एक जिप्सी लपलेला असतो. तो तरल वृत्तीच्या माणसाला अवघ्या निसर्गाशी सहकंप साधण्याची अनुभूती देतो. तत्पूर्वी तो अस्वस्थता देतो. तद्नंतर काही काळाची तृप्ती देतो. स्वाभाविक ओढ वाटावी असे प्रसंग, पुन:प्रत्ययाचा आनंद देणाऱ्या अनुभूती आणि अलवार भावस्थिती यामुळे वाचक मनाला मुग्धता येते. ललित गद्य या वाङ्मयीन प्रकाराची पापुद्रे उलगडून त्याची ताकत दाखविण्याची आज गरज आहे.

एकटे जावे, एकटे रहावे, शांत व्हावे आणि आयुष्याकडे पुन्हा एकदा नव्या नवलाईने पहावे असे वाटू लागते. अश्या एकटेपणाची ओढ वाढू लागते आणि वास्तव कितीही झगमगीत असले तरी एकटेपण, शांतपण त्यापेक्षा जास्त हवेहवेसे वाटू लागते. ही ओढ मानसिक संघर्षामुळे निर्माण होते असेही नाही. कारण तो संघर्ष हा माणसाबरोबरच संपणारा असतो. ही एकटेपणाची व शांतपणाची ओढ ही एका शाश्वत मुल्याचीच ओढ आहे. विस्कटलेल्या वास्तवामध्ये सामाजिक राजकीय संघर्षाच्या पाश्वभूमीवर माणसाला विसावा देतील अशी कोणती मूल्य अजून अस्तित्वात आहेत? अे मूल्य अशा प्रकारच्या चिंतनाला आणि लेखनाला प्रवृत्त करते त्या मूल्याकडे हळूहळू न कळत ओढ निर्माण होऊ लागते.

संगणक, ऐशआरामी गाड्या आणि पाश्चिमात्य संस्कृतिच्या घेरावामध्ये गुंतलेल्या मनाला एकाकी रहावे. या सर्वांपासून बाजूला खेचून पक्षाप्रमाणे स्वच्छंदी राहण्याची जी ओढ आहे ती ओढ या मूल्याची जाणीव करुन देते. सर्वसामान्यपणे प्रत्येकात ही ओढ फार ताकदीची असते असे नव्हे पण ती ताकदीची असेल तर त्यातून ह्या जीवनाचा एक वेगळा स्त्रोत दिसून येतो. जग कितीही बदलले, कितीही जागतिकीकरण झाले तरीही ही एकटेपणाची ओढ मानवी मनाला दिलासा देणारीच आहे. यातूनच लेखक लेखन जवळ करतो. ललित गद्य माध्यमातून तो लिहीत जातो. एकटं जाणं, राहाणं, चिंतन करणं, आणि लिहिणं ह्या क्रिया वेगवेगळ्या असल्या तरी त्या एकाच प्रेरणेतून निर्माण होणाऱ्या आहेत. ही प्रेरणा एकटेपणातील आनंदाच्या शाश्वत मूल्यापासून तयार झाली असावी –

डॉ. पी.जी. कुलकर्णी

●●●

माणूस आणि निसर्ग यातील नात्याचा शोध : 'रस्ते मनातले'

– डॉ. रविंद्र ठाकूर

माणूस वर्तमान वास्तवात जगतो म्हणजे नेमके काय करतो? खरे म्हणजे तो जगतो ते त्याचे वर्तमान वास्तव नसतेच. वर्तमान वास्तवात तो त्याचा भूतकाळच जगत असतो. त्याच्या प्रत्येक अनुभवावर, जगण्यातील प्रत्येक क्षणावर भुतकाळातील वास्तवाची कृष्णछाया एळाद्या सावटासारखी पसरलेली असते. हे इष्ट की अनिष्ट हा वेगळा प्रश्न असला तरी हे वास्तव आहे हे मात्र खरे.

डॉ. पी. जी. कुलकर्णी यांनी लिहलेला 'रस्ते मनातले' हा ललित लेख संग्रह वाचताना वरील विचार सहजच मनात डोकावून गेला. डॉ. कुलकर्णी यांनी 'लेपर', 'माझा स्वर्गवास' यासारखे कथासंग्रह लिहून चोखंदळ वाचकांमध्ये आपला ठसा निर्माण केला आहेच. परंतु 'रस्ते मनातले' या ललित लेख संग्रहात त्यांनी थोडी वेगळी वाट चोखाळली आहे.

तसे पाहता मराठी साहित्यात ललित गद्य लेखनाला समृद्ध आणि चांगली परंपरा आहे. श्री.कृ. कोल्हटकर, दुर्गा भागवत, इरावती कर्वे, श्रीनिवास विनायक कुलकर्णी, व्यंकटेश माडगूळकर, अनिल अवचट आणि अगदी अलिकडे मारुती चितमपल्ली अशी काही ठळक नावे सहजच सांगता येतील. परंतु ही परंपरा खंडित होत चालली आहे की काय अशीही परिस्थिती सध्या निर्माण झाली आहे. कारण लक्षणीय आणि सातत्यपूर्ण ललित गद्य लिहिणारे लेखक सध्या फारसे आढळत नाहीत. म्हणूनच 'रस्ते मनातले' सारखे ललितगद्य वाचताना आश्वासकतेचा सूर गवसल्यासारखे वाटते.

हेही तेवढेच खरे की मराठी साहित्यातील बरेचसे ललितगद्य बालपणातील कडूगोड आठवणी, संस्कारक्षम वयातील अनुभव यातच अधिक रंगते. डॉ. कुलकर्णी यांचे ललितगद्य वाचतानाही हाच अनुभव येतो. वर्तमान जगाताना भुतकाळातील अनुभवांचे टिपलेले कण असे स्वरुप त्यांच्या या ललित लेखांना प्राप्त झाले आहे.

प्रत्येक व्यक्ती आपल्या भूतकाळातील दिवसांविषयी नेहमी भरभरुन बोलत असते. गेलेल्या आयुष्यामध्ये जितकी चांगली माणसे भेटलेली असतात, तितकीच वाईटही. पण सारखी आठवावी अशी वाटतात ती चांगलीच माणसे, चांगलेच प्रसंग अशापैकी एक लेखकाची आई. तिच्याविषयी लिहीताना ते म्हणतात, ''घरी गेल्यावर आईबरोबर भरपेट जेवायचं या विचारानं तो बुरुज चढायचो. घरी आल्यावर मोठ्यांदा 'आलाऽऽ गं ऽऽ बाई' म्हणायची व मला वाढू लागायची. तिला कळायची माझी तगमग.

तशी तगमग करणारी माणसं आयुष्यात पुन्हा भेटत नाहीत. ती माणसं फक्त या असल्या रस्त्यावर भेटतात. पुन्हा आपण मोठे होतो, रस्ते मोठे होतात, घरं मोठी होतात. पण त्या रस्त्यावर एकाचं दु:ख दुसऱ्याला समजणारी माणसं कुठं असतात?'' असेच चांगले प्रसंग, चांगल्या व्यक्ती त्यांच्या भुतकाळाचा अविभाज्य भाग आहेत.

शहरातील त्याच त्या कामांनी व समस्यांनी जीवनाला येणाऱ्या एक प्रकारच्या साचलेपणातून बाहेर पडण्यासाठी लेखक सतत आसुसलेला आहे. निसर्गाची ओढ हा त्यांच्या स्वभावाचा भाग आहे. त्या विषयी तो लिहितो, ''हा संघर्ष, घरातला विरोध आणि व्यवसायातील असमतोल या सर्वांनी जेव्हा मला अभिमन्यूप्रमाणे व्यूहात अडकवलेलं असतं तेव्हा मी कसा जाणार वसंताकडे? वसंत मला खुणावत असतो. बोलवत असतो. कोकिळ पक्षी साद घालत असतात. आणि मी ह्या चक्रव्यूहात अडकलेला असतो. अभिमन्युप्रमाणे मी रडत असतो. विव्हळत असतो. पण मी बाहेर येऊन वसंताला आलिंगन देऊ शकत नाही. दरवर्षी असं होतं. दरवर्षी ठरवतो की हा चक्रव्युह आपण भेदायचा. वसंतशी एकरुप व्हायचं. पण दरवर्षी वसंत तसाच निघून जातो. मी मरेपर्यंत हे असंच चालणार का? ती मुक्त मिठी वसंताशी कधी होणार.''

खरे तर आयुष्यात प्रत्येक आठवणी ह्या रम्य नसतात, अनेक कडू आठवणी गोष्टी आपल्या आयुष्यात घडून गेलेल्या असतात, वाईट माणसं भेटलेली असतात, ज्या रस्त्यावरुन पुन्हा जाऊच नये असेही रस्ते येऊन गेलेले असतात. अशा मनाला क्लेश देणाऱ्या आठवणी कुणालाही नको असतात. अशा आठवणींना फाटा देऊनच व्यक्ती चांगल्या व्यक्ती व त्यांच्या सहवासातले क्षण आठवत असते. त्यांच्या आठवणीत रमत असते. अशाच अनेक आठवणी डॉ. कुलकर्णींनी आपल्या 'रस्ते मनातले' या संग्रहात एकत्र केल्या आहेत.

या संग्रहातील सर्वच लेख लेखकाने स्वत:च्या काव्यमय शैलीत साकार केले आहेत. अनुभवाच्या निमित्ताने व्यक्त झालेले जीवनविषयक चिंतन हा या लेखांचा लक्षणीय विशेष आहे. उदाहरणार्थ ही वाक्ये पहा, ''संघर्ष माणसाला जाळून आत्मरुप दाखवतो. ह्याला वेळ काळ नाही. हा सतत आपल्याशी भिडलेला असतो. तो आपल्याला कुठंही सोडत नाही. बांडगुळासारखा आपल्यावरच जगत पण आपल्याला शोषत तो रहात असतो. स्वत:च्या अस्तित्वाशीच संधान बांधून एखाद्या विषारी नागाप्रमाणं तो उभा असतो. पण आत्मतत्त्वाचं तो संरक्षणही करत असतो. तो पूर्ण मरुही देत नाही. तो भयानक संकटातून तारतो पण पुन्हा तितक्याच ताकतीनं आपणाला दंश करीत राहतो. हिरेमाणकाचं रक्षण केल्याप्रमारे तो जीवनाचं रक्षण करतो. जसं समाजात

सत्याचं आणि असत्याचं युगानयुगे जुंपलं आहे, तसंच माणसाच्या मनात चांगल्याचं आणि वाईटाचं ह्या संघर्षरुपानं जुंपलं आहे. माणसाचं मन ही या संघर्षाची कर्मभूमी आहे.''

एकंदरीत या सर्व लेखांमधून सतत जाणवत राहतं ते लेखकाचं अस्वस्थ मन त्याची अज्ञाताकडे ओढ घेणारी उत्कट मन:स्थिती सर्वत्र दिसते.म्हणूनच माणूस आणि त्याच्या भोवतालचा निसर्ग हा लेखकाला नेहमीच साद घालत आला आहे. वर्तमानाच्या धक्काधकीत जगताना, व्यवहाराचे टप्पे टोपणे खाताना, स्वार्थी, आपमतलबी जगात वावरताना त्याचं एक मन नेहमीच निसर्गाकडे ओढ घेताना दिसते. एकांत आणि निसर्गाचं सान्निध्य यांच्या मदतीने तो स्वत:चा शोध घेऊ पाहतो. मन:शांतीसाठी ठरवून महाबळेश्वरला जातो. यादव सरकार यांच्यासारख्या लोकांच्या सहवासात राहतो. परंतु त्यातूनही हाती काही गवसतंच असं नाही. गवसतं ते पुरंतच असं नाही. परंतु ते शोधण्याची अदम्य ओढ मात्र सर्वत्र जाणवते. ज्ञात जगात वावरताना अज्ञाताचा शोध घेण्याची, माणूस आणि निसर्ग यांच्यातील मूळ नातं शोधण्याची लेखकाची ही ओढ हाच या ललित लेखांचा स्वभाव आहे. तो टिको, वाढो ही सदिच्छा!

●●●

शोध, शाश्वत मूल्यांचा

व्यवसायाने डॉक्टर, पण अंतर्बाह्य एका हळुवार, संवेदनशील साहित्यीकाचे मन असणाऱ्या लेखाकाचा हा ललितलेख संग्रह आहे. सतत रुग्णांच्या आणि व्याधींच्या सहवासात राहूनही डॉक्टरांमध्ये तटस्थता किंवा नीरसता आढळत नाही तर त्यांनी एक कोमल आणि मृदू व्यक्तिमत्व स्वत:त जपले आहे, नव्हे तो त्यांचा प्रकृतिधर्मच आहे. विरक्तीची त्यांना ओढ आहे. पण सर्वसंग परित्याग करावासा त्यांना वाटत नाही. भौतिक, लौकीक सुखाची सर्व साधने त्यांच्या भोवती हात जोडून उभी आहेत. सौख्य, समृद्धी आहे. पण ह्या सौख्यातही एक अधुरेपण त्यांना जाणवते, ज्याच्या पूर्णत्वासाठी ते निसर्गाकडे धाव घेतात. वेगळ्या माणसांमध्ये ते रमतात, पक्ष्यांमध्ये हरवून जातात, रस्त्यांशी हितगुज करतात. व्यवहाराच्या पातळीपलिकडचे निर्मेळ आणि मुक्त कवीमन डॉक्टरांमध्ये दडलेले आहे. जे स्वत:च्या मुक्त अविष्कारासाठी वेगळ्या वातावरणात जाऊ इच्छिते. जेव्हां त्यांना अशी जागा मिळते तेव्हा निखळ सौंदर्याचा, आनंदपूर्तीचा लाभ होतो घेऊनच ते पुढचा प्रवास करणार असतात. डॉक्टर आपल्या व्यवसायात, संसारात रमतात पण मन जेव्हा उदास होते तेव्हा त्यांच्या स्वत:शीच झगडा चालू होतो. ह्या मानसीक द्वंदातून सुटण्यासाठी ते आधार शोधतात. डॉक्टरांमध्ये असा एक तत्वाचिंतन आहे. जो अहोरात्र जागा असतो, जो जाणीव-नेणीवनेच्या पातळीवर सतत कार्यरत असतो. असे हे जागरुक रसिक आणि उत्कट व्यक्तिमत्व मनातील संघर्षाला तसे अस्वस्थतेला लेखणीत जेव्हा उतरवते तेव्हां तो अविष्कार अस्सल आणि मनाला भिडणारा असाच असतो.

नऊ लेख असलेल्या या पुस्तकातील रस्ते मनातले हा पहिलाच शिर्षकलेख आहे. लहानपणी ज्या गावांमध्ये डॉक्टर राहिले त्या गावातील छोट्या छोट्या वळणांच्या, कच्चा पक्क्या रस्त्यांशी डॉक्टरांच्या अनेक आठवणी निगडित आहेत. रस्ते हे शरीरातल्या रक्तवाहिन्यांसारखे त्यांना वाटतात. त्यांच्या मनातील ह्या रस्त्यांना स्वत:चे असे एक खास व्यक्तिमत्त्व आहे. ते निर्जीव तर मुळीच नाहीत.बालपण ज्या रस्त्यांवर घालवले ते रस्ते आणि त्या रस्त्यांवर भेटणाऱ्या ठराविक माणसांच्या आठवणी लेखकाला हळवे बनवतात. बुरुजाच्या विखुरलेल्या दगडावरुन, शेतातल्या पाऊलवाटेंवरुन व नंतर पक्क्या रस्त्यावरुन शाळेतून परतताना जिवाची झालेली तगमग त्यांच्या अजून स्मरणात आहे. ही तगमग फक्त आईलाच कळणारी. ते लिहितात, ‘अशी

तगमग कळणारी माणसं फक्त या असल्या रस्त्यावर भेटतात. आपण मोठे होतो, रस्ते मोठे होतात, घरं मोठी होतात. पण या रस्त्यावर एकाचं दु:ख दुसऱ्याला त्या श्रीमंत क्षणाची ओंजळभेट लाभ होतो. समजणारी माणसं कुठ असतात?’

‘दहा दिवस’ या संग्रहातील सर्वात मोठा व डॉक्टरांच्या काव्यात्म वृत्तीचा परिचय करुन देणारा लेख. या लेखात मुक्त छंदातील नऊ रचना त्यांच्या लेखणीतून साकार झाल्या आहेत. त्याही प्रसंगानिष्ठ आणि चित्रमय अशा. त्या वाचत असताना एक चित्र आपल्यालाही मनात तयार होतं. त्या क्षणी, त्या स्थळी डॉक्टरांनी जे अनुभवलं ते लगेचच त्यांनी शब्दात उंरवलं.

‘वृक्षांच्या हिरव्या रांगा
त्या काळ्या टेकडीवर भरभरुन पसरलेल्या
धोमच्या पाण्याची निळाई काळसर झालेली
माझ्याजवळची बारीक सारीक खुरटी रोपटी स्तब्ध झालेली’

चिमण्या मात्र हळूहळू चिवचिवत होत्य. निसर्गातल्या ह्या दृश्याशी डॉक्टर इतके एकरुप होतात की, ‘ती झाडं, ते पाणी म्हणजे मीच झालो होतो का?’ असा संभ्रम त्यांच्या मनामध्ये निर्माण होतो. गृहस्थाश्रमातील सर्व भुमिकांपासून मुक्त होऊन, निसर्गाचाच एक भाग बनून डॉक्टर दहा दिवस महाबळेश्वरला जाऊन जेव्हा राहिले. त्यावेळच्या वास्तव्यातील ह्या रचना. मानसिक, शारिरीक, आत्मिक बळ वाढविण्यासाठी ते काडसिद्धेश्वर महाराजांच्या मठात राहिले. सायकलिंग, चालणं, मुलांशी खेळणं या दिनचर्येत स्वच्छंदी पक्षासारखं रमत असतनाच पत्नी आणि मुलांची मनाला लागलेली ओढ लेखकाला विरक्ती आणि आसक्ती यांच्या मर्यादा नकळत स्पष्ट करुन देते. एका आठवड्यात मिळवलेले अलौकीक, नैसर्गिक अनुभव लेखकाला समृद्ध करुन जातात. दहा दिवसानंतर पत्नी, मुलांसह घरी परतताना वाटेतल्या वनश्रीला पाणवल्या डोळ्यांनी निरोप देतांना त्यांच्या मनात येते,

‘वचने दिली कुणाला पाळायला निघालो
माझ्याच रे निसर्गा जाण्यास मी निघालो’

बालपणीच्या फुलपाखरासारख्या आठवणींनी मन जेव्हा मोरपीसासारखे हलके होते तेव्हा डॉक्टर ‘मन झाले मोरपीस’ हा लेख लिहून जातात. सांगलीतील पंचवीस वर्षांपूवीर्चं घर, शेजारी, हायस्कूल अशा सर्व जागा पाहताना त्यांचं मन श्रावणातल्या आकाशासारखं भरुन येतं. आपण बदललो याचं त्यांना दु:ख होतं. हा बदल अपेक्षित

असला तरी त्यातून येणारा रुक्षपणा त्यांना नकोसा वाटतो. पासष्ट वर्षांचे नांदगावकर आजोबा, जीव तोडून शिकविणारे इंग्रजीचे सर, वृद्ध, कडक मालक आणि व्यक्तींशी संबंधित आठवणीत डॉक्टर मनापासून रमतात. तेथील तीन खोल्यांचं घरही तेव्हा त्यांना मोठं वाटत असते. आता त्या घरातून फिरताना सारं बालपण अश्रूंच्या रुपानं डोळ्यातून ओसंडतं. शेवटी ते लिहितात. 'तेव्हा मी छोट्या घरात राहणारा मोठा माणूस होतो आणि आता मी मोठ्या घरात राहणारा छोटा माणूस आहे.'

वसंत ऋतुतल्या बदलत्या उल्हासित निसर्गाप्रमाणेच मनातूनही समुद्राला भरती आल्याप्रमाणे काहीतरी भरभरुन वहायला लागतं आणि नसानसातून एक संगीत निर्माण व्हायला लागतं. हा अनुभव वसंत ऋतुतला, ज्याचा आस्वाद घ्यायला मन असं आसुसतं याचं वर्णन 'वसंत' या ललितलेखात आलं आहे. एकीकडे वसंत खुणावत असतो तर दुसरीकडे व्यावहारिक अडचणींपुढे डॉक्टर वसंतापर्यन्त पोचू शकत नाही. त्यातच मनातला संघर्ष इतका पराकोटीला पोचतो की, मनाचे जणू रणांगणच होते आणि डॉक्टरांची अवस्था अर्जुनासारखी होते. ही अस्वस्थता संपवून वसंताशी मुक्त भेट घेण्यास ते उत्सुक आहेत.

निसर्गाप्रमाणेच लेखकाला पक्षी व प्राणी यांचेही वेड आहे. चिमणी हा त्यांचा आवडता पक्षी असावा असे वाटते कारण अनेक ठिकाणी तिचा वावर आहे. पण मोर मात्र त्यांच्या आत्म्यालाच भिडतो. मोर पाहिला की विचार थांबतात आणि या जगातील सर्व गोष्टींपासून तो तुम्हाला दूर कुठंतरी नेतो असे त्यांना वाटते. त्यांच्या अंगणात नित्यनेमाणे दाणे टिपायला येणारा मोर, त्याच्याविषयी वाटणारा जिव्हाळा आणि मोराचा झालेला दुर्दैवी अंत. हे सारे आपल्यालाही चटका लावून जाते.

'यादव सरकार' ही एक अशी व्यक्तीरेखा आहे की, त्यांच्या सहवासात डॉक्टरांना शांती आणि समाधान लाभते. त्यांच्या वागण्यात, बोलण्यात आणि जगण्यातही यादव सरकार डोकावू लागतात. एवढेच नव्हे तर 'माझ्या अस्वस्थतेत आणि स्वस्थतेतही सरकार डोकावताना दिसू लागले' असे डॉक्टर म्हणतात. साऱ्यांना आयुष्य व पैसा वाटत असलेल्या यादव सरकारांच्या सहवासात विस्कटलेलं मन शांत करण्यास डॉक्टर जात असत. यादव सरकारांकडून मिळालेला माससिक आधार त्यांचे जीवन समृद्ध करतो.

डॉक्टरांच्या मनामध्ये जे अनेक संघर्ष चालू आहेत त्यांना शांत करण्यासाठी त्यांना अनेकदा एकांतवास हवासा वाटतो. तो त्यांना, कण्हेरी मठात, महाराजांच्या सहवासात मिळतो. 'शेंगा' या लेखात स्वत:शीच चाललेल्या झगड्याची तीव्रता कमी करण्यास महाराजांच्या सान्निध्यात ते राहातात. 'तुम्ही स्वत:चं काही एक दु:ख न सांगता आमचं ऐकता म्हणून आम्ही तुमच्याकडे येतो' अशी कबुलीही ते देतात. मठातून निघताना पत्नी आणि मुलांना आवडणाऱ्या शेंगांचं अर्ध ठिकं जेव्हां त्यांच्या गाडीत ठेवलं जातं, तेव्हां त्यांच्या मनात कृतज्ञता दाटते. महाराजांच्या 'वेगळ्या' दुनियेचा निरोप घेताना महाराजांचं एक वाक्य त्यांना आठवत रहातं. 'तुमच्याकडं स्वार्थाचं राज्य चालतं तर इथं त्यागाचं.'

रोजच्या जीवनात जेंव्हा तोच तो पणा जाणवू लागतो तेव्हा मनुष्याला काहीतरी बदल हवासा वाटू लागतो. कोंडलेल्या मनाला आण शरीराला मुक्त स्वच्छंदी हवेत विहरावं असं वाटू लागतं. असं एखादं जिव्हाळ्याचं ठिकाण की, जे स्त्रियांच्या माहेरासारखं असावं. डॉक्टरांचं हे 'माहेर' म्हणजे आप्पांचा मळा. जिथे शहरासारखं धावावं लागत नाही तर शांत बसलं तरी जगता येतं. आप्पांच्या मळ्यात डॉक्टरांना माहेरची सावली मिळते. निसर्गाच्या प्रफुल्लित वातावरणात आणि खारी चिमण्यांच्या सहवासात डॉक्टरांचा रोम रोम पुलकित होतो. त्यांना खऱ्या अर्थाने 'माहेर' भेटलं.

लेखकाच्या मनातील अनेक पातळ्यांवरचा संघर्ष या संग्रहातील शेवटच्या 'भूमिका' या लेखातून प्रकट झाला आहे. त्यांच्या लेखनामागची भूमिकाच यातून स्पष्ट झाली आहे. स्वत:ला व्यक्त करणं ही डॉक्टरांची गरज आहे. सर्व भौतिक सुखे प्राप्त होऊनही त्यांच्या मनाला एकटेपणाची जी ओढ आहे. त्या ओढीतून त्यांची लेखननिर्मिती झाली आहे. स्वत:च्या मनातील द्वंद्व, संघर्ष, बरे-वाईट, विचार, भाव - भावना यांना लेखनातून मूर्त स्वरुप दिल्यावर ते मोकळे होतात. ही त्यांची अभिव्यक्ती प्रामाणिक ठरते.

अतिशय सोप्या भाषेत, सोप्या पद्धतीने, व्यवहारातील विषयांवर सहजसुंदर लिहिलेले असे हे लेख आहेत. त्यात कुठेही, अभिनिवेश, कृत्रिमता आणि क्लिष्टता नाही. वैद्यकिय क्षेत्रातील एका कवीमनाच्या व्यक्तीचे लिहीण्याच्या आंतरिक उमाळ्यातून प्रकटेलेले हे लेखन आहे. त्याचा आस्वादही स्वच्छ, मोकळ्या मनाने घ्यावा.

गौरी भोसले

● ● ●

संजिवानाचे रस्ते चोखाळणारे 'रस्ते मनातले'

मानवी शरीराची नादुरुस्ती, दोष आणि वेदना दूर करण्याचा सर्जरीचा व्यवसाय अत्यंत कुशलतेने करणारे कोल्हापूरचे ख्यातनाम डॉ. पी.जी. कुलकर्णी यांच्याकडे एक समृद्ध, हळुवार आणि सृजनशील मन आहे. याची प्रचिती देणारे 'रस्ते मनातले' हे त्यांचे तिसरे पुस्तक. यापूर्वी 'लेपर' आणि माझा स्वर्गवास हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. पैकी 'माझा स्वर्गवास' या कथासंग्रहास महाराष्ट्र सरकारचा पुरस्कार मिळाला. त्यांची निर्मिती गुणवत्तेच्या बाबतीतही श्रेष्ठतर आहे. याचीच ही पावती म्हणावे लागते.

'रस्ते मनातले' असे काव्यात्म शीर्षक घेऊन आलेले डॉ. पी.जी. कुलकर्णी यांचं पुस्तक म्हणजे मुग्धतेची प्रचिती देणारा ललितलेख संग्रह आहे. मराठी साहित्यात ललितगद्य लेखनाचे स्वरुप बदलतेय. त्यास अंतर्बाह्य काव्यात्म तरलतता आणि आशय घनता आलेली आहे. कथा आणि काव्याप्रमाणे ललित लेखनही मुग्ध अनुभव देणारा भावतरल साहित्यविभ्रम आहे. वि.वा शिरवाडकर, इंदिरा संत, दुर्गा भागवत, श्री निवास कुलकर्णी, विश्राम बेडेकर, इत्यादी मातब्बरांनी ललितलेखनाच्या दालनाला वजनदारपणा आणला. या संदर्भात आणखीही नामोल्लेख करता येईल. तात्पर्य मुक्तचिंतनाच्या अंगाने, काव्याला छटा आविष्कारत आज मराठीतील ललितलेखन बहरते आहे. गद्य स्वरुप परंतु काव्यसदृश अशा आत्मविष्कार करण्यात डॉ. पी.जी. कुलकर्णीही यशस्वी झाले आहेत.

यांत्रिक जीवन, व्यावसायिक ताण आणि तोच तोपणा यातून बाजूला जाऊन हवे तेथे, हवे तसे जगण्याची ऊर्मी येणे हा काव्यात्म बंडखोरपणा डॉक्टरांनी केला. स्वत:मधील आणि इतरांमधील माणूसपणाचे आत्मसूत्र जपण्याचा हळुवारपणा डॉक्टर करतात. त्याचबरोबर स्वत:मधील माणूसपण जगण्याचा फुलविण्याचा एक आत्ममग्न प्रयत्न ते करतात. हे असे का व्हावे? या ललितलेखांचा आस्वाद घेताना हे सहजपणे जाणवते की, या माणसाच्या मनात एक 'जिस्पी' लपलेला आहे. तो तरलवृत्तीच्या माणसाला अवघ्या निसर्गाशी सहकंप साधण्याची अनुभूती देतो, तत्पूर्वी तो अस्वस्थता देतो. तद्नंतर काही काळची तृप्ती देतो. व्यावसायिक ताणाच्या जबरदस्त धुसमटीतून डॉक्टरांच्या 'जिप्सी' वृत्तीनेच त्यांना महाबळेश्वरच्या निसर्गरम्य परीसरात भारावल्यासारखे नेले. स्वाभाविक ओढ वाटावी. असे प्रसंग, पुन:प्रत्ययाचा आनंद देणाऱ्या अनुभूती आणि अळवार भावस्थिती यामुळे वाचक मनाला मुग्धता येते.

प्रौढत्वे निजशैशवास जपणे बाणा कवीचा असे या वचनातील पौढढत्व केवळ वयाचं अनुभवाचं नाही; तर ते जाणतेपणाचं अधिक्यानं असतं, अशी लेखकाची जाणती 'निरागसता' या ललित लेखनाच्या ताटव्या ताटव्यातून जाणवत राहते. डॉ. पी.जी. कुलकर्णी जात्याच कवी आहेत. या ललित लेखनातही अत्यंत स्वाभाविकतेने काही कविता आलेल्या आहेत. लेखकाची भावतरलता न राहवून अशी काव्यात्म रुप घेताना दिसते. लेखकाला 'विसरण्याची' आस आहे. मात्र आत्मबधिरता म्हणून नव्हे, विरक्ती म्हणून! यश, समृद्धी किर्ती यांनी क्लयांकित असणाऱ्या डॉक्टरांच्या जीवनात तृप्ती मात्र विरक्तीच्या उंबरठ्यावर बसून हसावी हे विलक्षणच.

ललितलेखन म्हणजे लेखकाचा मुक्त आत्माविष्कार, त्याला आत्मचरित्राचा मृदगंध येतोच त्यानुषंगाने काही व्यक्तिचित्रेही त्यामध्ये डोकावतात, बालपणातील आठवणी, शाळेतील दिवस, मामाचा गाव, गावाचे रस्ते, वाट पाहणारी आई, आईच्या आठवणींनी, गावतराळ होणारे लेखकाचे मन. 'मन झाले मोरपीस' मधील हळुवार आठवणी, सुंदर पिसारा फुलवतात. वेगळ्या जगात नेतात.

लेखक सर्वार्थांनी भाग्यवान, बालपणात सुंदर निसर्गाची आणि जीवाभावाच्या माणसांची साथ मिळली. लेखकाचे अनुभवविश्व समृद्ध होताना व्यक्तीगत्वाचीही जडण-घडण झाली. आवडी-निवडी ठरुन गेल्या. नकळत जीवन समृद्ध करणारी विलक्षण ताकदीचं माणसं त्यांना भेटली. यादव सरकार हे अफलातून व्यक्तिमत्त्व. लेखकाप्रमाणे वाचकांच्या मनाचाही कब्जा घेणारे. अंतर्मुख करणारे. विरक्ती जागविणारे. कण्हेरी मठ आणि तेथील वयोवृद्ध-तपोवृद्ध स्वामी हेही लेखकाच्या अंतर्मनाचा गाभारा मंत्रमुग्ध करणारे. वयोवृद्ध माणसे, वेड लावणारा निसर्ग, जीवनानुभातून येणारी जाणती 'विरक्तीची उर्मी' या लेखकाच्या सौंदर्यवादी मनाच्या नम्र आणि भावुक खुणा आहेत. ज्या व्यावहारिकयुगात दुर्मिळ होत चालल्या आहेत.

आजच्या अशाश्वत, असुरक्षित, अस्वस्थ, असुंदर आणि अतृप्त अशा जगात मोकळा श्वास घ्यायला व अवघडले नि:श्वास सोडायला विशुद्ध मनाची जिव्हाळ्याची माणसं असावी लागतात. या संदर्भात लेखक आईच्या आठवणींने अनेकदा भावुक-हळवे होतात. त्यांच्या व्यक्तिवातील 'बालक' अस्वस्थ, भाबडे आणि प्रेमाचे भुकलेच आहे. आपली तगमग न सांगता समजून घेणारी आई त्यांना पुन्हा पुन्हा आठवत राहते. 'तिला कळायची माझी तगमग' तशी तगमग कळणारी माणसं आयुष्यात पुन्हा भेटत नाहीत. ती माणसं फक्त या असल्या रसत्यावर भेटतात. सासुरवाशींनींणा हक्काचं माहेर असतं. तसं व्यावहारिक जगाच्या सासुरवासाने उबगलेल्या पुरुषांना जिव्हाळ्याच्या

मित्राचं जग असतं, हे गोडगुपित लेखकाच्या हाती लागलेलं आहे, वेंगरुळच्या आप्पांच्या शेतावर मनमुक्त वास्तव्य केल्यानंतर ! तेथील किलबिलणारे पक्षी, झाडाच्या खोडावर मुक्तपणे वरखाली तुरतुरणारी खार तेथे येऊन थंडतृप्त होणारे वाटसरु, थंड, निव्वळ शंख पाण्याने तृप्त तुडुंबलेली विहिर यांचा निसर्गरम्य अनुभव घेतल्यानंतर !

सुसंस्कृत, समृद्ध, वत्सल्य जीवन जगणाऱ्या संसारी माणसाला घर प्रपंचाची, मुला-माणसांची ओढ असते. प्रेम असते. तरीही निर्वाहाच्या कार्यकर्तव्याचे जंजाळ त्यात उबग आणते. विरक्तीची उर्मी आणते. काही काळाचे ते झपाटलेपण असते. नव्या उमेदीने, नव्या उत्साहाने जीवनावर आससून प्रेम करायला लावणारे ते संजिवन असते. 'रस्ते मनातले' असे काव्यात्मक शीर्षक घेऊन आलेले हे या ललित पुस्तकातील लेख नकळत व्यावहारिक जीवनात उबगलेल्या जीवनात संजिवनाचे रस्ते सुचवितात.

लेखकाची भावुकता आणि विदग्ध विचार सौंदर्याची प्रचिती या मनातल्या रस्त्यारसत्यात येत राहते. निसर्गसुत्राशी एकरुप होऊन सुसंवाद करणारे आत्मसुत्र अनेकांच्या दु:खवेदनेचे प्याले पचविताना - रिचविताना त्यांचा भाऊ गर्दीतून मुक्त श्वास घेण्याची उर्मी येऊन लेखक 'एकटा' होतो-राहतो. निसर्गाचा मुक्त-मनसोक्त सहवास देशपेक्षा मनाचा शीण-आत्मकोंडी दूर करतो. लेखकाच्या मनातील हे रस्ते आठवणींचे आहेत. त्यात प्रसंग आहेत. व्यक्तीरेखा आहे. मनमुक्त करणारा निसर्ग आहे. त्यामुळे लेखकाच्या मनातील रस्त्याला कळत नकळत वाचकांच्या मनाचे रस्तेही मिळून जातात.

प्रा. डॉ. सौ. नलिनी महाडिक

●●●

गतस्मरणरंजनतेची विविध रुपे : रस्ते मनातले
– डॉ. रणधीर शिंदे

'रस्ते मनातले' हा डॉ. पी. जी. कुलकर्णी यांचा ललितगद्य संग्रह. अलकिडेच या संग्रहाची नवीन आवृत्ती प्रसिद्ध झाली आहे. प्रस्तुत टिपणात या संग्रहातील काही विशेषांचा विचार केला आहे. अलिकडील काळात ललितगद्य या प्रकारातील लेखन मोठ्या प्रमाणशत प्रसिद्ध होत आहे. 'स्व' चा मुक्त अविष्कार करणे ललितगद्य लेखकाला महत्त्वाचे वाटते. मराठीमध्ये इरावती कर्वे, श्रीनिवास कुलकर्णी, अनिल अवचट व प्रकाश संत यांचे ललितगद्य लेखन लक्षवेधक व आगळेवेगळे ठरले आहे.

मराठी ललितगद्याचा एक प्रमुख विशेष म्हणजे या गद्यशैलीतून प्रकटणारी गतस्मरणे. ललितगद्यातून मोठ्या प्रमाणात गतकालीन जीवनाबद्दलचे, आठवणींचे दर्शन घडविले आहे. गतकाळात रममाण होणे ही एक मानवी सहजप्रवृत्ती या (Nostolgia) ची ओढ ललितगद्य लेखकांना मोठ्या प्रमाणात आहे. प्रस्तुत 'रस्ते मनातले' या संग्रहातूनही गतस्मरणरंजनतेची विविध रुपे साकार झाली आहेत. पूर्वकालीन आठवणी, रम्य बालपण व नाहीशी होत असलेली जीवनशैली यासंबंधीचा आत्मविष्कार या ललितगद्यातून घडला आहे.

संग्रहातील पहिल्याच 'रस्ते मनातले' या ललित लेखनातून बालपणीच्या रम्य आठवणी व्यक्त झाल्या आहेत. निवेदकाच्या मनातील विविध गतकालीन रस्त्यासंबंधीचे निवेदन या लेखात आले आहे. वसगडे, तासगाव, खरसुंडी व जत येथील रस्त्यांशी त्याचे भावपूर्ण नाते जडले आहे. बालपणातील हे रस्ते त्याला तीव्रतेने आठवतात. निवेदकाची घडण व या रस्त्यांसोबत झाली आहे. तो वर्तमानात जेव्हा हे रस्ते पाहतो तेव्हा साऱ्या आठवणी गोळा होऊन येतात. मन भरुन येतं. त्याच्या बालपणातील आठवणींना जोडणारा दुवा हा रस्ता असतो. त्याला या रस्त्यांचा सजीव, चैतन्यदायी प्रत्यय आलेला आहे. या रस्त्यावर त्याच्या बालपणीच्या अनेक आठवणी सांडल्या आहेत. याचे स्मरण या लेखातून आविष्कृत झाले आहे. 'मन झाले मोरपीस' या लेखातही निवेदकाचे स्मरणरंजन प्रकट झाले आहे. निवेदक वर्तमानातून पंचवीस वर्षापूर्वीच्या आपल्या गावाकडे पाहतो आहे. त्याला तो काळ एकदम आठवू लागतो. त्याचे मन आपोआप मागे जात राहाते. या आठवणी त्याला फुलपाखरासारख्या, फुलासांरख्या डोलणाऱ्या वाटतात. निवेदकाच्या मनात बालपणीच्या स्मृतींच्या इमारती शाबूत आहेत. बालपणीचे हे भावसंचित, रम्य भुतकाळ, मोहक व मधुर जीवन यासंबंधीची विविध रुपे या संग्रहातून साकार झाली आहेत. निवेदकाने आपल्या स्मरणरंजनातून बालपणीचा काळ सजीव केला आहे.

वर्तमानातील भौतिक शास्त्रांनी समृद्ध असलेले शहरी जीवन व निसर्गाच्या सान्निध्यात मनाला होणारा आत्मीय स्वरुपाचा आनंद या द्वंद्वात हा निवेदक अडकला आहे. शहर आणि खेडे, स्वार्थ आणि त्याग, भौतिक साधनांची विपुलता आणि विरक्ती यातील द्वंद्व, संघर्ष या ललितगद्यातून साकारलेले संग्रहातील 'दहा दिवस' हा दिर्घलेख याच जाणिवेचे संसूचन करतो. यातील 'मी' शहरातील भौतिक लिप्ताळ्यापासून, मोहापासून दूर जाऊन महाबळेश्वरला जाऊन आत्मीक आनंद मिळविण्याचा प्रयत्न करतो. या दहा दिवसांची त्याची दिनचर्या या लेखातून मांडली आहे. हे शहरी मन दहा दिवस निसर्गाच्या सान्निध्यात राहते आहे. हा अनुभव त्याला आध्यात्मिक स्वरुपाचा व आत्मिक उन्नती देणारा वाटला. 'स्व'चा व भवतालाचा विसर होऊन तो तरल अशा गुढ अनुभवाचा साक्षीदार होतो. महाबळेश्वरातील संपन्न गर्द हिरवाईने नटलेला निसर्ग, लोकजीवन, स्वच्छंद भटकंती, पक्ष्यांचा कलकलाट, चांदण्याने डबडबलेले आकाश या साऱ्यांचा त्याला उत्कटत्वाने अनुभव येतो. या काळातील त्याचा तेथील वावर हा स्वच्छंदी पक्ष्यांसारखा होता. तेथील पर्यावरणात राहिल्याने आपल्यातील शारीरीक मानसिक व आत्मिक सामर्थ्य वाढीस लागले आहे. असे त्याला वाटते. 'यादव सरकार' व 'शेंगा' या लेखातूनही हा संघर्ष प्रकट झाला आहे. 'यादव सरकार' या व्यक्तीचित्रणात्मक लेखातून अनाहूत भेटलेल्या व्यक्तीची उत्कट, भावस्पर्शी कहाणी व्यक्त झाली आहे. आजचा माणूस आतून दुभंगलेला आहे, उखडलेला आहे तो अधिकाअधिक एकाकी होत चालला आहे. याचे प्रकटीकरण या लेखातून होते.

कृत्रिम असे उबवलेले शहरातील जग आणि या जगाला छेद देऊन निरायम आनंद देणारे पशुपक्ष्यांचे जग या गद्यलेखनातून साकारले आहे. 'वसंत', 'मोर' या लेखातून पशूपक्षांचे व 'मी' चे भावविश्व उभे राहते. वसंत ऋतुचे वैभव व समृद्धीनीही 'मी' च्या मनाला वेड लावले आहे. या मनाला व्यावसायिक जीवनातील धावपळीमुळे निसर्गसृष्टीचे सौंदर्यग्रहण करता येत नाही याची खंत आहे. 'मोर' या लेखातून मोराची विविध आल्हाददायक रुपे, त्यांचे सौंदर्य व वेगळेपण अभिव्यक्त झाले आहे. शिवाय परदेशस्थ निसर्गानुभव हा कसा चैतन्यरहित असतो. सतत नुसता बर्फ. त्यामुळे येथील वातावरण कमालीचे थंड, गोठलेपण असणारे. तर इथला निसर्ग मात्र विविध आवाजांनी पक्षांनी, माणसांनी लदबदलेला जिवंत, चैतन्यदायी याचे संसुचन हा 'मी' करतो. अशाप्रकारच्या विविध गतस्मरणांनी 'मी' चा अनुभव वेधक अशा गद्य शैलीतून साकारला आहे. ही शैली विशिष्ट भाविक संकेत वापरुन उत्कट काव्यात्मतेचा प्रत्यय घडवून आणते. उदा. 'बाहेर रातकिड्यांचा आवाज, अंगणातील फुलझाडं मात्र बहरलेली. ती चंद्राच्या प्रकाशात स्पष्ट दिसत होती. कुठल्याही प्रकारचा आवाज नव्हता पक्षीही झोपलेले असावेत. उन्हाळ्यातला गार वारा. आकाश स्वच्छ. निरभ्र चांदण्याची नुसती बरसात. झुंबर लावल्यासारखे तारे आकाशाला लटकलेले. मन शांत शांत होत

चाललेलं.' एका बाजूला कसलाही आवाज नसणे, स्वच्छता, पक्षांचे झोपणे, निरभ्रता व शांतता तर दुसऱ्या बाजूला बहरलेपण, रातकिड्यांचा आवाज, चांदण्याचे बरसणे, झुंबराचे लटकणे अशा विरोधद्वंद्वांतून एक उत्कट, काव्यात्म लय साकार होते. या काव्यात्म, संमोहक लयीतून समृद्धीचे, साफल्याचे, शांततेचे सूचन होते. उपरोक्त विशेषांनी 'रस्ते मनातले' मधील जीवनानुभव साकारला आहे. या ललित गद्यातून प्राधान्याने 'मी'च्या मनातील गतकालीन भावसंचित आविष्कृत झाले आहे. गतकालीन स्मरणरंजनतेचा विविधांगी आविष्कार या ललितगद्यामधून घडला आहे.

●●●

रस्ते मनातले

पुस्तक परिक्षण **मुकुंद वि. कुलकर्णी**

'रस्ते मनातले' हा कोल्हापूरच्या डॉ. पी. जी. कुलकर्णी यांचं तिसरं पुस्तकं! आपल्या वैद्यकिय व्यवसायातील अनुभवांचे चित्रण असणारा पहिला 'लेपर' हा कथासंग्रह तर 'माझा स्वर्गवास' चे सविस्तर परिक्षण. दै महासत्ताच्या आणि आनंदाची योगयोगाची घटना म्हणजे लगेचच महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार त्या पुस्तकास जाहीर झाला. डॉ. पी. जी. कुलकर्णी यांच्या आजपर्यंतच्या लेखनातून ते जसे हाडाचे डॉक्टर (अस्थिरोग तज्ञ) आहेत तसेच 'हाडाचे लेखक' ही आहेत हेच दिसून आलेले आहे.

पहिल्या दोन कथा संग्रहापेक्षा 'रस्ते मनातले' चे स्वरुप वेगळे आहे. मनमोकळेपणाने, अत्यंत लालित्यपूर्ण असे हे लेखन आहे. यात लेखकाचे बालपण, त्यावेळचे सवंगडी, आई-वडील, बहीण, भाऊ, नातलग त्यांची ओसंडून वाहणारी माया, अशा स्वरुपाचा आत्मवृत्ताचा भाग चिंतन आहे. निसर्गाची ओढ आहे आणि काव्याची फुलबाग आहे.

कागलचे 'झोवी' 'नांगरणी' कार प्रा. आनंद यादव, 'कोर डी भिक्षा' मागणारे श्रीनिवास कुलकर्णी, 'कंदिलाचे उजेड' चे प्रा. वसंत केशव पाटील, ही औदुंबर अंकलखोपची लेखक स्नेह मंडळी, त्यांच्या लेखनामुळे वाचकांना आपलीच वाटतात. तसेच डॉ. पी.जी. च्या रस्ते मनांतले मुळे वाचकांना आपल्याच मनातले हे रस्ते आहेत असे वाटल्यावाचून राहणार नाही.

माणसाला प्रिय असते ते त्याचे आजोळ! आजोळाला जाण्याची ओढ, आजोबा-आजी, मामा-मामींचे प्रेम, मामाचा चिरेबंदी वाडा, सुगरण मामी म्हणूच 'मामाच्या गावाला जावू या' असे प्रत्येकालाच वाटत असते, तसे वाटण्यासारखे आजोळ भाग्यवान लेखकाला लाभले आहे, त्याचे नितांत सुंदर चित्रण 'रस्ते मनातले' रस्ता, त्या रस्त्यावरच्या असंख्य आठवणी, खरसुंडी तेथील जुनी मंदिरे, बालवाडीत कलेक्टर येणार म्हणून उडालेली धांदल, तासगांवच्या राजवाड्यातून गणपती मंदिराकडे जाणारा रस्ता, सिद्धेश्वर, हटकेश्वर मंदिर. काशी विश्वेश्वर मंदिराकडे जाणारा मोठा श्रीमंत लोकांचा रस्ता, जत गावातील रस्ता हे सर्व रस्ते मनात जागे होतात. अन् लेखकातला कवी जागा होऊन लिहून जातो.

'या रस्त्यावरुन जेव्हा मन होते विखरुन गेले त्या रस्त्यावरुनी आता कण कण मी वेचित आहे.'

मानसिक, शारिरीक आणि आत्मिक बळ वाढविण्यासाठी निसर्गाचाच एक भाग बनून गत आयुष्याकडे परिक्षकाच्या भुमिकेतून पहाण्याचा निर्णय करुन लेखक दहा दिवस महाबळेश्वर येथील श्री काडसिद्धेश्वर महाराजांच्या मठात राहण्याचे ठरवून तिथे राहतो. तिथले निसर्गरम्य वातावरण, त्याचा लेखकावर होणारा परिणाम वाचत असताना वाचक एका वेगळ्याच आनंदाची अनुभुती घेतो. लेखकाला पशु-पशी, त्यांचे आवाज, आकाश, चांदण्या, झाडे, डोंगर, चंद्र, सूर्य या सर्वाविषयी आकर्षण आहे. एक जीर्ण मंदिर पाहून लेखक लिहीतो-

'खरं सांगू उध्वस्त मंदिरा
आजचा माणूस सुद्धा तुझ्या सारखाच
दुंभगलेला आहे, उखडलेला आहे.
तुझ्यापेक्षा जास्त एकाकी आहे '

'जसे पाण्याने डोळे डबडबावेत तसे चांदण्यानं आकाश डबडबलं होतं' अशी सुरेख वाक्यं जागोजागी भेटतात.

'लहानपणी छोट्या घरात राहणारा मोठा माणूस होतो आणि आता मोठ्या घरात राहणारा छोटा माणूस कसा हे' 'मन झाले मोरपिस' मध्ये कळते.

'मोर' कथेतून सोनूने आईला विचारलेला 'आई,कुत्री आणि माणसं यात काहीच फरक नाही कां गं?' हा प्रश्न अस्वस्थ करणारा, विचार करावयास लावणारा नाही का?

कण्हेरी मठाचे स्वामी हे लेखकाचे श्रद्धास्थान! त्यांच्या सहवासात मनात उडालेला गोंधळ नाहीसा होऊन मत शांत होते. महाराजांच्यकडे त्यागाचं राज्य कसं चालतं ह्यांचा अनुभव लेखक घेतो व 'प्रसाद' म्हणून मिळालेल्या शेंगा यांचे वर्णन 'शेंगा कथेत येते' 'यादव सरकार' हे या ललित संग्रहातील लक्षात राहणारे व्यक्तिचित्र त्यांच्या सहवासाबाबत लिहिताना डॉ. पी. जी. कुलकर्णी लिहतीत. 'नदीनं समुद्राला मिळावं तसा मी सरकारांनां मिळत होतो. सरकार माझ्यातलं उसळतेपण आणि अस्थिरपण शांतपणे स्थिर करत होते. पाचशे रुपयांवर जगणारा एक फकिर लाखो रुपयांची उलाढाल करणाऱ्या एका डॉक्टराला श्रीमंत करुन जात होता.'

संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक मराठीतील ज्येष्ठ समिक्षक आणि संशोधक प्रा. डॉ. वसंत जोशी यांची परिचयात्मक प्रस्तावना 'रस्ते मनातले' ला लाभली आहे.

गांव आणि निसर्गाशी नाळ जोडणारी साहित्यकृती 'रस्ते मनातले'

– डॉ. पी. जी. कुलकर्णी

वैद्यकिय क्षेत्र आणि संवेदनशिल ललित लेखन एकाच व्यक्तिकडून होणे हा एक दुर्मिळ योगायोगच... डॉ. पी. जी. कुलकर्णी यांच्यात अनेकविध सुप्त गुण आहेत त्यात लेखक म्हणून त्यांचे लेखन निसर्ग आणि माणूस यांच्या भावनिक संबंधातून निर्माण होणारे अविश्वाकाराचे प्रतिबिंब आहे.

आईच्या उदरातून मानवी रस्त्याची सुरुवात होत असते तेथून एक बार जीवित मानसाची नाळ तुटते पुन्हा ती गेल्यावर दुसऱ्यांदा तुटते ही जाणीव मात्र आत्मचिंतन करणाऱ्या संवेदनशिल माणसाला राहते. तो जगण्यातील जगणे जाणत असतो. स्वत:च्या पायवर आणि आप्त स्वकीयांच्या जिव्हाळाच्या आधाराने चालण्याचा रस्ता तासगांव पासून सुरु होतो पुढे त्यास अनेक छोटे-मोठे-महामोठे फाटे फुटतात अनंत असे अनेक....! काहीसे आनंददायी तर काहीसे वेदनाभरीत ऽऽऽ...! मामाच्या घराकडचा रस्ता, मामाच्या अंत:करणातील लेखकापर्यंतचा रस्ता-आई-मामी-भावंडं...हे आणि इतर रस्त्यांनी जोडलेलं हे विश्व लेखकास नेहमीच भानावर आणतं, बालपणीच्या भावविश्वात नेत... सुखद काहीसं जड अंत:करणानं. विदेशातील अनेक विशाल रस्ते लेखकाने अनुभवले आहेत. कधी कधी रस्त्यांचे फाटे वर्तमानात निष्क्रीय होतात आणि लेखक काहीसा 'उपरा' होतो.

''मामी गरम भाकरी देशील?''

''हो, राहशील ना आजं?''

''कुठला राहतो मामी, व्याप फार वाढलाय, मामाची खूप आठवण होते गं इकडे आल्यावर. '' मामा आई इतकच प्रेम करायचा खरसुंडीच्या रस्त्यावरच्या आठवणी बरोबर पाटलाचा वाडा तेथील जिव्हाळा, महाबळेश्वरमधील काडसिद्धेश्वर महाराजांचा मठ आणि निसर्गातील अफाट प्रेमाची माया असं किती म्हणून विसरताना लेखक मनावर दगड ठेवतो. ते पक्षी, त्यावेळी तो सूर्य, ती कोकीळा यांच्या सानिध्यात लेखक स्वत:लाच शोधतो, झाडांच्या सावलीत आणि निसर्गाच्या मिठीत लेखक स्वत:हा विसरतो आणि स्वत:च निसर्गातील एक दवबिंदू होतो.

मन झाले मोरपीसमधील आई, गुरुजी, इंग्रजीचे कुलकर्णी सर यांचे जीव तोडून शिकवणे न विसर पडणारे. नांदगावच्या आजोबाशी बुद्धिबळाचा डाव... छे औरच.

मोराच्या आठवणीत सोनू अजूनही तेवढाच वाटत असावा दाणे टाकणाऱ्या सोनूच्या मोराची शिकार ''आई कुत्री आणि माणसं यात काहीच फरक नाही का गं?'' या प्रश्नाने गर्भगळीत झालेले लेखक निशब्द होतात...

यादव सरकारांचे वैरागी जीवन आणि त्यांचे माणसाबरोबर वृक्षावरील प्रेम अशा प्रेमळ माणसाच्या अस्थी उचलण्याचा प्रसंग लेखकाच्या रस्त्याची सिमा काहीसी पुसट करतात उजाड माळावर फळबागा फुलवून पक्षी त्यात संसार करू देत हीच यादव सरकारांना श्रद्धांजली ही भावनिकता लेखकांच्या काळजात सतत असते.. लेखकास अजूनही वाटतं कुणीतरी कुदळ मारुळ धरणीतील रताळं खायला द्यावी... काहीकाळाकरीता असेना लेखक जगण्यातील जिवंतपणा 'रस्ते मनातले' मध्ये अनुभवतो.

डॉ. बी. एस्. घाटगे
आर. के. नगर, कोल्हापूर.

●●●

भालचंद्र नेमाडे
दहिसर पश्चिम,
मुंबई – ६८
६ एप्रिल २००२

प्रिय डॉ. पी.जी.
सप्रेम नमस्कार

तुमचा रस्ते मनातले हा संग्रह नुकताच वाचून झाल्यामुळे झालेला आनंद मुद्दाम पत्र लिहून कळवीत आहे. तुमचे मन फार संस्कारक्षम आहे. परंतु बारीक बारीक लघु निबंध, लघुकथा असा फॉर्म त्याला योग्य बसत नाही. जरा प्रदिर्घ आशयसुत्र मनात घोळवून सलग काहीतरी लिहायचे ठरवा म्हणजे मला आनंदाने वाचावेसे वाटेल. ह्या पुस्तकात सुद्धा सलग ३–४ निबधांची एक दिर्घ कथा म्हणून जाणवतेच. दीर्घकाळ मनात हे सर्व विषय घोळवले असते तर मोठे आशयसुत्र निर्माण झाले असते. असो, असेच उत्तम लिहीत राहा.

आपला,
भालचंद्र नेमाडे

प्रिय, डॉ. प्रकाश यांना
सप्रेम नमस्कार

तुमचे पुस्तक दोनदा वाचून काढले. तुमची पूर्वीची पुस्तकेही मी वाचली होती. पण या पुस्तकाचा बाज व धाटणी पुर्वीच्या पुस्तकांपेक्षा वेगळी आहे. या पुस्तकात तुमच्यातील लेखक आत्मचिंतनाच्या शोधात आहे. तुम्ही जी काही व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत ती खरोखरच हृद्य आहेत. पुस्तक फारच छान झाले आहे. परंतु राहून राहून मनात विचार येतो की तुम्हाला सर्व ऐहिक सुखसोयी असताना तुम्ही असे अशांत का?

तुमच्या मिसेस, तुमची मुले, तुम्हाला मिळालेले यश हे कौतुकास्पद आहे. तरीपण तुम्ही असमाधानी कां? हा मला विचार पडतो. नुसत्या ऐहिक सुखावरच समाधान मिळते असे नसले तरीही याही गोष्टी उपलब्ध असतांना मनाचे संतुलन साधता येते. कसे ते तुम्हीच शोधायचे आहे.

याबाबतीत मी तुमच्याशी समक्ष अधिक बोलीनच तोपर्यंत माझ्या तुम्हाला सर्व शुभेच्छा...!

आपला न्रम
डॉ.अरविंद बावडेकर
मुंबई

प्रिय, डॉ. प्रकाश यांना

सप्रेम नमस्कार

या ना त्या कारणाने आपले ‘रस्ते मनातले’ हे पुस्तक वाचायला विलंब झाला. आजच ते वाचून संपविले. आपले पुस्तक मला आवडले.

आपल्याला लहानपणापासून जे अनुभव आले त्यावर सतत चिंतन करीत करीत आपले व्यक्तिमत्त्व बनलेले आहे. अशा व्यक्तिमत्वामुळे पुढे आलेल्या अनुभवांनाही एका व्यापक परिप्रेक्ष्यात बसविण्याची क्षमता वाढत जाते. त्यामुळे लेखनातील सकसता वाढत जाते. अशा व्यक्तिमत्वाला ललित गद्य हा साहित्यप्रकार मानवतो. यामुळेच ललितगद्य हाच पर्याय आपण निवडला असावा.

अनुभवांची व्यापकता हा एक साहित्यगुण आहे. यात वाद नाही. मात्र अनुभवांची खोली हा गुण मी तरी अधिक महत्त्वाचा मानतो. आपल्या लेखनात मला अनुभवांची खोली सुद्धा आढळली. ‘आहे मनोहर तरी गमते उदास’ या वचनातील उदासता मधून मधून जाणवणे हे जीवनाच्या सखोल विचार करण्याचे प्रमुख लक्षण असते. या उदासपणामुळेच सिद्धार्थ गौतम जंगलात निघून गेला. या उदास भावनेचा स्पर्श आपल्या लेखनात आहे. हा स्पर्श असलेल्या लेखनात मग परतत्त्व स्पर्श. भगवंताचे अधिष्टान, वाङ्मयीन महात्मता, हाच सीरियसनेस , कॉम्लेंकसिटी वैगेरे शब्दांतून वेगवेगळ्या टीकाकारांनी सुचित केलेली सकसता निर्माण होते. या दिशेने आपली वाङ्मयीन वाटचाल चालली आहे. असे मला वाटते या वाटचालीस शुभेच्छा..

आपल्या पुस्तकातील लेखनाचे तपशीलवार रसग्रहण आत्ताच करीत नाही. या छोट्या पत्रात ते शक्यही नाही. मात्र ‘जेवण उत्तम होते.’ ही प्रतिक्रिया त्यातील प्रत्येक पदार्थालाही अंशत: लागू असतेच. कधी योग आल्यास समक्ष भेटीत तपशीलाबाबत ही बोलता येईल.

कळावे.

आपला

कमलाकर दिक्षीत

डॉ. पी. जी. कुलकर्णी यांना –

सप्रेम नमस्कार. आपण पाठविलेला ‘रस्ते मनातले’ हा ललित लेख संग्रह वेळीच मिळाला होता. अलीकडे तो वाचला आणि तो मला आवडला हे कळविण्यास आनंद वाटतो. आपल्या लेखांमध्ये स्वानुभवाकडे चिंतनशीलदृष्टीने पाहणारे काहीसे स्वप्नाळू नि काव्यात्म व्यक्तिमत्व जाणवत राहते. चिंतनातून गवसलेला आशय अलिप्त परंन्तु कथात्मक रुपात मांडण्याचा आपल्या शैलीमुळे सर्वच लेख वाचनीय आहेत.

पुस्तक पाठविल्याबद्दल आभारी आहे. आपल्या लेखनाला शुभेच्छा. क.लो.अ.

आपला

राजेन्द्र बनहट्टी

डॉ. पी. जी. कुलकर्णी सर

डॉ. सुनिताचा सविनय नमस्कार

वसंत ऋतुतल्या पावसातल्या अवचितपणे सुखद दर्शन देणाऱ्या इंद्रधुनष्याप्रमाणे आपले हे 'रस्ते मनातले' पुस्तक अवचीतपणे गवसलं आणि माझ्यासुद्धा मनातल्या रस्त्याचं दर्शन करुन देवून गेलं... वाटलं... ही वाट आपल्याला ओळखीची आहे. घ्यावी वळणं.. चढ उतार.. Vibration याचं काहीतरी नातं आहे. (मी आपली 'भूमिका' प्रथम वाचली व नंतर सगळे लेख वाचले.)

आपले सर्वच लेख मनापासून भावले.. त्यातल्या त्यात... 'दहा दिवस' फारच आवडला. या लेखामध्ये आपली जी आंदोलनं, स्पंदनं जाणवली ती निश्चितच विचार करायला लावणारी आहेत. आयुष्यात चाळीशीच्या टप्प्यावर असताना जेव्हा सिंहावलोकन करते... विचार येतो... एवढ्या वर्षात मी काय मिळवलं? काय हरवलं?... जे माझं आहे असं 'मी' म्हणते ते खरोखरीच 'माझं' आहे काय? मला आणखी काही हवं आहे काय? हवं असेल तर काय हवं आहे? ह्याचा जेव्हा आढावा घेते, तेव्हा त्यातला फोलपणा जाणवतो, मर्यादा जाणवतात. आजकाल... आपल्याला ह्यापेक्षा काहीतरी करायचं आहे... माझ्यासाठी... स्वत:साठी असं वाटून राहयलयं... आपलं पुस्तक वाचल्यावर थोडा आधार वाटला.

माझी खरं तर बऱ्यापैकी Practice आहे. गेली १२ वर्षे मी निपाणीमध्ये Gynae ची Practice करते. (पण अलिकडे ह्या सगळ्याशिवाय जीवनाच्या विविध अविष्कारांमध्ये डोकवावं असं वाटू लागलयं. संगीत, साहित्य यातला रस वाढू लागलाय. पण बरोबरच मी माझ्या Family-Members वर अन्याय तर करत नाही ना? असं सुद्धा वाटतंय...) पुस्तक वाचल्यानंतर ह्या प्रश्नानं उचल खाल्ली.

'रस्ते मनातले' 'मन झाले मोरपीस' या लेखातून आपला भूतकाळ आपण ज्या पद्धतीनं वर्तमानात जगता याचं कौतुक वाटून गेलं... आठवणींचा खजिना अलगदपणे उघडून, उलगडून आतील एक एक दागिना अंगाखांद्यावर आरखून पारखून निरखावा हा वेगळाच छंद आहे... त्यातील गोडी अवीटच... इतर लेखातील म्हणजे... 'मन झाले मोरपीस', 'यादव सरकार', 'शेंगा', 'माहेर' हे लेख आपल्या माणसांसाठी भुकेल्या

मनाची साक्ष पटवून गेलं की जे एक जिवंतपणाचं लक्षण आहे. माणसा-माणसामधील संवादच आजकाल दुरापास्त झालेला आहे हे जाणवून गेलं. यातूनच एकलेपणाची हाक आतून येत असेल का? अशाच एका क्षणी माझ्या हातून उतरलेली एक कविता पाठवत आहे..

कधी वाटतं...
न्याहाळावी पावले...
आपलीच आपण...
न्याहाळावी ती वाट...
ज्यावर पावले..
चालत राहिली... अखंडपणे....

कधी वाटतं...
प्यावं वारं... मुक्तपणे...
मोकाटपणे...
नको कुणाची साथ...
नको सोबत...
हा मार्ग माझा एकला...

कधी वाटतं...
गुंग व्हावं... स्वत:तच
जोडावं नातं... स्वत:शीच....
जाणावी लय... श्वासाची...
स्वत:चीच...
जगावं... आनंदानं... स्वत:साठीच...

आपली इतर पुस्तके वाचण्याची इच्छा बाळगून पत्रोत्तराची अपेक्षा करते.

आपली
डॉ. सुनिता देवर्षि
स्त्रीरोग तज्ज्ञ, निपाणी.

भगवान ठग

कवी, समीक्षक, अनुवादक

प्रति,

प्रिय डॉ. पी. जी. कुलकर्णी

स.न.वि.वि.

महोदय,

'रस्ते मनातले' हे आपल्या ललित लेखनाचे पुस्तक प्राप्त झाले. एका बैठकीत वाचुन काढले. काळजात स्पर्श करणारे आपले लेखन म्हणजे प्रातनिधीक अनुभव आहे. तुमचे लेखन वाचल्यानंतर मला सुद्धा माझ्या आयुष्यातले रस्ते आठवले, बालपणी घडलेल्या घटना आठवल्या विशेष म्हणजे आपल्या अनुभवात आणि माझ्या अनुभवात साम्य आठवले. ललित लेखनात आलेल्या आपल्या हृदयस्पर्शी कविता मोहात पाडणाऱ्या आहेत. मुळात आपण कवीच आहात असे वाटते. ओठावरुनी माझ्या कण कण ते उचंलित होतो, अशा ओळी आशयघन आहेत. माझ्या पुढील समीक्षाग्रंथात रस्ते मनातले मधील कवितावर एखादे टिपण जरुर लिहिणार आहे. आठवण ठेवून पुस्तक पाठविले त्याबद्दल आभारी आहे. एका वेगळ्या कळत – नकळत जगलेल्या भावविश्वात नेण्याची शब्दशक्ती आपल्याजवळ आहे. ती अशीच समृद्ध होवो. अशी सदिच्छा.

घरातील सर्वांना नमस्कार..!

कळावे.

आपला

डॉक्टर, मला असं वाटत....

जीवनाने दिलेले
प्रदत्तभोग हे नशिबी
होतेच तुमच्या,
चांगल वाईट त्याही पलिकडे
काय आहे? काय आहे?
हा बुद्धिच्या गाभ्यातला अव्यक्त शोध
नशिबी होताच तुमच्या,
किती श्वास, किती पावल,
किती शब्द, किती शोधणं,
हे ''त्याने'' ठरवलच आहे.
आपल्या असण्याची किंमत किती?
एका कठपुतली इतकी!
आपल्या नसण्याची किंमत किती?
एका हळुवार आठवणी इतकी!
तरीही चालायचय तुम्हाला,
कोरे कागद काळे करण्यासाठी,
तुटलेले जे जे, ते ते जोडण्यासाठी
नवीन नात्यात मिसळण्यासाठी,
अन् हे जे असणं
हे नसुन ही आहे असं दाखवण्यासाठी
थांबा आता ! वाट पहा !
ती शांतीची अनुभूती,
तो दिव्यत्वाचा प्रकाश,
नक्की दिसेल तुम्हाला,
येईल तुम्हाला ''तो'' शोधत,
कारण तुम्ही आहात,
त्याच्याच आत्मस्वरुपी,
निर्मितीतल एक
प्रेमवेड पोर!!

– सौ. एम्. ए. कुलकर्णी



